पुणे, शनिवार, १ जुन २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 175 • वर्ष ३ रे, अंक १७५ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS

## पुणे हादरले! जेसीबीतून अंगावर टाकली माती

# तरुणीला जमिनीत गाडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्याच्या राजगड कोंढवळे गावात जमिनीच्या वादातून २२ वर्षीय तरुणीला जमिनीत गाडण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी चार आरोपींविरोधात ३०७ कलम अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. संभाजी खोपडे, तानाजी खोपडे, बाळू भोरकर, उमेश जयस्वाल या चार जणांवर जीवे मारण्याचा प्रयत्न, शिवीगाळ धमकावणे यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोंढवळे गावात जमिनीच्या वादातून २२ वर्षीय तरुणीला जमिनीत गाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप संबंधीत तरुणीने आणि तिच्या आईने केला होता. ट्रॅक्टर आणि जेसीबी घेऊन दावा न्यायप्रविष्ट असलेल्या जमिनीचा बेकायदेशीर पध्दतीने ताबा घेण्यासाठी आलेल्या २५ ते ३० जणांनी जेसीबीच्या सहाय्याने अंगावर माती टाकून तरुणीला जमिनीत गाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तिनी आणि तिच्या घरच्यांनी केला आहे.

तरुणीने केलेल्या आरोपानुसार, नागरिक पोलिसांसह जमिनीचा ताबा घेण्यासाठी आले असताना तरुणी आणि त्या नागरिकांमध्ये वाद झाला होता. त्यानंतर ही घटना घडली आहे. या घटनेचा व्हिडिओ सध्या व्हायरल झाला आहे. व्हिडिओत तरुणी कंबरेपर्यंत मातीमध्ये गाडली गेली असल्याचे दिसते आहे. तरुणीने घडलेल्या घटनेबाबत वेल्हा पोलीस स्टेशनमध्ये रितसर लेखी तक्रार केली आहे. त्यानंतर राजगड पोलिस स्थानकात गुन्हा नोंद करण्यात आला होता. तसेच, या प्रकरणात १० ते १२ जणांवर गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे.

### काय आहे हे प्रकरण?

- २००६ मधल्या प्रकरणात तत्कालीन कलेक्टर साहेबांनी एक जागा भूसंपादन केले. मात्र, त्या जागेचा मोबदला या पीडित तरुणीच्या कुटुंबीयांना मिळाला नाहीये. त्यामुळं त्यांनी जागेवरील ताबा सोडण्यास नाकार दिला. तसेच, ज्यांनी ही जागा घेतली आहे त्या जागेच्या मालकाने बळजबरीने ताबा घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी २२ वर्षीय तरुणीच्या गाडल्याचा प्रकार केला. तसंच, तरुणीच्या अंगावर ट्रॅक्टर आणि जेसीबीच्या सहाय्याने माती टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला.
- या प्रकरणी पीडित तरुणीच्या कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. धक्कादायक म्हणजे, जमिनीचा ताबा घेण्यासाठी मुंबईवरुन गुंड मागवल्याचाही प्रकार समोर आला आहे. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणात वापरण्यात आलेल्या ट्रॅक्टर आणि जेसीबीदेखील जप्त करण्यात आले आहेत.

तरुणी कंबरेपर्यंत मातीमध्ये गाडली गेली असल्याचे दिसत आहे. तरुणीने घडलेल्या घटनेबाबत वेल्हा पोलीस स्टेशनमध्ये रितसर लेखी तक्रार केली आहे.





१५०० वर्षांपूर्वीच्या देवाच्या मुर्त्या असल्याचा अंदाज

## विठ्ठल मंदिराच्या तळघरात सापडला जुना ठेवा

### मुर्ती-नाणी -पादुकांचा समावेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

» वारसा

**पंढरपूर:** विठ्ठल मंदिरातील तळघरात विविध मूर्ती-नाणी पादुकांचा सापडल्या आहेत. विठ्ठल मंदिरातील हनुमान दरवाजा जवळ खोदकाम करत असताना तळघर सापडले यामुळे याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती पुरातन विभागाच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दुपारी पाच वाजता मंदिरात येऊन तळघराची पाहणी केली तेव्हा तळघर ६ बाय ६ फुटाचे असून तळघरात तीन फुटाच्या दोन व्यंकटेश देवाच्या मुर्त्या सापडल्या आहेत तसेच काही नाणी ही आढळून आली आहेत देवाच्या मुर्त्या पंधराव्या शतकातील असल्याचा अंदाज प्रातन विभागाचे संचालक विलास वाहने यांनी व्यक्त केला आहे याचा तपास करून अहवाल शासनाला सादर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. विठ्ठल मंदिरात तळघर सापडल्याचे वृत्त पसरतात ते पाहण्यासाठी नागरिकांनी मंदिरात गर्दी केली होती .

» पान ९ वर

## आठ राज्यांतील ५७ जागांवर आज मतदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणूक-2024च्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात आज ७ राज्ये आणि १ केंद्रशासित प्रदेशातील ५७ जागांवर मतदान होणार आहे.

२०१९ मध्ये, या जागांपैकी भाजप जास्तीत जास्त 25, TMC 9, BJD 4, JDU आणि अपना दल (S) प्रत्येकी 2, JMM फक्त 1 जागा जिंकू शकले. केवळ पंजाबमुळे काँग्रेसला ८ जागा मिळाल्या होत्या. या टप्प्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, दोन केंद्रीय मंत्री आरके सिंह आणि अनुराग ठाकूर रिंगणात आहेत. ४ कलाकार- कंगना रणौत, रवी किशन, पवन सिंह, काजल निषाद हेदेखील निवडणूक लढवत आहेत.

» पान ९ वर

## प्रज्वल रेवण्णाला ६ जूनपर्यंत पोलिस कोठडी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** माजी पंतप्रधान एच.डी.देवेगौडा यांचे नातू आणि भाजपचे पक्षातून निलंबित खासदार प्रज्वल रेवण्णाला 35 दिवसांनी अटक केली आहे.जर्मनीहून बंगळुरू विमानतळावर उतरताच त्याला कर्नाटक 'एसआयटी'ने रेवण्णाला ताब्यात घेतले.प्रज्वल हा २७ एप्रिलला बंगळुरूहून जर्मनीला पळून गेला होता.आता त्याला ६ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी भाजप पक्षातून निलंबित केलेले हसन लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार प्रज्वल रेवण्णाला अटक केल्यानंतर शुक्रवारी दुपारी न्यायालयात हजर करण्यात आले.

» पान ९ वर

### पुणे कोर्टाचा मोठा निर्णय!

## जरांगेंना दिलासा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे** : पुणे जिल्हा सत्र न्यायालयाने मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना मोठा दिलासा दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधातील वॉरंट रद्द करण्यात आले आहे. तसेच वॉरंट रद्द करताना कोर्टाने त्यांना ५०० रुपयाचा दंड देखील ठोठावला आहे. एक जमीनदार द्यायला सांगितला आहे. २०१३ मध्ये एका फसवणुकीच्या गुन्ह्यात जरांगेंविरोधात वॉरंट जारी झाले होते. त्यानंतर जरांगे आज कोर्टात हजर झाले. मी न्यायालयाचा आदर करतो, न्याय सर्वांसाठी समान आहे, अशी प्रतिक्रिया मनोज जरांगेंनी कोर्टात जाण्याअगोदर दिली होती.

» पान ९ वर

## बारावीची पुरवणी परीक्षा १६ जुलैपासून होणार सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणारी दहावी-बारावीची पुरवणी परीक्षा १६ जुलैपासून सुरू होणार आहे. बारावीची पुरवणी परीक्षा १६ जुलै ते ८ ऑगस्ट, तर दहावीची पुरवणी परीक्षा १६ ते ३० जुलै या कालावधीत होणार असल्याची माहिती राज्य शिक्षण मंडळाने दिली आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत दहावी-बारावीच्या पुरवणी परीक्षेची लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

» पान ९ वर

SINHGAD TECHNICAL EDUCATION SOCIETY, PUNE
Sinhgad Institutes

SINHGAD INSTITUTES
Pune | Mumbai | Solapur (Maharashtra, India)
| 12 Campuses | 85 Institutes | 26 Schools | | 90,000+ Students | 9,000+ Staff | 1000+ International Students |

| SINHGAD UNDER-GRADUATE COLLEGES | ACCREDITED BY NAAC |
Affiliated to Savitribai Phule Pune University and Approved by Government of Maharashtra
Sinhgad Institutes, one of the biggest education conglomerates in the region, is renowned for academic excellence right from inception in 1993,commencing with excellence in Commerce, and Science education. Set up in the lush green campuses with state of the art laboratories, strong research partnership with industries, the Under Graduate Colleges provide student centric learning and world class facilities. The Under Graduate Colleges are Accredited to NAAC.

SINHGAD COLLEGE OF SCIENCE
Vadgaon-Ambegaon (Bk), Pune - 411 046
Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411046
Phone : 020 - 24354720
| BBA | B.C.A | B.Com. | B.Sc. |
| B.Sc.(Comp. Sci.) | B.Sc.(Bio-Tech.) | M. Sc. |
Principal : Dr. Magan P. Ghatule [08411887333]


SINHGAD COLLEGE OF COMMERCE
Kondhwa (Bk), Pune - 411 048
Kondhwa (Bk), Kondhwa-Saswad Road, Pune - 411048
Phone : 020 - 67571197
| BBA | B.C.A | B.Com. | M.Com. |
Principal : Dr. Makarand Wazal [08411887372]

SINHGAD COLLEGE OF ARTS & COMMERCE
Warje, Pune - 411 058
Warje, Pune-Mumbai Bypass Highway, Pune - 411058.
Phone : 07391076414
| BBA | B.C.A | B.Com. | M.Com. |
Principal : Dr. Nandini Deshpande [09860697234]

SMT. KASHIBAI NAVALE COLLEGE OF COMMERCE
Erandwane, Pune - 411 004
19/15, Erandwane, Smt. Khilare Marg, Off Karve Road, Pune - 411004. Phone: 020 - 25434315
| BBA | B.C.A | B.Com. |
Principal : Dr. Shrikant Deshpande [09421553006]

N. B. NAVALE COLLEGE OF COMMERCE & SCIENCE
Kusgaon (Bk), Lonavala, Dist. Pune - 410 401
Kusgaon (Bk), Off Mumbai-Pune Expressway, Lonavala, Dist.Pune - 410401. Phone: 02114 - 673412 / 29 / 673307
| BBA | B.C.A | B.Com. | M.Com. |
I/c Principal : Dr. Vijay Dhole [08411887342]

150+ Total No. of Faculty | 50+ Ph. D. Faculty | 6500+ Ph.D. Pursuing | 12.5 Average Experience | 6500+ Total No. of Student | 80000+ Total No. of Alumni | 100+ Faculty Books Publications | 700+ No. of Publication Research Articles | 25+ Research Projects



Unique Features: • Excellent Placement Track Record • Well Stocked Library • e-Library and Multimedia • Round the Clock Internet and Wi-Fi Connectivity • Separate Hostels for Boys & Girls with Mess Facility • Play Fields & Gymnasium • On Campus Medical Facility • Banking & Shopping Complex • Lush green campus • Student friendly environment • Students Amenities in the Campus.
Note: Sinhgad Institutes has not authorized any person / Agency / Organization / Association / Representative for admissions to the courses conducted by all institutes under Sinhgad Technical Education Society. The candidates are advised to remain in touch with the Dy. Registrar (Admissions) / Director / College Principal / Dean / HoD / Authorized College Staff only.
19/15, Erandwane, Smt. Khilare Marg, Off. Karve Road, Pune (Maharashtra, India) - 411004 Phone: +91 20 25431001 | Email: stes@sinhgad.edu
*Subject to Pune Jurisdiction only
www.sinhgad.edu
Prof. M. N. Navale
Founder President

## भाजप शिष्टमंडळ: पोलीस आयुक्तांना निवेदन

# बारवर तातडीने कारवाई करा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील निवासी भागांमधील पब, रूफ टर्फ वरील क्लब आणि शैक्षणिक संस्था, धार्मिक स्थळांच्या परिसरात चालणाऱ्या बारवर तातडीने कारवाई करावी अशी मागणी पुणे शहर भाजपच्या शिष्टमंडळाने आज पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेऊन केली.

शहर अध्यक्ष धीरज घाटे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी, राजेश पांडे, आमदार माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, ॲड. वर्षा डहाळे, राजू शिळीमकर यांचा शिष्टमंडळात समावेश होता.

अमली पदार्थांचा वापर व व्यापार देखील मोठ्या प्रमाणावर होत असल्याची गंभीर चर्चा सर्वत्र सुरू आहे. या सर्वांची दखल घेऊन पोलिस प्रशासनाने कडक कारवाई केली पाहिजे, अशी ही मागणी करण्यात आली.



कल्याणीनगर परिसरात रविवार, १९ मे २०२४ रोजी पहाटे भरधाव लक्झरी कारने चिरडल्याने दोन जणांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पुणे पोलिसांकडून तपास करण्यात येतो आहे. या प्रकरणातील तपासामध्ये रोज नव्या अपडेट्स समोर येत आहेत. माध्यमांमधून त्या संदर्भातील माहिती पुढे येते. माननीय गृहमंत्री श्री. देवेंद्र जी फडणवीस यांनी स्वतः पुण्यामध्ये येऊन आपल्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन या प्रकरणी सुरू असलेल्या तपासाचा आढावा घेतला होता. तसेच आवश्यक ते निर्देश दिले होते.

पुण्यातील हिट अँड रन प्रकरण घडून आता १२ दिवस उलटले आहेत. या प्रकरणामुळे पुणे शहराची बदनामी होते आहे. पुणे शहर म्हणजे पब-बारचे शहर असे पसरविले जाते आहे. वास्तविक, सामान्य पुणेकरांचा या सगळ्याशी काही संबंध नाही. पुणे विद्येचे माहेरघर, सांस्कृतिक राजधानी, ऐतिहासिक वारसा असलेले शहर आहे. शिक्षणाच्या निमित्ताने लाखो लोक राज्याच्या आणि देशाच्या वेगवेगळ्या भागांतून पुण्यात येतात. या प्रकरणामुळे पुण्याची प्रतिमा मलिन होते आहे. त्याचा दूरगामी परिणाम पुण्यावर होईल. त्यामुळे आपण लवकरात लवकर तपास पूर्ण करून या प्रकरणी आरोप असलेल्या विरोधात आरोपपत्र दाखल करावे, जेणेकरून न्यायालयात सुनावणी सुरू होऊन आरोपींवरील आरोप सिद्ध होऊन त्यांना कठोर शिक्षा देणे शक्य होईल. पुणे शहर सुरक्षित राहण्यासाठी काम करणे, ही पुणे पोलिसांची जबाबदारी आहे, त्यामुळेच आपण कल्याणीनगर प्रकरणात पुढील तपास लवकरात लवकर पूर्ण केला पाहिजे आणि या प्रकरणात ज्यांचा सहभाग आहे, अशा सर्व आरोपींवर कारवाई केली पाहिजे.

## एसटीचा ७६ वा वर्धापन दिन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** १ जून, १९४८ ला पुणे-अहमदनगर मार्गावर एसटीची पहिली बस धावली. त्या निमित्ताने दरवर्षी १ जून हा एसटीचा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. उद्या १ जून रोजी एसटीच्या सर्व बसस्थानकांवर प्रवासी व सर्व कर्मचारी बांधवांना साखर पेढे वाटून शुभेच्छा देण्यात येणार आहेत. वर्धापन दिनानिमित्त सर्व बसस्थानके रांगोळी काढून, फुला पानाचे तोरणे बांधून सजविण्यात येणार आहेत.गेली ७६ वर्षे राज्यातील सर्वसामान्य जनतेला सुरक्षित व किफायतशीर प्रवाशी दळणवळण सेवा देण्याचे प्रयत्न एसटी प्रामाणिकपणे करत आली आहे. आता देखील ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता अनेक अडी-अडचणी, अडथळे, आर्थिक संकटावर मात करत राज्याच्या डोंगरदऱ्यातील वाडया वस्त्यांपासून आदिवासी पाडया पर्यंत एसटी आपली प्रवासी दळणवळण सेवा देत आहे. त्यासाठी ८७ हजार कर्मचारी व अधिकारी वृंद रात्रंदिवस राबत आहेत.

» Selected

## दोषींना अत्यंत कडक शिक्षा करण्याची वंदेमातरम् संघटनेचे मागणी

**पुणे :** कल्याणीनगर येथील हीट अॅण्ड रन प्रकरणामुळे पुणे शहरातील गंभीर परिस्थिती समोर आली आहे. या घटनेतील दोषींना अत्यंत कडक शिक्षा करण्याची मागणी वंदेमातरम् संघटना वेळोवेळी करत आली आहे मात्र ही परिस्थिती या शहरात टप्प्याटप्प्याने निर्माण झाली आहे. एकीकडे सरकारी शाळा, हॉस्पिटल, क्रीडांगणे हे बिल्डरांच्या हातात देण्यासाठी योजनाबद्धपणे काम सुरू असल्याचे पुरावे संघटनेने आयुक्त विक्रम कुमार तसेच पोलीस आयुक्त यांच्याकडे वेळोवेळी दिले आहेत मात्र ज्यांनी कारवाई केली पाहिजे तेच सर्व वरिष्ठ अधिकारी याच्यामध्ये गुंतलेले प्रथम दर्शनी दिसून येत आहे. माध्यमांनी दिलेल्या एका फोटोमध्ये तर स्वतः मनपा आयुक्त विक्रम कुमार, विभागीय आयुक्त सौरभ राव आणि पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता एका पब मालकासोबत दिसत आहेत. हे खेदजनक आहे. वंदेमातरम् संघटना या तीनही अधिकाऱ्यांच्या बिल्डरांसोबत असलेले संबंध आणि यांनी शहराच्या मोक्याच्या जागांबद्दल घेतलेले निर्णय तसेच पुण्यातील अनधिकृत पब, हॉटेल्स, बांधकामे, दारूची दुकाने अशा व्यवसायांमध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या अधिकाऱ्यांचे असलेले संबंध याची सी. बी. आय. चौकशी करावी ही मागणी वंदेमातरम् संघटना करत आहेत.

## मिळकतकर सवलतीला पंधरा दिवसाची मुदत वाढ

**पुणे :** मिळकत करात मिळणारी पाच ते दहा टक्के ही सवलत मिळविण्यासाठी पुणेकरांना आणखी पंधरा दिवसांची मुदत देण्यात आली आहे. मिळकत कराची बिले वेळेवर मिळाली नसल्याने अनेक जण या सवलतीपासून वंचित राहणार होते. त्याची दखल घेत प्रशासनाने १५ जुनपर्यंत मुदत वाढविली आहे. महापालिकेच्या मिळकत कर विभागाकडून मिळकतदारांना वेळेवर बिले मिळाली नसल्याने पाच ते दहा टक्क्याची सवलत मिळण्यापासून अनेकजण वंचित राहणार होती. यावर्षी महापालिकेने मिळकत कराची बिले पोस्टाद्वारे पाठविली आहे. तसेच महापालिकेच्या मिळकत कर विभागाच्या propertytax.punecorparation.org या संकेतस्थळावर बिले उपलब्ध करून दिली आहे. परंतु, पोस्टाद्वारे पाठविण्यात आलेली मिळकत कराची बिले अद्याप मिळकतदारांना मिळाली नाही. संकेतस्थळावर जाऊन प्रत्येक मिळकतदार हा बिल पाहू शकत नाही. तसेच अनेक वेळा सर्व्हर डाऊन असल्याने संकेतस्थळावर माहीती मिळण्यात अडचणी येतात. याकारणांमुळे ही मुदत वाढवून मिळावी अशी मागणी केली गेली. महापालिकेकडून दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मे या मुदतीत (आर्थिक वर्षाच्या पहील्या दोन महिन्यात) मिळकतकर भरणाऱ्यांना सर्वसाधारण करामध्ये ५ ते १० टक्के सवलत दिली जाते. अनेक मिळकतदारांना बिले वेळेत मिळाली नसल्याने ते ही सवलत घेण्यापासून वंचित राहू शकतात, हे लक्षात घेत प्रशासनाने पंधरा दिवस ही मुदत वाढविली.

## म्हाडाच्या घरांसाठी अर्ज करण्यास मुदत वाढ

**पुणे :** पुणे मंडळाची मार्च महिन्यात 4 हजार 877 सदनिकांची सोडत म्हाडाने जाहीर केली. त्या दरम्यान लोकसभा निवडणुकांसाठी आचारसंहिता लागू झाली, तरीही इच्छुकांकडून घरांसाठी नोंदणी सुरू राहिली.महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) पुणे मंडळाच्या सोडतीसाठी अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. गुरुवारपर्यंत (30 मे) असलेली मुदत आता 6 जूनपर्यंत वाढवण्यात आली असून नागरिकांना अर्ज करण्यासाठी ही अंतिम मुदतवाढ असणार असल्याची माहिती म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील यांनी दिली. घरांसाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्यात येत आहेत. ऑनलाइनद्वारे आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी लागतात. निवडणुकांमुळे अर्ज करूनही अनेकांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत. यामुळेच मुदतवाढीची यापूर्वी मागणी करण्यात आली होती, त्यानुसार मुदतवाढ देण्यात आली. म्हाडांतर्गत पुणे विभागाने काढलेल्या सोडतीत चार हजार 877 सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

## शाळेच्या पहिल्या दिवशी मोफत पुस्तके मिळणार

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील १३ तालुक्यांमधून सुमारे 17 लाख 99 हजार 573 इतक्या पुस्तकांची मागणी नोंदविण्यात आली होती. त्यापैकी आतापर्यंत 16 लाख 97 हजार 603 इतक्या पुस्तकांची मागणी पूर्ण करून त्याचे वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे आतापर्यंत 94.33 टक्के पुस्तकांचे वाटप झाल्याची माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी दिली आहे.शिक्षण विभागाकडून जिल्हा परिषद, खासगी अनुदानित आणि नगरपरिषदेच्या हद्दीतील पहिली ते आठवीपर्यंतच्या शाळांना आतापर्यंत 95 टक्के पुस्तकांचे वाटप करण्यात आले आहे. पुढील दोन दिवसांत उर्वरित मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप केले जाणार आहे. त्यामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तक उपलब्ध होणार आहे. जिल्ह्यात हवेली, खेड, शिरूर आणि दौंड, बारामती तालुक्यात सर्वाधिक पुस्तकांची मागणी नोंदविण्यात आली आहे. येत्या 15 जूनला शाळा सुरू होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर शाळांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येत आहे.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## शॉक प्रूफ फायबरचे खांब निकृष्ट दर्जाचे

**पुणे :** महापालिकेकडून शहरात लोखंडी विद्युत खांबात विद्युत प्रवाह उतरून होत असलेल्या अपघातांच्या घटना रोखण्यासाठी शहरात शॉक प्रूफ फायबरचे खांब बसविण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अंतर्गत दोन हजार खांब बसविण्यात येणार असून त्यासाठी ५ कोटींचा खर्च केला जाणार आहे. मात्र, हे खांब निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप होत असून मध्यवर्ती पेठांमध्ये लावण्यात आलेल्या काही खांबावरील दिव्यांचे लोखंडी बार दिव्यासह तुटून पडले आहेत. त्यामुळे या खांबाबाबत महापालिकेने फेरविचार करावा, अशी मागणी होत आहे. महापालिकेच्या विद्युत विभागाने नागरिकांची मागणी नसताना देखील शहरातील चांगले लोखंडी विद्युत खांब काढून त्या ठिकाणी एफआरपीचे शॉक प्रूफ खांब बसविण्याचे काम हाती घेतले आहे.

पालिकेकडून हे खांब उत्तम दर्जाचे असल्याचे सांगत यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होणार असे सांगण्यात आले होते. त्यानंतरही विदयुत विभागाने रविवार पेठ, गणेश पेठ भागासह इतर भागात असे खांब उभारले आहेत. मात्र आता हे खांब निकृष्ट दर्जाचे स्पष्ट झाले असून या खांबाला विद्युत दिव्यासाठी लावण्यात आलेला पाइप गळून पडला आहे.

> गरज नसताना तसेच नवीन आणि चांगले खांब असताना ते काढता त्याच्या शेजारी शॉक प्रूफ खांब बसविण्यात येत आहेत. त्यामुळे या प्रकाराला आम्ही विरोध केला होता. रास्ता पेठ, भवानी पेठ, शुक्रवार पेठ आणि बाजीराव रस्त्यावर गरज नसताना शॉक प्रूफ विद्युत खांब बसविले जात आहेत. आता याच खांबांवरील विद्युत दिवा बसवलेला पाइप तुटून पडत असून त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका आहे."
> — विशाल धनवडे
> माजी नगरसेवक (उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना)

## अभिवादन

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** राजमाता अहिल्याराणी होळकर यांच्या जयंतीनिमित्त संभाजी ब्रिगेड च्या वतीने पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते तथा संघटक संतोष शिंदे, शहराध्यक्ष अविनाश मोहिते, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अमोल कोकरे, व्यंकट मानपिढी, वैभव तनपुरे, कल्पना गिड्डे, संविधान सोनवणे, दीपक शेलार आधी उपस्थित होते.

# राजमाता अहिल्याराणी होळकर जयंती साजरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्याच्या राज्यकर्त्यांनी राजमाता अहिल्या राणी होळकरांच्या राज्य कारभाराचा अभ्यास करावा. होळकरांच्या कर्तुत्वाचा इतिहास महाराष्ट्रासह देशाला प्रेरणादायी आहे. सध्या राज्यात चुकीचे, सुडाच किंवा फसवं राजकारण करण्यापेक्षा आदर्श राज्यकारभार कसा असावा हे 32 वर्ष राज्य कारभार केलेल्या अहिल्या राणी होळकरांच्या कर्तुत्वान इतिहासातून समजून घ्यावे. शिंदे-फडणवीस सरकारला चांगल्या विचारांची गरज आहे... असे मत संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते संतोष शिंदे यांनी व्यक्त केले.

संतोष शिंदे म्हणाले, शिंदे होळकरांचा इतिहास लढवय्या आहे. आजही इतिहास हा होळकरांचे कर्तुत्व सांगतो. परंतु आजही मल्हारराव होळकर, यशवंतराव होळकर, राजमाता अहिल्याराणी होळकर यांचा खरा इतिहास समाजासमोर आलेला नाही. होळकरांच्या इतिहासाचे पुनर्लेखन झालं पाहिजे आणि



सत्य इतिहास जगासमोर आला पाहिजे अशी भूमिका संभाजी ब्रिगेडची आहे. कारण तोच खरा इतिहास सोनेरी हस्ताक्षराने लिहिला जाईल. म्हणून होळकरांच्या इतिहासाचे पुनर्लेखन करावे. तसेच राजमाता अहिल्या राणी होळकर यांची 31 मे रोजी २९९ जयंती आहे. त्या दिवशी शासकीय सुट्टी जाहीर करावे अशी संभाजी ब्रिगेड ची राज्य सरकारकडे मागणी आहे.


राजमाता अहिल्याराणी होळकर यांच्या जयंतीनिमित्त संभाजी ब्रिगेड च्या वतीने पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते तथा संघटक संतोष शिंदे, शहराध्यक्ष अविनाश मोहिते, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अमोल कोकरे, व्यंकट मानपिढी, वैभव तनपुरे, कल्पना गिड्डे, संविधान सोनवणे, दीपक शेलार आधी उपस्थित होते.

## विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारततर्फे

# 'पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौरव पुरस्कार घोषित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणेतर्फे पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड यांच्या अकराव्या पुण्यस्मरण/ स्मृतिदिनाचे औचित्य साधून, ज्ञान-विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातून आयुष्यभर समाजप्रबोधन व सांप्रदायिक सद्भावनेचे सेवाभावी कार्य समर्पित व निरपेक्ष भावनेने अव्याहतपणे करून, समाजासमोर आदर्श निर्माण करणाऱ्या थोर तपस्विनी कुलीन पंचकन्यांना (५) 'पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौरव पुरस्कार' देऊन त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. अशी माहिती माईर्स एमआयटीचे अध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश तु. कराड आणि विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड-चाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.





### प्राणप्रतिष्ठापना सोहळा व मंदिराचे उद्घाटन

● संपूर्ण भारतात मानवतीर्थ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लातूर येथील रामेश्वर (रूई) येथील श्री संत गोपळबुवा महाराज मंदिराचे पुनर्निर्माण, भगवान महादेवाच्या शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठापना कलशारोहण सोहळा व पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड समाधी मंदिराचा उद्घाटन सोहळा ही आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा ३ जून रोजी सकाळी ७ वाजल्यापासून सुरू होणार आहे. प्राणप्रतिष्ठापना सोहळा व मंदिराचा उद्घाटन सोहळा महाराष्ट्रातील प्रसिद्ध पुरोहित मिलिंद राहुरकर गुरूजी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे. ह.भ.प.हरिहर महाराज दिवेगांवकर यांच्या शुभ हस्ते कलशारोहण सोहळा होणार आहे. या प्रसंगी आर्यव्रत कराड, विरेन कराड आणि श्रीराम नागरे हे उपस्थित राहतील.

या पंचकन्यांमध्ये पुण्यातील थोर समाजसेविका श्रीमती मेधा सुरेश घैसास, अयोध्या येथील श्री रामायणम धाम आश्रमाच्या माध्यमातून समाजप्रबोधन व ज्ञान विज्ञान अध्यात्माचा प्रसार करणाऱ्या विदूषी दीदी मॉं. मंदाकिनी श्रीराम किंकर, ज्येष्ठ प्रवचनकार व कीर्तनकार ह.भ.प.सौ. भगवतीताई सातारकर-दांडेकर, थोर समाजसेविका श्रीमती मीरा महार्जन आणि थोर निष्ठावंत वारकरी व कवयित्री श्रीमती विजयाबाई गोविंद कदम यांचा समावेश आहे. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, स्मृतिपदक व रोख रु. २१,०००/- (रुपये एकवीस हजार) असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

# वनविभाग एमपीएससी परीक्षा २१ जुलैला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात येणाऱ्या राज्य सेवा परीक्षा, महाराष्ट्र वनसेवा परीक्षा, महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे.

आयोगातर्फे एकूण 524 रिक्त जागांसाठी ही परीक्षा ६ जुलै रोजी घेतली जाणार होती. सुधारित तारखेनुसार आता ही परीक्षा २१ जुलै रोजी घेण्यात येणार आहे.

काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेतल्या जाणाऱ्या राज्यसेवा पूर्वपरीक्षेची तारीख जाहीर करण्यात आली होती. मात्र, त्यात सुधारणा करून आता ही परीक्षा २१ जुलै रोजी होईल. या परीक्षेसाठी घोषित करण्यात आलेल्या जागांमध्येही वाढ करण्यात आली असून, एसईबीसी उमेवारांसाठी अर्ज करण्याची सुविधा देण्यात आली आहे, तसेच वयाधिक्यामुळे अर्ज करू न शकलेल्या उमेदवारांनाही संधी देण्यात आली आहे.सामान्य प्रशासन विभागाने अराखीव किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी इतर मागास वर्गाचे जात प्रमाणपत्र प्राप्त केले आहे.

## देशातील बहुसंख्य धरणे गाळाने भरली

# गाळमुक्त धरण अभियान राबविण्याची गरज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** यंदा कडकडीत उन्हाळ्यातही खडकवासला धरणात मुबलक पाणी आहे. देशातील बहुसंख्य धरणे गाळाने भरली आहेत. त्यामुळे पहिल्या पावसात अनेक धरणांत शंभर टक्के पाणीसाठा होतो. उन्हाळा सुरू होताच धरणात पाण्याऐवजी गाळांचे तांडेच शिल्लक राहतात. धरणे गाळाने भरल्याने देशासमोर पाणीटंचाईचे मोठे संकट उभे आहे. त्यामुळे गाळमुक्त धरण अभियान देशभरात थांबविण्याची गरज आहे, असे कर्नल सुरेश पाटील यांनी सांगितले. गेल्या 20 वर्षांपासून ग्रीन थंब संस्थेचे

> खडकवासलातून काढलेल्या गाळामुळे शेतीचे उत्पन्न वाढले. धरण परिसरात वनराई, गार्डन, दशक्रिया घाट आदी विधायक उपक्रम राबविले आहेत. स्थानिक शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावले आहे. धरणाच्या ओसाड तीरावर घनदाट वनराई फुलली आहे. वन्यप्राण्यांसह पक्ष्यांचा अधिवास वाढल्यामुळे नवीन पर्यटनस्थळ विकसित झाले आहे.
> — शरद जावळकर
> माजी सरपंच, खानापूर

> गाळ काढण्यात आल्याने खडकवासला धरणातील पाणी साठवण क्षमता वाढली. त्याचा लाभ शेतीसह पुणेकरांना होत आहे. गोऱ्हे खुर्द ते खानापूरपर्यंतच्या धरण क्षेत्रातून प्लास्टिकचा कचरा, राडारोडा काढून पात्र स्वच्छ करण्यात आले. धरणतीरावर खानापूर ते शांतीवनपर्यंत चार किलोमीटर अंतराचा रस्ता तयार करण्यात आला आहे, त्यामुळे शेतकऱ्यांची सोय झाली आहे."
> — कर्नल सुरेश पाटील
> अध्यक्ष, ग्रीन थंब संस्था



अध्यक्ष कर्नल सुरेश पाटील यांनी सेवाभावी संस्था व लोकसहभागातून खडतर परिश्रम घेत खडकवासला धरणातून शेकडो टन गाळ बाहेर काढला. यामुळे ऐन उन्हाळ्यात तीव- टंचाईच्या काळात पुणेकरांसह शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. गाळ काढण्यात आल्याने खडकवासला धरणाची पाणी साठवण क्षमतेत तब्बल अर्धा टीएमसी पाण्याची भर पडली.

#रा

## एकल मातांचा हिरकणी पुरस्कार देऊन सन्मान



**पुणे :** पतीच्या निधनानंतर पतीच्या विरहाचे दुःख तर असतेच पण ते बाजूला ठेवून मुलांच्या शिक्षणाची , कुटुंबाची तसेच आर्थिक अशी पूर्ण जबाबदारी एकट्या स्त्रीवर येते. ह्या सर्व जबाबदाऱ्या एकल माता यशस्वीरित्या पार पाडत मुलांना उच्च शिक्षण देतात. अशा एकल मातांच्या कर्तृत्वाचे कौतुक व्हायलाच पाहिजे म्हणून वसुंधरा परिवार सोशल फाउंडेशनच्या संस्थापिका योगिताताई गोसावी यांनी या एकल मातांना मान्यवरांच्या हस्ते हिरकणी पुरस्कार देऊन सन्मानित केले. यावेळेस महिलांसाठी फॅशन वॉक व संगित खुर्ची स्पर्धा आयोजित केली होती. महिलांनी उत्स्फूर्तपणे अतिशय मोठ्या संख्येने सहभाग घेतला व खूप एन्जॉय केले. संजीवनी कोंडे देशमुख, अश्विनी निकम, मयुरी कदम, रितू पाटील, उषा वाणी, सुषमा मोरे व बाल कलाकार वैष्णवी महाडिक या सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे वितरण करण्यात आले. आमदार मा रविंद भाऊ धंगेकर यांच्या पत्नी मा प्रतिभाताई धंगेकर यांनी महिलांना पर्यावरणाचे महत्त्व सांगून जास्तीत जास्त वृक्षारोपण करण्यास सांगितले. या कार्यक्रमात फिल्म प्रोड्युसर हिरेन वैद्य, फिल्म डिरेक्टर शैलेंद्र निर्मळे, सूर्योदय वृद्धाश्रमच्या संस्थापिका छायाताई भगत, आनंद कुटुंबाच्या संचालिका मिलनताई पवार, सामाजिक कार्यकर्त्या एलिस लोबो, कलाकार संगिता पिंगळे व अनिता चव्हाण आदि मान्यवर उपस्थित होते.

### जिल्हा परिषदेची मुले आता

# इस्रो अवकाश संशोधन संस्थेला देणार शैक्षणिक भेट







EXTRA special story

**विस्तारणारं अवकाश**

जिल्ह्यातील ३ हजार ६२१ जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्राथमिक शिक्षण विभागाने विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन केले आहे. त्यापैकी बंगळुरू येथील इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (इस्रो) या अवकाश संशोधन संस्थेने शैक्षणिक भेट सहल ही पाच दिवसाची असेल. त्यामध्ये इस्रोच्या स्थापनेपासूनचा इतिहास, आजपर्यंत केलेल्या अवकाश संशोधन मोहिमा, संस्थांमध्ये संशोधन कसे केले जाते ? शास्त्रज्ञ कसे काम करतात ? अवकाश संशोधनात करिअर कसे करावे ? त्यासाठी शिक्षण आणि विविध परीक्षा आदींबाबतची माहिती मिळण्यास मदत होईल आणि या भेटीमुळे अवकाशाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात कुतूहल निर्माण होण्यासह त्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि भविष्यात शास्त्रज्ञ निर्माण होण्यासाठी मोलाची मदत होणार आहे.

जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अवकाशाबद्दल कुतूहल निर्माण व्हावे तसेच बालवयातच अवकाश संशोधनाची गोडी लागावी यासाठी परीक्षेद्वारे विद्यार्थ्यांची निवड करीत इस्रो या अवकाश संशोधन संस्थेला शैक्षणिक भेट देणे तसेच शंभर शाळांमध्ये वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारणीसाठी नियोजन केले जात आहे. या अनोख्या उपक्रमासाठी सुमारे दोन कोटींचा निधी लागणार असून जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालयाकडे निधीच्या मागणीचा प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी दिली.

झेडपी शाळांमधील मुलांचे वाचन, लेखन, गणन इ. पायाभूत कौशल्य विकसित व्हावेत यासाठी शंभर दिवसांचा निपुण भारत गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम, इंग्रजी अध्ययन समृद्धी कार्यक्रम, इयत्ता ५ वी आणि ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी चार पूर्वपरीक्षा, मराठी भाषा दिनी दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्यार्थी व शिक्षकांचे जिल्हास्तरीय साहित्य संमेलनाचे आयोजन. शाळांमधील शैक्षणिक व भौतिक सुविधांच्या विकासासाठी सीएसआर निधी मिळविणे. तसेच शिक्षक प्रशिक्षण कक्षाच्या उभारणीसाठी निधी मागणीचा प्रस्ताव तयार केला आहे.

> इस्रो अवकाश संशोधन संस्थाना शैक्षणिक भेट देण्यासाठी जिल्हा परिषद शाळेतील ५० विद्यार्थ्यांचा संच घेऊन जाण्याचे नियोजन करण्यात येत आहे. तसेच शंभर शाळांमध्ये वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारणी करणे या उपक्रमासाठी दोन कोटी रुपये निधीची मागणी जिल्हा नियोजन कार्यालयाकडे करणार आहोत."
> **— संजय नाईकडे**
> शिक्षणाधिकारी, प्राथमिक, पुणे जिल्हा परिषद

अवकाश संशोधन संस्था शैक्षणिक भेटीसाठी जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या ५० गुणवंत विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. त्यासाठी केंद्रस्तर, बीटस्तर, तालुकास्तर व जिल्हास्तरावरून विज्ञान व गणित या अभ्यासक्रमावर आधारित लेखी परीक्षा घेऊन निवड प्रक्रिया राबविली .

जिल्ह्यातील ३ हजार ६२१ जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्राथमिक शिक्षण विभागाने विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन केले आहे. त्यापैकी बंगळुरू येथील इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (इस्रो) या अवकाश संशोधन संस्थेने शैक्षणिक भेट सहल ही पाच दिवसाची असेल. त्यामध्ये इस्रोच्या स्थापनेपासूनचा इतिहास, आजपर्यंत केलेल्या अवकाश संशोधन मोहिमा, संस्थांमध्ये संशोधन कसे केले जाते ? शास्त्रज्ञ कसे काम करतात ? अवकाश संशोधनात करिअर कसे करावे ? त्यासाठी शिक्षण आणि विविध परीक्षा आदींबाबतची माहिती मिळण्यास मदत होईल आणि या भेटीमुळे अवकाशाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात कुतूहल निर्माण होण्यासह त्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि भविष्यात शास्त्रज्ञ निर्माण होण्यासाठी मोलाची मदत होणार आहे.

जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अवकाशाबद्दल कुतूहल निर्माण व्हावे तसेच बालवयातच अवकाश संशोधनाची गोडी लागावी यासाठी परीक्षेद्वारे विद्यार्थ्यांची निवड करीत इस्रो या अवकाश संशोधन संस्थेला शैक्षणिक भेट देणे तसेच शंभर शाळांमध्ये वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारणीसाठी नियोजन केले जात आहे. या अनोख्या उपक्रमासाठी सुमारे दोन कोटींचा निधी लागणार असून जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालयाकडे निधीच्या मागणीचा प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी दिली.

झेडपी शाळांमधील मुलांचे वाचन, लेखन, गणन इ. पायाभूत कौशल्य विकसित व्हावेत यासाठी शंभर दिवसांचा निपुण भारत गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम, इंग्रजी अध्ययन समृद्धी कार्यक्रम, इयत्ता ५ वी आणि ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी चार पूर्वपरीक्षा, मराठी भाषा दिनी दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्यार्थी व शिक्षकांचे जिल्हास्तरीय साहित्य संमेलनाचे आयोजन. शाळांमधील शैक्षणिक व भौतिक सुविधांच्या विकासासाठी सीएसआर निधी मिळविणे. तसेच शिक्षक प्रशिक्षण कक्षाच्या उभारणीसाठी निधी मागणीचा प्रस्ताव तयार केला आहे.

अवकाश संशोधन संस्था शैक्षणिक भेटीसाठी जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या ५० गुणवंत विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. त्यासाठी केंद्रस्तर, बीटस्तर, तालुकास्तर व जिल्हास्तरावरून विज्ञान व गणित या अभ्यासक्रमावर आधारित लेखी परीक्षा घेऊन निवड प्रक्रिया राबविली जाणार आहे.

## अवतीभवती
CITY UPDATE



डावीकडून (बसलेले) सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली व सीएमए निलेश केकाण, (उभे) सीएमए हिमांशू दवे व सीएमए राहुल चिंचोलकर

### 'आयसीएमएआय' पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी सीएमए नीलेश केकाण

**पुणे :** दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी सीएमए नीलेश केकाण यांची निवड झाली आहे. मावळते अध्यक्ष सीएमए नागेश भागणे यांच्याकडून त्यांनी कार्यभार स्वीकारला. उपाध्यक्षपदी सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली, सचिवपदी सीएमए राहुल चिंचोलकर, तर खजिनदारपदी सीएमए हिमांशू दवे यांची निवड झाली आहे. २०२४-२५ या वर्षाकरिता नव्या कार्यकारिणीची निवड नुकतीच करण्यात आली. व्यवस्थापन समिती सदस्य म्हणून सीएमए नागेश भागणे, सीएमए अमेय टिकले, सीएमए तनुजा मंत्रवादी, सीएमए अनुजा दाभाडे आणि सीएमए निखिल अगरवाल, विद्यार्थी प्रतिनिधी जयदीप माने देशमुख यांचा समावेश आहे. यावेळी माजी अध्यक्ष अमित आपटे, ज्येष्ठ सदस्य सीएमए डॉ. संजय भार्गवे, सीएमए डॉ. एन. के. निमकर, सीएमए अभय देवधर, सीएमए प्रमोद दुबे, सीएमए प्रसाद जोशी, सीएमए मीना वैद्य आणि संस्थेच्या सर्व सदस्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदाची संधी दिल्याबद्दल सर्व सदस्यांचे आभार मानत सीएमए नीलेश केकाण म्हणाले, "वाणिज्य किंवा इतर क्षेत्रातील विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे करिअरची संधी उपलब्ध करून देणे आणि उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना योग्य पॅकेजप्रमाणे नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे. संस्थेच्या सदस्यांना नवीन ट्रेंड प्रमाणे शिक्षण देऊन विकसित करणे, हा उद्देश घेऊन वर्षभर काम करणार आहे. सदस्यांसाठी आयपी, आरव्ही, इन्व्हेंटरी ऑडिट, सोशल ऑडिट आदी विषयांवर सत्रे, कार्यशाळा घेण्यावर भर दिला जाणार आहे." सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली, सीएमए राहुल चिंचोळकर, सीएमए हिमांशू दवे यांनीही यावेळी निवडीबद्दल आनंद व्यक्त करत मनोगत मांडले.

## एक जून पासून शहरातील वाहतुकीत बदल



**पुणे :** शहरातील वाहतुकीत मोठा बदल करण्यात आला आहे. शिवाजीनगर न्यायालय ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ जंक्शन दरम्यान मेट्रोचे काम सुरु आहे. यामुळे गणेशखिंड रस्त्यावरील वाहनचालकांना त्रासाचा सामना करावा लागत आहे. आता या मार्गावरील गर्दी टाळण्यासाठी पुणे शहर पोलिसांनी वाहतुकीत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. 1 जूनपासून पुढील आदेशापर्यंत गणेशखिंड रस्त्यावरील वाहने पर्यायी मार्गावर वळवली जाणार आहेत.

वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त रोहिदास पवार यांनी याबाबत एक पत्रक जारी केले आहे. यात पवार यांनी म्हतले की, 'गणेशखिंड रस्त्यावर असणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ जंक्शनवर पोर्टर बीम बांधण्याचे काम सुरु आहे. COEP वसतिगृहाजवळील असणाऱ्या पाणीपुरवठा लाईनच्या स्थलांतराचे काम सुरु आहे. तसेच मेट्रो प्रकल्पासाठी पाच नवीन खांब उभारण्याचेही काम सुरु आहे, त्यामुळे वाहतुक कोंडी होण्याची शक्यता आहे, त्यामुळे वाहतूक वळवण्यात येणार आहे.

पुण्याचे अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील आणि DCP पवार यांनी सांगितले की, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी सर्व वाहनांना रेंजहिल्स चौकातून गणेशखिंड मार्गे शिवाजीनगरकडे जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. आता शिवाजीनगरकडे जाणारी वाहने कृषी महाविद्यालयमार्गे नरवीर तानाजी वाडी जंक्शनकडे वळवून शिमला ऑफिस चौकात जातील. त्यानंतर शिमला ऑफिस जवळून अंडरपास वापरून वाहने पुढे पुणे रेल्वे स्टेशन, RTO कडे किंवा अहमदनगर महामार्गावर जाऊ शकतील. पुढे बोलताना DCP पवार म्हणाले की, 'ब्रेमेन चौक (औंध रस्ता) ते विद्यापीठ जंक्शनपर्यंतच्या रस्त्यावर फक्त दुचाकी, तीन चाकी आणि चारचाकी लहान वाहनांना परवानगी असेल.

### नागरिकांच्या जीवाची परवा न करता

## महावितरणच्या पत्राला पालिकेची केराची टोपली

**पुणे :** विद्युत वाहिनीवरून चुकीच्या पध्दतीने पावसाळी वाहिनी टाकू नका, अशी सूचना महावितरणने करून देखील महापालिकेने मनमानी पध्दतीने पावसाळी वाहिनी टाकण्याचे काम सुरू ठेवले आहे. या ठिकाणी पावसाळी वाहिनी टाकल्याने येथील विद्युत वाहिनीला धोका होऊ शकतो हे लक्षात आल्यावर येथील काही नागरिकांनी मागील पंधरा दिवसांपूर्वी याविषयी महावितरणला कळविले होते. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी हे काम तातडीने थांबविले होते. हे काम चुकीच्या पध्दतीने करू नका, असे पत्रही महावितरणने महापालिकेला दिले होते. मात्र, महावितरणच्या या पत्राला केराची टोपली दाखवून महापालिका प्रशासनाने हे काम करित असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

> विद्युत वाहिनीवरून पावसाळी वाहिनी टाकण्याचे काम सुरू होते. मागील पंधरा दिवसांपूर्वी आम्ही हे काम थांबविले होते. चुकीच्या पध्दतीने येथे पावसाळी वाहिनी टाकू नका, असे पत्रही महापालिकेला दिले होते. मात्र, त्यांनी हे काम पुन्हा सुरू केल्याने आम्ही पुढील कार्यवाही करणार आहोत."
> **— जितेंद्र भिरूड**
> कार्यकारी अभियंता, महावितरण

घोरपडी येथील नवीन रेल्वेउड्डानपुलाच्या पिलरच्या शेजारी महावितरण कंपनीची उच्चदाब विद्युत वाहिनी आहे. या वाहिनीच्या वरून पावसाळी वाहिनी टाकण्याचे काम महापालिकेकडून सुरू होते. उड्डाणपुलाच्या खाली महापालिका चुकीच्या पध्दतीने पावसाळी वाहिनी टाकत आहे. त्यामुळे येथील विद्युत वाहिनीला धोका निर्माण झाला आहे.

> घोरपडी येथील उड्डाणपुलाखाली विद्युतवाहिनी आहे. या वाहिनीपासून पुरेस अंतर ठेवून पावसाळीवाहिनी टाकली आहे."
> **— अभिजीत आंबेकर**
> कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग, महापालिका

### पुण्याचे जिल्ह्याधिकारी सुहास दिवसे वादाच्या भोवऱ्यात

**पुणे :** जिल्ह्याअधीकारी सुहास दिवसे हे खेड आळंदीचे आमदारांच्या प्रभावाखाली काम करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. सुहास दिवसे हे राजकीय प्रभावातून काम करत असून मतमोजणीआधी त्यांची बदली करावी अशी खेडचे प्रांताधिकारी आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी जोगेंद्र कट्यारे यांनी निवडणूक आयोगाकडे केलीय. या तक्रारीत प्रांत अधिकारी जोगेंद्र कट्यारे यांनी जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्यावर अनेक गंभीर आरोप केलेत. खेडचे प्रांताधिकारी आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी जोगेंद्र कट्यारे म्हणाले, सुहास दिवसे हे खेड आळंदीचे आमदारांच्या प्रभावाखाली काम करत आहेत. सुहास दिवसे हे अनेक वर्षे कृषी आयुक्त, क्रिडा आयुक्त, पी एम आर डी ए चे संचालक अशा विविध पदांवर काम करत पुण्यातच ठाण मांडून आहेत. त्यासाठी त्यांनी त्यांच्या राजकीय हितसंबंचा आधार घेतला आहे. सुहास दिवसे यांनी माझ्या कार्यकाळात झालेल्या जमिन अधिग्रहण प्रकरणांची आधीच चौकशी सुरू केलेली असताना 28 मे रोजी त्यांनी खेडच्या तहसील कार्यालयात पुन्हा छापा घातला. सुहास दिवसे यांनी हे सर्व खेड आळंदीच्या आमदारांच्या प्रभावातून केले आहे.

## ते रक्त आईचे नाही पोलिसांचा खुलासा



**पुणे :** मुलाच्या रक्ताच्या नमुन्याऐवजी अन्य दुसऱ्या कुणाचे रक्त दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. या प्रकरणात मुलाच्या आईनेच रक्त दिल्याची चर्चा रंगली असताना रक्ताच्या नमुन्याचा प्राप्त झालेला अहवाल व नमुन्यासाठी दिलेले रक्त अल्पवयीन मुलाच्या आईचे नसल्याची माहिती वरिष्ठ पोलिस सूत्रांनी दिली आहे. कारण, पोलिसांनी गुपचुपपणे काढलेल्या रक्ताच्या डीएनएशी आईच्या रक्ताचे नमुने जुळले असते. परंतु, पोलिसांच्या तपासात ते नमुने जुळले नसल्याचे यापूर्वीच पोलिसांनी सांगितले होते, असेही आता स्पष्ट झाले आहे.

दाखल गुन्ह्यानुसार दि. 20 मे रोजी रात्री अडीचच्या सुमारास एका अल्पवयीन मुलाने दारू पिऊन त्याच्याकडील पोर्शे कारने दुचाकीवर जाणाऱ्या तरुण-तरुणीला उडविले होते. या जोरदार अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. त्यानंतर समाज माध्यमांवर पोलिसांवर तसेच अन्य यंत्रणांवर मोठ्या प्रमाणावर टीका झाली होती. याप्रकरणी मुलाच्या वडिलासह त्याच्या आजोबाला देखील अटक झाली होती. त्याला मद्य पुरविणाऱ्या पबचालकासह मॅनेजरला देखील अटक झाली होती. या प्रकरणात येरवडा पोलिसांनी दिरंगाई केल्याचा प्रकार लक्षात आल्यानंतर व पोलिस कंट्रोल रूमला माहिती न कळविल्याने त्यांचे निलंबन करण्यात आले होते.

या प्रकरणात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घटनेचे गांभीर्य पाहता पोलिस आयुक्तालयात येऊन प्रकरणाची माहिती घेतली होती. पुढे तपासात मुलाच्या रक्ताचे सकाळी घेण्यात आलेले नमुनेच बदलण्यात आले होते. हे नमुने बदलण्यामध्ये मुलाच्या वडिलाचा सहभाग होता. मुलाच्या वडिलाला अटक झाल्यानंतर त्याच्या देखील रक्ताचे नमुने घेण्यात आले होते. पोलिसांनी घटनेच्या सायंकाळी अठरा तासांनंतर मुलाचे गुपचुप रक्त घेतले होते. अपघाताच्या दिवशी सकाळी घेतलेले रक्त व मुलाच्या वडिलाच्या रक्ताच्या नमुन्यांचा डीएनए जुळला नाही. मात्र, सायंकाळी घेतलेल्या रक्ताचे नमुने आणि मुलाच्या वडिलाच्या रक्ताचे नमुने जुळले.

जर सकाळचे घेतलेले रक्त आईचे होते, तर सायंकाळी अल्पवयीन मुलाच्या घेण्यात आलेल्या रक्ताच्या नमुन्याशी डीएनए का जुळला नाही? एकीकडे वडिलाच्या डीएनएशी घटनेच्या दिवशी सायंकाळी मुलाचे घेतलेले नमुने जुळले, असे बोलले जात असताना मग सकाळी आईच्या रक्ताचे नमुने घेतले असतील, तर त्याचा डीएनए वडिलाच्या डीएनएशी किंवा सायंकाळी मुलाच्या डीएनएशी जुळला नाही.

## विद्यापीठाचे बनावट पदवी प्रमाणपत्र भेटल्याने खळबळ

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळाशी साधर्म्य असलेल्या एका संकेतस्थळावरून गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र खरे असल्याचा दावा तरुण करीत आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या नावे खोटे संकेतस्थळ विकसित करून बनावट गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्र देणारे रॅकेट कार्यरत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतून बी.कॉम. पदवी उत्तीर्ण असल्याची बनावट गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्र सापडल्याने शैक्षणिक वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे या खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे त्या व्यक्तीने एका नामांकित खासगी बँकेत नोकरी मिळविली आहे.



> बँक व्यवस्थापकाने चार महिन्यांपूर्वी आमच्याशी संपर्क साधला. व्यक्तीने २०१२, १३ आणि १४ या तीन वर्षांच्या कालावधीत बी.कॉम. पदवी उत्तीर्ण झाल्याच्या गुणपत्रिका दिल्या आहेत. मात्र, तेव्हा कॉलेजमध्ये कॉमर्स पदवी अभ्यासक्रम सुरू झालेला नव्हता. त्यामुळे सदर व्यक्ती आमचा विद्यार्थी नाही. गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्र खोटे आहे, अशी माहिती आम्ही ई-मेलद्वारे बँकेला पाठविली आहे." **— डॉ. एस. एम. समुद्र**
> प्राचार्य, के. जी. कटारिया कॉलेज, दौंड

> फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल केला आहे; तसेच ठाणे शहरातील कापूरबावडी पोलिस ठाण्यात तपासासाठी वर्ग करण्यात आला आहे." **— युवराज नांद्रे**
> पोलिस निरीक्षक, चतु:शृंगी पोलिस ठाणे

> परीक्षा विभागाने केलेल्या पडताळणीत तरुणाकडील सत्र १ ते ६ च्या गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्र बनावट असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यावरून पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे." **— डॉ. महेश काकडे**
> संचालक, परीक्षा व मूल्यमापन कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# मान्सून आला रे...

जीवघेण्या उकाड्याने त्रस्त झालेला अखंड भारत देश चातक पक्ष्यासारखी मान्सूनची प्रतीक्षा करत आहे. तापमानाच्या पाऱ्याने शेअर बाजारापेक्षा अधिक वेगाने भरारी घेतल्यामुळे लोकांचे जीवनमान असह्य बनले आहे. भरीस भर म्हणून वीजपुरवठ्याची अनियमितता वाढत आहे. परिणामी हा वैशाख वणवा सर्वसामान्यांना उद्विग्न करणारा ठरत आहे. या त्रासलेल्या स्थितीमध्ये एक दिलासादायक बातमी म्हणजे अंदमानच्या समुद्रामध्ये पूर्वअंदाजित वेळेनुसार मान्सूनराजाचे आगमन झाले असून त्याने दमदार सलामी दिली आहे. मान्सून साधारणपणे २२ मे च्या सुमारास अंदमान आणि निकोबार बेटांच्या किनारपट्टीवर पोहोचतो. पण यंदा त्या आधीच मान्सूनने दस्तक दिली आहे. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार एल निनो प्रणाली कमकुवत होत आहे. ला निना परिस्थिती सुधारली आहे. आगामी काळात यात आणखी सुधारणा होण्याची शक्यता आहे. ला नीना सोबत हिंद महासागर द्विध्रुव परिस्थिती देखील २०२४ पर्यंत या वर्षी चांगल्या मान्सूनसाठी अनुकूल दिसते. ही सर्व चिन्हे चांगल्या मान्सूनकडे बोट दाखवत आहेत. साधारणपणे १० जूनपर्यंत मान्सून महाराष्ट्रात दाखल होतो. यंदा वेळेवर येण्याची अपेक्षा आहे. मागील काही वर्षांमध्ये जानेवारी–फेब्रुवारी–मार्च या महिन्यांमध्ये झालेल्या गारपिटीमुळे आणि अवकाळी पावसामुळे तसेच जून महिन्यात आलेल्या चक्रीवादळांमुळे मान्सूनचे आगमन, वाटचाल यामध्ये व्यत्यय येत गेला होता. यंदा तशी स्थिती दिसत नसल्याने मान्सून मनसोक्त बरसेल असे दिसते आहे. भारताच्या जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचे योगदान १५–२० टक्के आहे. सिंचन सुविधांचा विस्तार होऊनही आपल्या देशातील बहुतांश शेती मान्सूनवर अवलंबून आहे. पाऊस कमी किंवा उशिरा झाला तर शेती उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. तसेच विकासावर परिणाम होऊन महागाई वाढू शकते. २०१५ व २०१७ ही दोन वर्षे महाराष्ट्रात भीषण दुष्काळी स्थिती होती तेव्हा कृषीक्षेत्राचा विकास दर दीड ते दोन टक्क्यांनी घसरला होता. दुष्काळी स्थितीमुळे कृषी व संलग्न क्षेत्रात दोन वर्षे मंदी दिसून आली होती. कृषीसामग्रीसह अन्य अनेक क्षेत्रांमध्ये मागणी आक्रसल्याचे दिसले होते. त्यातून रोजगारावरही प्रतिकूल परिणाम झाला होता. या पार्श्वभूमीवर यंदा वेळेवर दाखल झालेला मान्सून पुढील चार महिने धुवाँधार बरसावा हीच सर्वांची आर्त इच्छा आहे. विशेषतः महागाईच्या दृष्टीने विचार करता मान्सूनवर सध्या सर्वांची भिस्त आहे. रिझर्व्ह बँकेने दीर्घकाळ रेपोदर स्थिर ठेवण्यामागे जागतिक कारणांबरोबरच देशांतर्गत अन्नधान्य महागाईचाही मुद्दा आहे, हे लक्षात घ्यायला हवे. देशात मान्सूच्या काळात सरासरी ८९ सेंटीमीटर पाऊस पडतो. गेल्या ५० वर्षातील नोंदीनुसार मान्सूच्या सरासरीच्या ९६ ते १०४ टक्के एवढा पाऊस नोंदण्यात आला आहे. चांगल्या पावसाचा परिणाम खरीप पिकांच्या उत्पादनावर होतो आणि त्यामुळे काही विशेष खाद्यान्नाचे भाव कमी होऊ शकतात. तांदूळ, बाजरी, कापूस, मका, सोयाबीन आदी खरीप पिक असून त्यांचे उत्पादन बहुतांशवेळा चांगल्या पावसावर अवलंबून असते. त्यांची पेरणी जून–जुलैपासून सुरू हेते. अशावेळी पाऊस चांगला राहिला तर त्यांचे उत्पादन वाढेल आणि महागाईवर काही प्रमाणात नियंत्रण मिळवता येणे शक्य आहे. महागाई कमी झाली तर अर्थव्यवस्थेला फायदा मिळेल. मान्सूनची साथ लाभल्याखेरीज देशाच्या आर्थिक विकासाची चाके गतिमानतेने फिरत नाहीत. हवामान विभागाकडून मान्सूनची सरासरी कमी असल्याचा अंदाज वर्तवला गेल्यास शेअर बाजारातही त्याचे टोकाचे नकारात्मक पडसाद उमटतात हे आपण पाहिले आहे. कारण यामुळे शेतीवर आधारीत अर्थव्यवस्था बाधित होऊन ग्रामीण मागणी आक्रसण्याची शक्यता निर्माण होते. हे टळण्यासाठी मान्सूनच्या आगमनाबरोबरच त्याचे वितरणही समाधानकारक होणे आवश्यक आहे. अलीकडील काळात पर्जन्यवितरणातील विषमता वाढत आहे. पावसाचे दिवस कमी होत आहेत. कमी कालावधीत जास्त पाऊस पडण्याच्या घटना वाढत आहेत. पूर्वी जवळपास ७० ते ८० दिवस पाऊस पडत होता. आता पावसाचे दिवस घसरत घसरत ३० पर्यंत खाली आले आहेत. म्हणजेच ३० दिवसात पडणारा पाऊस आपल्याला ३६५ दिवस संभाळून ठेवायचा आहे. तरच आपल्याला वर्षभर पाणी मिळू शकेल. गेल्या १००–१५० वर्षांहून अधिक काळचा इतिहास पाहिल्यास मान्सून आलाच नाही असे एकदाही घडलेले नाहीये. पावसाळ्याच्या चार महिन्यात तो मनसोक्त बरसतो; पण ‘देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी गं’ अशी आपली अवस्था आहे. कारण पडणाऱ्या पावसाचे नियोजन करण्यात आजही आपण कमालीचे उदासीन आहोत. एका अंदाजानुसार, दरवर्षी भारतात पुढील दोन वर्षे पुरेल इतका पाऊस दरवर्षी पडतो. पण आपण त्याचे संकलनच करत नाही. पूर्ण भारतामध्ये केवळ १० टक्के पाण्याचे संकलन होते. ही स्थिती बदलण्याची प्रतीक्षा आजही कायम असणे हे आपल्या व्यवस्थेचे अपयश आहे. सिंचनाच्या मुद्दयावरुन राजकारण रंगते, आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी झडतात, प्रचंड निधी खर्च होतो; पण तरीही एखाद्या वर्षी पावसाने दडी मारली, मान्सूनचे आगमन लांबले, कमी वर्षा झाली तर सबंध कृषीक्षेत्राचे अर्थकारण कोलमडते. याचे कारण पडणारा पाऊस अडवण्यासाठी, जमिनीत मुरवण्यासाठी, धरणांमध्ये साठवण्यासाठी आणि त्याचे वितरण निर्दोष करण्यासाठी काटेकोरपणाने नियोजनच कधी केले गेले नाही. दरवर्षी मोठमोठाल्या घोषणांचे फुगे हवेत सोडून जनतेची दिशाभूल करत राहण्यात आपल्या शासनकर्त्यांनी समाधान मानले; पण त्यामुळे पाणीप्रश्न तसाच कायम राहिला. सरकारे बदलली की जुन्या योजना बदलल्या जातात आणि त्यावर केलेला खर्च वाया जातो. आज मराठवाड्यासारखा भाग असेल किंवा फलटणसारखा मध्य महाराष्ट्रातील भाग असेल, जत–कवठेमहांकाळ असेल यांसारख्या भागातील पाणीप्रश्न दोन–दोन पिढ्यांपासून आपण सोडवू शकत नसलो तर मान्सून कितीही बरसून उपयोग काय? त्यामुळे चांगल्या पावसाच्या अंदाजावरुन समाधान मानताना पाण्याचा काटकसरीने वापर करण्यापासून ते जलसंचयापर्यंतच्या सर्व पातळ्यांवर सुधारणांची गरज आहे. यंदाच्या वर्षी कदाति निवडणुकांमुळे असेल, पण पुण्याला पाणीकपातीच्या संकटाला सामोरे जावे लागले नाही; परंतु पुण्याजवळच्या उपनगरांसह राज्यात अन्यत्र अनेक ठिकाणी भीषण स्थिती आजही आहे. विशेषतः गेल्या काही वर्षांत शहरांजवळ उदयास आलेली उपनगरे ही भूजलावरच वाढत आहेत. तेथे जमिनीत पाणी मुरवण्यासाठी आतापासूनच प्रयत्न केले नाहीत तर भविष्यात गंभीर स्थिती उद्‌भवू शकते. त्यामुळे वर्षाजल संचय अर्थात रेनवॉटर हार्वेस्टिंगबाबत कठोर नियम करुन त्यांची अमलबजावणी व्हायला हवी. तसेच तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पाण्याचा पुनर्वापर करता येणे शक्य होत असूनही त्याबाबत शासकीय स्तरावर भरीव प्रयत्न होताना दिसत नाहीत. यासंदर्भात सिंगापूर, इस्त्राईलसारखी उदाहरणे समोर असूनही आपण जर त्यामध्ये मागे राहात असू तर विकसित भारत, हर घर नल यांसारख्या योजनांना अर्थच उरणार नाही. तेव्हा पडणाऱ्या पावसाचा थेंब न थेंब साठवण्याचा संकल्प करुनच मान्सूनचे स्वागत व्हायला हवे.

संपूर्ण जग हरित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत आहे. हे सर्व सौर आणि पवनसारख्या शाश्वत ऊर्जेच्या भरवशावर करत असून परिणामी गॅसची कसर भरुन काढली जाईल. वाहतूक व्यवस्थेतील तेलाची गरज संपुष्टात आणण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांकडे संपूर्ण जग वळत आहे. उद्योग आणि ऊर्जेला जीवाश्म इंधनाची गरज भासणार नाही यासाठी हायड्रोजनकडे जग वळत आहे. या तीन मोठ्या बदलांच्या आधारावर जगाचे तापमान वाढीला कारणीभूत असलेल्या उत्सर्जनाचे प्रमाण कमी होऊ शकते, अशी आशा आहे. मात्र हरित जगाकडे नेणाऱ्या व्यापारतंत्राच्या मॉडेलचे काय करणार?

# हरित अर्थव्यवस्थेची दुसरी बाजू



संपूर्ण जग हरित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत आहे. हे सर्व सौर आणि पवनसारख्या शाश्वत ऊर्जेच्या भरवशावर करत असून परिणामी गॅसची कसर भरुन काढली जाईल. वाहतुक व्यवस्थेतील तेलाची गरज संपुष्टात आणण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांकडे संपूर्ण जग वळत आहे. उद्योग आणि ऊर्जेला जीवाश्म इंधनाची गरज भासणार नाही यासाठी हायड्रोजनकडे जग वळत आहे. या तीन मोठ्या बदलांच्या आधारावर जगाचे तापमान वाढीला कारणीभूत असलेल्या उत्सर्जनाचे प्रमाण कमी होऊ शकते, अशी आशा आहे. या तापमानवाढीमुळे जगाच्या कानाकोपऱ्यात नैसर्गिक संकटांचे विविध रुप पाहवयास मिळत आहे.

जगाला अत्यंत वेगाने अणि सर्वंकष रुपातून पुढे जाण्याची गरज आहे आणि तशी अपेक्षा बाळगणेही चुकीचे नाही. मात्र हरित जगाकडे नेणाऱ्या व्यापारतंत्राच्या मॉडेलचे काय करणार? असा प्रश्न विचारण्याचे कारण म्हणजे या स्त्रोतांचा उपयोग करणारे जुने मॉडेलच अनेक समस्यांना कारणीभूत आहे, यात सामाजिक आणि पर्यावरणीय दुष्परिणाम देखील जोडले गेले आहेत. आता खाण उत्खननाचे प्रकरण पाहू. कोळसा असो, पोलाद असो, कच्चे खनिज असो किंवा अल्युमिनिअम. ऊर्जा आणि उद्योगांच्या गरजांसाठी या कच्च्या मालांचे उत्खनन होत असल्याने पर्यावरणाची मोठी हानी झाली आहे. भारतातही त्याचे भयावह रुप दिसत आहे. अशा प्रकारची खनिज संपदा ही जंगल, वन्यजीवांचा अधिवास आणि आदिवासींच्या रहिवास क्षेत्राजवळच असतो. म्हणजेच हे स्त्रोत समृद्ध जमीन आणि गरीब लोकांच्या जीवनाशी संबंधित आहेत.

आपल्या अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक असणारा खनिजसाठा मिळवण्यासाठी आपल्याला जंगलतोड करावी लागत आहे आणि स्थानिक समुदायांना अन्यत्र जावे लागत आहे. अशा प्रकारचे उत्खनन आणि महसूल मिळवून देणाऱ्या आर्थिक मॉडेलची नकारात्मक बाजू म्हणजे या ठिकाणच्या लोकांना स्त्रोतांचा लाभ मिळालाच असे नाही. हीच गोष्ट जगात वाईटरित्या राबविली जात असून त्यामुळे उद्योगातील वाढते उत्सर्जन सर्वांनाच विनाशकारी हवामान बदलाकडे नेत आहे. नव्या हरित अर्थव्यवस्थेतही जगाला खनिजांची गरज भासणार आहे. मग ते वेगवेगळ्या प्रकारचे का असेनात. लीथियम, निकेल, कॉपर, कोबाल्ट, ग्रेफाइट आणि हे सर्व खनिज दुर्गम भागात, घनदाट जंगलात आढळून येतात. खनिजासारखे मौल्यवान धातू सामान्य समाजरचनेपासून कोसो दूर असलेल्या वंचित लोकांच्या जमीनीवरच सापडतात. केवळ भारतच नाही तर संपूर्ण जगात असेच चित्र आहे. न्यूयॉर्कमध्ये मुख्यालय असलेल्या एका बाजाराचे सल्लागार ‘एमएससीआय’च्या एका अहवालानुसार, अमेरिकेत निकेलचा ९७ टक्के, तांब्याचा ८९ टक्के, लीथियमचा ७९ टक्के आणि कोबाल्टचा ६८ टक्के साठा हा केवळ ५५ किलोमीटर क्षेत्रापुरतीच मर्यादित आहे. हा भाग मूळ अमेरिकी वंशाच्या नागरिकांसाठी सुरक्षित आहे. मध्य अमेरिकेपासून आफ्रिका, आशियात असणाऱ्या संरक्षित भागाची अशीच स्थिती आहे.

एकपरीने हरित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्याचा अर्थ म्हणजे अशा खनिज स्त्रोतांच्या गरजेत अनेक पटीने वाढ करणे आहे का? याउपरही आपली पृथ्वी आणि त्यावर राहणाऱ्या नागरिकांच्या वर्तनात काही फरक पडणार आहे का? संघर्ष तर अगोदरपासूनच आहे. उदा. अमेरिकेतील ॲरिझोना भागात दिग्गज कंपन्यांनी रियो टिंटो आणि व्हीएचपी बिलिटनच्या रिझोल्यूशन येथे तांबे उत्खनन केल्याने परिसरातील मूळ निवासी समुदाय संतप्त आहे. कारण हे उत्खनन त्यांच्या पवित्र जमीनीवर होत आहे. संपूर्ण जगात नव्या धातूंच्या आणि पर्यायांची शोधाशोध सुरू असताना तेथेही अशीच स्थिती आहे. या उद्योगात कोणतेही नवीन नियम आणि कायदे नाहीत. आपल्याकडे खनिज उत्खननाला पर्यावरण आणि सामाजिक रुपातून तर्कसंगत करताना बराच काळ घालविला. मात्र दुर्दैवाने त्यावर समाधानकारक तोडगा निघाला नाही. अनेक वर्षापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने आदिवासी समुदायाचा सहभाग असल्याशिवाय त्यांच्या जमीनीवर कोणतेही उत्खनन होणार नाही, असे बजावले होते. याचाच अर्थ आदिवासींना किमान या व्यवसायात बरोबरीचा वाटा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली गेली. मात्र त्यास नाकारण्यात आले. यानंतर उत्खननानंतर मिळणाऱ्या महसूलाचा वाटा हा स्थानिक समुदायाला देण्यात यावा, यासाठीही प्रयत्न केले गेले. मात्र ते देखील नाकारण्यात आले. अखेरचा प्रयत्न म्हणून उत्खननापासून मिळणाऱ्या महसुलाचा वाटा स्थानिक समुदायांना देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

जिल्हा खनिज फाउंडेशन (डीएमएफ) स्थापन करताना त्याच्या पहिल्याच मसुद्यात स्थानिक समुदायांना व्यवसायात भागीदार करुन घेण्याचा मुद्दा होता. मात्र त्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. नफ्यातील वाटा देणे किंवा खनिजकामाच्या विकासात लोकांना सहभागी करून घेण्याचा व्यापक विचार हा केवळ खनिजावर अतिरिक्त उपकर लागू करण्यापुरतीच मर्यादित राहिला. हा उपकर ‘डीएमएफ’कडे जमा केला जात होता आणि सरकारकडून या निधीचा वापर स्थानिक लोकांसाठी करण्याऐवजी त्यांच्या मुळावर येणाऱ्या कामांना दिला आणि त्यालाच आपण विकास म्हणतो. पर्यावरण अणि जंगलातील कामासंबंधीच्या परवानग्याच्या बाबतीतही अशीच स्थिती आहे. याचा उद्देश स्थानिक समुदायांच्या परवानगीने विविध विकास कामे सुरू करण्याचा अधिकार देण्याचा होता. नवीन वन भूमीवर कोणताही प्रकल्प सुरू करताना त्यावर येणाऱ्या आक्षेपांना महत्त्व देण्यात आले होते. मात्र विकासाच्या नावावर हे संरक्षण देखील काढून घेतले जात आहे. पण त्याकडे सामाजिक रुपातून पाहिल्यास सर्वसमावेशक आणि संपूर्ण हरित भविष्य उभारणीत मदत मिळू शकते, हे लक्षात घेतले पाहिजे.

जुन्या अर्थव्यवस्थेत नेहमीच वादग्रस्त ठरणारा एक विषय असतो आणि ती म्हणजे प्रकल्पाची जागा. प्रकल्पातील तप्त पोलाद, आग ओकणाऱ्या भट्ट्यांमुळे स्थानिक समुदायांना प्रदूषणाचा आणि त्यांच्या जीवनमानावर तसेच उदरनिर्वाहावर परिणाम होण्याची भीती वाटायची. आता पवन चक्की आणि सौर ऊर्जेबाबतही प्रश्न उपस्थित केला जात आहे. वास्तविक वन्यप्राण्यांचा अधिवास असणाऱ्या भागातच त्याची उभारणी केली जात आहे. यातही आता प्रश्न उपस्थित होत आहे. म्हणून नव्याने प्रस्थापित होणाऱ्या हरित अर्थव्यवस्थेत सरकार संघर्ष टाळणारे आणि तोडगा काढणारे नियम तयार करतील का?जेणेकरून या माध्यमातून स्थानिक समुदाय आणि पर्यावरणाचे संरक्षण केले जाईल. या बदलाकडे धावण्याचा अर्थ जुनेच किंवा त्यापेक्षा वाईट मार्ग अंगीकारणे आहे का? जुन्या अर्थव्यवस्थेच्या काळात संपदा वृद्धीचा प्रत्यक्षपणे गरीब जनतेला काही फायदा झाला नाही. ज्या ठिकाणी कोळसा काढला जातो, ऊर्जा निर्मिती होते तेथेच आता अंधार आहे. नवीन अर्थव्यवस्थेत सर्वसमावेशक बदलाची हमी आहे का? असे घडले तरच ते शाश्वत राहू शकते. नाही झाले तर नव्या अर्थव्यवस्थेला नवीन म्हणणे योग्य ठरणार नाही आणि हरितही म्हणता येणार नाही.

**– सुनीता नारायण,**
**ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ, नवी दिल्ली**

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग
**शनिवार, दिनांक १ जून २०२४**
**वैशाख** कृ. ९/१० , श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, उत्तरायण. वसंत ऋतू. संत मुक्ताबाई पुण्यतिथी **नक्षत्र** : उत्तरा भाद्रपदा, योग : प्रीती, करण : वाणिज. सूर्योदय : स.०६.०७ सूर्यास्त : सायं.०७ .१८ वा. **राहू काळ :** सकाळी : ९:०० ते १०:३०

### दिनविशेष
*१५४३ : द कॉर्पोरीस ह्युमानी फाब्रिका (मानवी शरीराची संरचना) हे अँड्रिअस व्हेसॅलिअसने लिहिलेले पुस्तक प्रसिद्ध झाले. *१७९० : पुणे येथे टिपूचा पराभव करण्यासाठी पेशवे, निजाम आणि इंग्रजांनी तह केला. *१८३१ : जेम्स रॉसने भौगोलिक उत्तर ध्रुवावर जमीन नाही, असे सांगितले. *१८७२ : नारायण मुरलीधर गुप्ते ‘बी’ या कवीचा जन्म. *१९०७ : जेट इंजिनाचा ब्रिटिश संशोधक एअर कमांडर सर फ्रँकव्हिटल याचा जन्म. *१९२९ : प्रभात फिल्म कंपनीची स्थापना. *१९३४ : विनोदाचार्य, नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे निधन. *१९३८ : नृत्यातील नैपुण्याने व ठसकेबाज अभिनयाने मराठी चित्रपट–नाट्यसृष्टीवर अधिराज्य गाजवलेल्या अभिनेत्री लीला गांधी यांचा जन्म. *१९४३ : लेखक आ. ह. साळुंखे यांचा जन्म. *१९४४ : प्रसिद्ध चित्रकार एम. व्ही. धुरंधर यांचे निधन. *१९४५ : डॉ. होमी जे. भाभा यांच्या प्रेरणेने टाटा मूलभूत संशोधन संस्थेचा शुभारंभ. *१९४८ : महाराष्ट्र राज्य परिवहन सेवेची पहिली बस पुण्याहून नगरला गेली.

### राशीभविष्य
.***मेष** : कामाचा मोबदला कमी मिळेल. ***वृषभ** : ईश्वरभक्तीसाठी वेळ द्याल. ***मिथुन** : कामता शिथीलता येईल. ***कर्क** : गाठीभेटी, प्रवास इ. साठी खूप धावपळ होईल. ***सिंह** : आर्थिक प्राप्ती जेमतेम होईल. जामीन राहू नका.*कन्या : उत्साहाने कामे कराल. ***तुळ** : आर्थिक अडचणीत याला. कामाचा कंटाळा येईल. ***वृश्चिक** : आर्थिक लाभाच्या घटना घडतील. ***धनु** : मान सन्मान लाभेल. ***मकर** : वरिष्ठांची मर्जी सांभाळा. ***कुंभ** : सर्दी पडसे, थकवा जाणवेल. ***मीन** : सहकार्याचे वातावरण लाभेल.

### मेसेज आया


बघायला गेलं तर आयुष्य खूप सोपं असतं... जगायला गेलं तर दुःखातही सुख असतं... चालायला गेलं तर निखारेही फुले होतात... तोंड देता आले तर संकटही शुल्लक असतं... वाटायला गेलं तर अश्रूतही समाधान असतं... पचवायला गेलं तर अपयशही सोपं असतं... हसायला गेलं तर रडणेही आपलं असतं...बघायला गेलं तर आयुष्यही खूप सोपं असतं...

### व्यक्तीविशेष
#### हेलन केलर
व्यक्तीच्या अंगी दुर्दम्य आशावाद असतो त्या व्यक्ती जीवनातल्या अनेक खडतर प्रसंगांना सामोरे जाऊन आपलं असामान्यत्व सिद्ध करतात. त्यापैकी हेलन केलर ही एक होय. २७ जून १८८० रोजी अमेरिकेतील अलाबामा राज्यातील टस्कंबिया येथे जन्मलेल्या हेलन केलरने एका जीवघेण्यात दुखण्यात आपली तीन ज्ञानेंद्रिये गमावली आणि एका बुद्धिमान मुलीचे जग काळोखात व्यापले जाते. ती अंध, मुकी आणि बहिरी झाली. नुसत्या हवेच्या वासावरुन ती वादळ होणार आहे हे सांगत असे. आपण स्वतःच्या अपेक्षा वाढवल्या की, त्या पुऱ्या करण्याची वृत्ती आपोआप आपल्यात निर्माण होते ही खूणगाठ तिने आपल्या मनाशी बांधली होती. पराभव हा शब्द तिला माहित नव्हता. पदवी घेताना आपल्या भाषणात ती म्हणते, अंतःकरणात जेव्हा उंच भरारण्याची महत्वकांक्षा असते तेव्हा भुईवर सरपटणे कुणालाच मानवत नाही. काळोख आणि निःशब्दात ही आत्म्याच्या प्रगतीच्या आड येत नसते. हेलन केलरने १२ पुस्तके लिहिली. हेलन केलर एक लेखिका, समाजसेविका आणि एक चांगली शिक्षिका म्हणून प्रसिद्ध झाली.

### व्यक्तिमत्व
#### विकासाचा मूलमंत्र
सध्या अनेक ठिकाणी व्यक्तिमत्त्व विकासाचे वर्ग आणि शिबिरे घेतली जातात. काही तज्ज्ञ मंडळी अशा उपक्रमांवर टीका करतात. अशा शिबिरांत आणि वर्गात सहभागी होण्याने व्यक्तिमत्त्वाचा खरा विकास होणार नाही, ही शिबिरे घेणारांना तरी व्यक्तिमत्त्व विकासाचा अर्थ कळला आहे का असे काही खोचक शेरेही ही मंडळी मारत असतात. सारे वर्ग आणि शिबिरे अशीच आहेत, असे काही म्हणता येत नाही. खरे तर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास शिबिरात न जाताही सुरूच असतो. व्यक्तिमत्त्व विकास ही आपल्या जीवनात आपल्याही नकळतपणे सुरू असलेली एक प्रक्रिया असते. तिला आपण ढोबळ अर्थाने संस्कार असे म्हणत असतो. संस्काराने माणूस घडत असतो आणि व्यक्तिमत्त्व विकास हेही एक घडणेच असते. छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांच्या आईने घडवले. प्रत्येकाचीच आई जिजामाते एवढी श्रेष्ठ नसते पण प्रत्येकाच्या मनावर त्याच्या आईने काही तरी संस्कार घडवलेले असतात. ते संस्कार अगदी सामान्य असतील. (क्रमशः)

### जिज्ञासा
#### धक्का
भाऊचा धक्का हे नाव आपल्याला ऐकून माहित असेल. हा धक्का म्हणजे जहाजे जिथे नांगर टाकून थांबवली जातात ती जागा. भाऊचा धक्का ब्रिटिशांनी बांधला. पण जगातील पहिला धक्का बांधला तो भारतीयांनी. इ.स.पू. २५०० वर्षांपूर्वी सिंधू संस्कृतीतील लोकांनी जगातील पहिला धक्का बांधला. गुजरातच्या किनाऱ्यावरील लोथल इथे हा धक्का बांधण्यात आला होता. १९५५ मध्ये या धक्क्याचे अवशेष सापडले. त्यावेळी तो. इ.पू. २५०० वर्षांपूर्वी बांधला गेला असल्याचे शास्त्रज्ञांनी सांगितले. त्याचा आकार असमांतर चौकोनी होता आणि त्याच्या भिंती भाजलेल्या विटांनी बांधल्या होत्या. त्याची पूर्व पश्चिम लांबी ४० यार्ड म्हणजे ३७ मीटर इतकी होती तर उत्तर दक्षिण लांबी २४ यार्ड म्हणजे २२ मीटर होती. अधिक पाणी वाहून जाण्यासाठी तसेच काठांची धूप होऊ नये यासाठी बाजूने जागा सोडण्यात आली होती. या धक्क्यात एका वेळी दोन जहाजे थांबवण्याची व्यवस्था होती. व्यापारी बोटीतून माल उतरवण्याची आणि चढविण्याची सोयही इथे होती. या बंदरात पश्चिम आशियातून जहाजे येत असत. इ.स.पू. २२०० मध्ये लोथल येथे महापूर आला आणि इ.स.पू.१९०० पर्यंत लोथलचा धक्का वाळूखाली गाडला गेला. १९५० च्या दशकात या भागात उत्खनन झाले तेव्हा हे बांधलेले बंधर साऱ्या जगासमोर आले.

### नवं संशोधन
#### दुष्काळापासून धडा घेणारी झाडे
माणसावर आलेल्या संकटातून माणूस ज्याप्रमाणे धडा घेतो आणि पुन्हा त्यासारख्या संकटाचा सामना करण्यासाठी तयार होतो अशीच प्रवृत्ती वृक्षांमध्येही आढळून आल्याचे समोर आले आहे. दुष्काळ पडल्यास होणारा त्रास वनस्पती कधीही विसरत नाही. या अनुभवातून भविष्यात स्वतःचा बचाव करण्याचा धडा त्या शिकतात. नेबरास्का लिंकन विद्यापीठाचे शास्त्रज्ञ मायकेल फ्रॉम यांनी याबाबत संशोधन केले. त्यांनी एखादं रोप दुसऱ्या ठिकाणी रुजवण्यासाठी काही दिवस आधी त्याला पाणी देणे बंद करण्याची लोकांची जी धारणा होती त्या धारणेचा अभ्यास केला. दुसऱ्या ठिकाणी रुजवण्यापूर्वी रोपाला पाणी दिले नाही तर थोडे कष्ट सहन करण्याची त्यांची तयारी होते. ही प्रक्रिया आता संपूर्णपणे वैज्ञानिक असल्याचे सांगितले जात आहे. कारण या प्रक्रियेची वैज्ञानिक आधाराद्वारे शहानिशा करण्यात आली आहे. एका प्रजातीवर फ्रॉम यांनी असा प्रयोग केला. त्यांनी काही रोपट्यांना प्रत्यारोपणापूर्वी पाणी दिले आणि काहींना दिले नाही.(पूर्वार्ध)

### सोडवा सुडोकू
क्रमांक १

| | | | |
|---|---|---|---|
| | 1 | 4 | 2 |
| 4 | | | 1 |
| 2 | 4 | | |
| 1 | | | |

**सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.**

### हसा चकटफू
एक पठाण त्याच्या बायकोच्या कबरीवर हातात पंखा घेऊन जोरजोरात रडत होता. एका माणसाने ते पाहिले आणि तो सांत्वनासाठी पुढे आला आणि म्हणाला, बायकोवर फार प्रेम होते वाटतं तुमचे. पण शेवटी देवाची इच्छा आपण काय करणार? पठाण रडत रडत म्हणाला, तिची इच्छा होती की तिच्या कबरीवरची माती सुकली मी दुसरा विवाह करावा. पण कोण मूर्ख या मातीवर रोज दोन बादल्या ओतून जातोय हे कळत नाही..!

### महिलायन
#### सौंदर्यवर्धनाचं वाढतं फॅड
अलिकडे व्यक्तीमत्व आकर्षक असणं ही खूपच महत्वाची गोष्ट मानली जाऊ लागली आहे. सुंदर दिसण्याची इच्छा असणं यात गैर काही नाही. फारपूर्वीपासून स्त्रिया सौंदर्यवर्धनासाठी तऱ्हेतऱ्हेचे उपाय करत असल्याचे दिसते. प्रगती होऊ लागली तसतसे सौंदर्याच्या उपचारांमध्येही मोठे बदल होत गेले. वेगवेगळ्या थेरपी, क्रिम्स् यांची मोठे बाजारपेठच तयार झाली. सध्या तर कॉस्मॅटीक सर्जरीद्वारे सौंदर्य फुलवण्याचे प्रमाण अधिकच वाढल्याचे दिसत आहे. किशोरवयीन मुलींपासून मध्यमवयीन महिलांपर्यंत सर्वच जण कॉस्मॅटीक सर्जरीचा पर्याय स्वीकारताना दिसत आहेत. नाक थोडंसं नकटं आहे, पोटाचा घेर वाढला आहे, दंडांचा घेर वाढला आहे, मानेजवळ चरबी साठली आहे अशा एक ना अनेक कारणांसाठी कॉस्मॅटीक सर्जरीचा पर्याय निवडला जात आहे. केवळ शहरातच नाही तर इतर भागातही हे लोण पसरले आहे. गेल्या पाच वर्षात हे प्रमाण जवळपास ४० टक्क्याने वाढल्याचे तज्ज्ञ सांगतात. यामध्ये महिलांचे प्रमाण जास्त आहे, हे वेगळे सांगायला नको. अनेक जणींना चेहऱ्यावरील डाग, गोंदण, खड्डे, व्रण घालवायचे असतात त्यासाठी प्लॅस्टिक सर्जरी केली जाते. तसेच चित्रपटातील अभिनेत्रींप्रमाणे आकर्षक फिगर बनवण्यासाठी प्लॅस्टिक सर्जरीचा आधार घेण्याचे प्रमाण वाढले आहे. (पूर्वार्ध)

### गंमतग्यान
#### असे ठरतात कंपनीचे ‘लोगो’!
कुठल्याही कंपनीची प्रतिमा चटकन व्यक्त होण्यासाठी त्या कंपनीचा ‘लोगो’ खूप महत्वाचा असतो. लोगोमध्ये कल्पकता आणि रचनात्मकता दाखवून अनेक कंपन्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. मित्रांनो, तुम्ही एखाद्या टि शर्टवर ‘बरोबर’ची खूण बघितली असेल त्यावरुन तो शर्ट ‘नायकी’ या कंपनीचा आहे हे ताबडतोब समजते. ज्या खुणेमुळे ही ओळख बनते त्या खूणेला ‘लोगो’ असे म्हणतात. या लोगोमागे कंपनीची केवळ ओळखच नसते तर तो बनवताना संपूर्ण वैचारिक प्रक्रियेतून घडत असतो. काळानुसार लोगो बदलत जातात. हे बदल कसे होतात याची माहिती काही प्रसिद्ध कंपन्यांच्या लोगोवरुन घेता येईल.

ॲपल ही कंपनी आणि त्याचे संस्थापक स्टिव्ह जॉब्ज यांच्याबद्दल तुम्ही सारेजण जाणतच असाल. १९७६ मध्ये ‘ॲपल’ची स्थापना झाली. ही जगातील सर्वश्रेष्ठ कॉम्प्युटर कंपन्यांपैकी एक आहे. ही कंपनी कॉम्प्युटर व्यतिरिक्त आयफोन, आयपॉड यासारखी उपकरणेदेखील बनवते. सुरुवातीच्या काळात या कंपनीच्या लोगोमध्ये प्रसिद्ध शास्त्रज्ञ आयझॅक न्यूटन हे सफरचंदाच्या झाडाखाली बसलेले दाखवले होते. (पूर्वार्ध)

‘राष्ट्र संचार’ हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

SINHGAD TECHNICAL EDUCATION SOCIETY -PUNE
तमसो मा ज्योतिर्गमय

# सिंहगड इन्स्टिट्यूट्स

पुणे । मुंबई । सोलापूर www.sinhgad.edu

आदरणीय

## डॉ. (सौ.) सुनंदा एम. नवले

संस्थापक-सचिव, सिंहगड इन्स्टिट्यूट्स



आपणांस मनःपूर्वक

वाढदिवसाचे अभिष्टचिंतन

सिंहगड इन्स्टिट्यूट्स, १२ ऑगस्ट १९९३ रोजी एका स्वप्नाची मुहूर्तमेढ! जागतिक पातळीवर आपला दर्जा सिद्ध करील अशी एक भव्य शिक्षण संस्था उभी करण्याची जिद्द. सक्षमसिद्ध आणि सकारात्मक दृष्टिकोनातून देशाचे नाव उंचावेल असा नवयुवक घडवण्याचे पाहिलेले स्वप्न. याच स्वप्नातून सिंहगड इन्स्टिट्यूट्सची सुरुवात एका पॉलिटेक्निक कॉलेजच्या माध्यमातून झाली आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्यभरारीने सिंहगड संस्थेने पुण्याच्या नव्हे, देशाच्या नव्हे तर जगाच्या नकाशावर आपले नाव कोरले. पूर्व प्राथमिक शालेय शिक्षणापासून डॉक्टरेटपर्यंत अनेकविध विद्याशाखांच्या माध्यमातून सुरू झालेला हा प्रवास १२ शैक्षणिक संकुले, ८५ शैक्षणिक संस्था, २६ शाळा आणि ९०,००० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला आहे. यामुळेच गुणवंत विद्यार्थ्यांची प्रथम पसंती 'सिंहगड इन्स्टिट्यूट्स' हीच आहे. दमदार वाटचालीचा मागोवा घेतानाच आम्ही अभिमानाने पुढील काळामध्ये प्रगतीची आणि विद्यार्थ्यांच्या यशोगाथेची नवनवीन शिखरे निश्चितच पादाक्रांत करू.

### शुभेच्छुक



**प्रा. एम. एन. नवले**
अध्यक्ष, सिंहगड इन्स्टिट्यूट्स



**रचना नवले-अष्टेकर**
उपाध्यक्षा (प्रशासन), सिंहगड इन्स्टिट्यूट्स



**रोहित नवले**
उपाध्यक्ष (मानव संसाधन), सिंहगड इन्स्टिट्यूट्स

आणि

सर्व संचालक, प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी

सिंहगड इन्स्टिट्यूट्स

कॉर्पोरेट ऑफिस : सिंहगड इन्स्टिट्यूट्स, १९/१५ एरंडवणे, श्रीमती काशीबाई खिलारे मार्ग, पुणे - ४११००४ संपर्क क्र. ०२० - २५४३१००१

## भाड्यापोटी दरमहा मोजावे लागतात तीन लाख ८० हजार रुपये

# पोलीस आयुक्तालय हक्काच्या जागेच्या प्रतीक्षेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी चिंचवड :** शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची स्थापना होऊन जवळपास सहा वर्षांचा काळ लोटला आहे. दरम्यान पोलीस आयुक्त कार्यालय महापालिकेच्या इमारतीत भाडेतत्त्वावर कार्यरत आहे. पोलीस आयुक्त कार्यालयाच्या इमारतीसाठी पालिकेला दरमहा तीन लाख ८० हजार ७२७ रुपये इमारत भाडे द्यावे लागत असून पोलीस आयुक्तालयाला हक्काची इमारत आवश्यक आहे.

पुणे शहर पोलीस आयुक्तालय आणि पुणे ग्रामीण मधून विभाजन होऊन पिंपरी चिंचवड शहरासाठी १५ ऑगस्ट २०१८ रोजी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय कार्यान्वित झाले. मूलभूत संसाधनांसाठी आयुक्तालयाला सुरुवातीपासून झगडावे लागले. पोलीस आयुक्तालय पोलीस मुख्यालय यासाठी स्वतःची जागा, अधिकारी आणि कर्मचारी निवासस्थाने यासाठी मोठ्या प्रमाणात जागेची आवश्यकता होती. मागील दोन वर्षांमध्ये अधिकारी कर्मचारी यांच्या निवासस्थानासाठी तसेच पोलीस आयुक्त कार्यालयासाठी जागेची मंजुरी मिळाली आहे. तर मुख्यालयाच्या जागेसाठी अजूनही शोध सुरू आहे.

आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ऑटो क्लस्टर येथील इमारती मधून आयुक्तालयाचा कारभार सुरू झाला. त्यानंतर प्रेमलोक पार्क चिंचवड येथील महात्मा फुले इंग्लिश मीडियम स्कूल या इमारतीमध्ये पोलीस आयुक्तालयाचे स्थलांतर झाले. त्यानंतर ही इमारत महापालिकेकडून पोलिसांना भाडेतत्त्वावर देण्यात आली. या इमारतीसाठी पोलीस विभाग दरमहा ३ लाख ८० हजार ७२७ रुपये मोजत आहे. ही माहिती माहिती अधिकारातून समोर आली आहे.

मागील दोन वर्षांमध्ये महत्त्वाच्या दोन जागा पोलीस आयुक्तालयाला मिळाल्या आहेत.

काळेवाडी फाटा येथे पीएमआरडीएची जागा आहे. त्यातील १५ एकर जागा पोलीस आयुक्त कार्यालयासाठी मिळाली आहे. या जागेत पोलीस आयुक्त कार्यालय, सह पोलीस आयुक्त कार्यालय, अपर पोलीस आयुक्त कार्यालय, पोलीस उपायुक्त (गुन्हे) कार्यालय, पोलीस उपायुक्त (विशेष शाखा) कार्यालय, नियंत्रण कक्ष, एमओबी-पीसीबी कार्यालय, तांत्रिक विश्लेषण विभाग, आर्थिक गुन्हे शाखा, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, विशेष शाखा, पासपोर्ट विभाग, चारित्र्य पडताळणी विभाग, लिपिक आणि मंत्रालयीन कर्मचाऱ्यांसाठी कार्यालय असणार आहे.

तसेच मोशी येथे असलेल्या १६ एकर जागेपैकी आठ एकर जागा पिंपरी-चिंचवड आरटीओला देण्यात आली आहे. तर उर्वरित आठ एकर जागा पिंपरी-चिंचवड पोलिसांना देण्यात आली आहे. त्या जागेत पिंपरी-चिंचवड पोलीस सायबर पोलीस ठाणे उभारण्यात येणार आहे. तसेच उपनिरीक्षक ते सहायक आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांची निवासस्थाने, शहराला आणखी एक अपर पोलीस आयुक्त हे पद मंजूर झाले आहे. त्यांचे कार्यालय देखील येथे होणार आहे. परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त कार्यालय देखील मोशी येतील जागेत होणार आहे.

पिंपरी चिंचवड पोलिसांना जागा मिळाली असून आता त्या जागेमध्ये इमारत तयार होणे आवश्यक आहे. स्वतःची इमारत नसल्याने पोलिसांना महापालिकेला लाखो रुपये भाड्यापोटी द्यावे लागत आहेत.

### दरमहा सव्वा दोन लाखांचे वीज बिल

● पोलीस आयुक्त कार्यालयाच्या इमारतीत नियंत्रण कक्ष, विशेष शाखा यासह विविध शाखा आणि अधिकाऱ्यांची कार्यालये आहेत. या इमारतीचे वीज बिल दरमहा सरासरी दोन लाख २४ हजार ८४० रुपये येते. माहिती अधिकार कार्यकर्ते प्रदीप नाईक यांनी माहिती अधिकारातून ही माहिती समोर आणली आहे.

» Selected



## आरोग्य तपासणी शिबिरामध्ये १४० नागरिकांचा सहभाग

**पिंपरी :** मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरी पुणे यांच्या वतीने भोसरी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सोमवार, (दि. २७) आणि बुधवार (दि. २९) या दोन दिवसांमध्ये १४० नागरिकांनी आरोग्य तपासणी करुन घेतल्याचे मेडिकव्हर हॉस्पिटल भोसरी यांच्या कडून सांगण्यात आले. यामध्ये साफसफाई कर्मचारी आणि आरोग्य निरीक्षक कार्यालयीन कर्मचारी यांच्या तपासणी सोमवारी (दि. २७) करण्यात आली. यावेळी सुमारे ८० नागरिकांची आरोग्य तपासणी झाली. तसेच मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरी पुणे यांच्या मार्फत ज्येष्ठ नागरिक संघ, विरंगुळा केंद्र इंद्रायणी नगर भोसरी येथे बुधवारी (दि. २९) आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले होते. यावेळीस सुमारे ६० नागरिकांची आरोग्य तपासणी शिबिरामध्ये तपासणी करण्यात आली. यामध्ये ईसीजी, बीपी, रक्तातील साखर, वजन आणि वरिष्ठ डॉक्टरचा सल्ला देण्यात आला. तसेच या शिबिरात डॉ. राधिका, आणि मेडिकव्हर हॉस्पिटल टीमने या शिबिरात महत्वपूर्ण भूमिका बजावली.

## अल्पवयीन चालकाकडून थांबलेल्या मोटारीला धडक

**वाकड :** भरधाव वेगाने मोटार चालवणाऱ्या अल्पवयीन चालकाने घरासमोर पार्क केलेल्या मोटारीला जोरात धडक दिल्याची घटना थेरगाव येथील चक्रधर कॉलनीत घडली. याबाबत दीपक लक्ष्मण दवणे (वय ४२, रा. चक्रधर कॉलनी, थेरगाव) यांनी फिर्याद दिली असून, १७ वर्षीय अल्पवयीन चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याबाबत माहिती अशी, दवणे यांनी मोटार (क्र. एमएच १४ डीए ५२८८) घरासमोर पार्क केली होती. त्यावेळी अल्पवयीन मुलाची भरधाव वेगातील मोटार त्या गाडीला पाठीमागून धडकली. सुदैवाने या अपघातात जीवितहानी झाली नाही. मात्र, मोटारीचे मोठे नुकसान झाले आहे.

## इंदोरी येथे शेतकरी प्रशिक्षण वर्गास चांगला प्रतिसाद

**पिंपरी :** महाराष्ट्र शासन कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत इंदोरी येथे सोयाबीन उत्पादन तंत्रज्ञान शेतकरी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले होते. यामध्ये सुमारे १०२ शेतकऱ्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. आत्मा प्रकल्प संचालक पुणे विजय हिरेमठ आणि कृषी अधिकारी मावळ दत्तात्रेय पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. संतोष जायभाय (शास्त्रज्ञ, आधारकर संशोधन संस्था पुणे) यांनी सुधारित सोयाबीन लागवड व व्यवस्थापन, विविध जाती, पेरणी लागवडीच्या विविध पद्धती, तण नियंत्रण, कीड व रोग नियंत्रण याविषयी मार्गदर्शन केले. तर शास्त्रज्ञ डॉ. बाळकृष्ण जमदग्नी यांनी ऊस लागवड तंत्रज्ञान व ऊस संजीवनी याबाबत माहिती दिली. तसेच, कृषी विभागाच्या विविध योजना विषयी माहिती कृषी अधिकारी दत्तात्रेय पडवळ यांनी दिली. आत्मा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना, सहली व प्रशिक्षण याबाबत राहुल घोगरे यांनी मार्गदर्शन केले. कृषी पर्यवेक्षक नवीनचंद्र बोराडे यांनी शेतकऱ्यांनी घरचे भात व सोयाबीन बियाणे वापरावे असे आवाहन केले. कृषी सहायक स्वाती घनवट यांनी सोयाबीन उगवण क्षमता, बीज प्रक्रिया, फळबाग, पी. एम. किसान योजना याविषयी माहिती दिली.

## तळेगाव स्टेशन परिसरात फळवृक्षांची लागवड

**तळेगाव दाभाडे :** तळेगाव दाभाडे नगरपरिषद व पास्को कंपनी, कान्हे यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत स्टेशनजवळील तळे परिसरात देशी प्रजातीच्या ५०० फळवृक्षांची लागवड करण्यात आली. गीतांजली होणमणे यांनी उपस्थितांना वसुंधरा संवर्धनाबाबत शपथ दिली. यावेळी पास्को कंपनीचे विद्याभूषण, मुख्याधिकारी एन.के.पाटील यांचे मार्गदर्शनाखाली यावेळी विजय शहाणे, सिद्धेश्वर महाजन, प्रमोद फुले, तुकाराम मोरमारे आणि नगर परिषद अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उद्यान विभागामार्फत विशाल मिंड, रणजित सूर्यवंशी आदींनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

राष्ट्रसंचार | ये रे ये रे पावसा | रा

## शेतकऱ्यांना लागले पावसाचे वेध

**मावळ :** शेतकऱ्यांनी खरिपाचे नियोजन करीत शिवारे पेरण्यासाठी सज्ज करून ठेवली आहेत. मावळमधील शेतकऱ्यांना पावसाचे वेध लागले आहे, असे असूनसुद्धा उन्हाचा तडाका वाढतच असल्याने जिवाची लाही लाही होत आहे. पावसाचे प्रमाण घटतच चालल्याने परिस्थिती गंभीर बनत चालली आहे. भूजल पातळी खोलवर जात असल्याने सिंचन झोन आता कोरडवाहू होत आहे. लाखो रुपये खर्च करूनही बोअरवेलला पाणी लागत नसल्याने शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर घसरत आहे. सिंचनावर अवलंबून असलेली पिके उन्हाच्या उकाड्याने करपू लागली आहेत. या वर्षासाठी बाजारात बियाणे दाखल झाले असून पावसाची प्रतीक्षा शेतकरी करीत आहे. रासायनिक खतांच्या किंमतीत वाढ झाल्याने खते घेणे कठीण होऊन बसले आहे. मजुरीचे दरही दिवसाकाठी वाढतच चालल्याने शेतकरी हताश होत आहे. महागडे बियाणे खरेदी करावी लागत असल्याने यावर अंकुश लावणे गरजेचे आहे. पेरणीसाठी आता शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहे. परंतु शेतकऱ्यांना पसंतीच्या बियाण्यांसाठी शोधाशोध करावी लागत आहे.



## महापुरुषांची जयंती महोत्सव...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**वडगाव मावळ :** ग्रामस्थांच्यावतीने विविध महापुरुषांची संयुक्त जंयती साजरी करण्यात आली. यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# विविध महापुरुषांचा संयुक्त जयंती महोत्सव साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वडगाव मावळ :** येथील मिलिंद युवक मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने महापुरुषांचा संयुक्त जयंती महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, सम्राट अशोक, राजश्री शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे तसेच माता रमाई, माता भिमाई, सावित्रीभाई फुले , राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर अशा सर्वच महापुरुषांचा व महामातांचा संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त चार दिवस विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

पहिल्या दिवशी सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांची पंचायत समिती चौक ते मिलिंदनगर चौक अशी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत उभारण्यात आलेला समता रथ हे मिरवणुकीचे मुख्य आकर्षण होते. मिरवणुकीत सर्वधर्मीय नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दुसऱ्या दिवशी सायंकाळी अभिवादन सभा झाली. सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे यांनी मार्गदर्शन केले. बाबासाहेबांच्या जीवनातील काही महत्त्वाच्या पैलूवर त्यांनी प्रकाश टाकला. आजच्या काळातला बाबासाहेबांचा कार्यकर्ता कसा असावा याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. रात्री महापुरुषावर आधारित शाहीर देवानंद माळी व शाहीर पृथ्वीराज माळी यांचा शाहिरी जलसाचा व भीम गीतांचा कार्यक्रम झाला. रविवारी पोटोबा महाराज मंदिराच्या प्रांगणात सत्यपाल महाराज यांच्या प्रबोधनात्मक कीर्तनाचा कार्यक्रम झाला.

# शहरातील सर्व्हिस रस्त्यांचा श्वास कोंडला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी चिंचवड :** शहरात अनेक रस्त्यांच्या कडेला दुचाकी, चारचाकी वाहने पार्क केली जातात. बहुतांश सर्व्हिस रस्ते हे पार्किंग झोन बनले आहेत. परिणामी वाहनांची कोंडी होत असून यातून मार्ग काढताना वाहनचालकांना मात्र कसरत करावी लागते आहे. एकीकडे हॉटेल, गॅरेज, दुकाने तर दुसरीकडे फोरव्हीलर, रिक्षा, टेम्पो तसेच बेवारस वाहने पार्क केल्यामुळे सर्व्हिस रस्त्यांचा श्वासच कोंडला आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील रस्ते प्रशस्त करण्यात आलेले आहेत; मात्र या रस्त्यावरून वाहने धावताना त्यांना रस्त्याच्या कडेला उभ्या केलेल्या वाहनांचा अडथळाच जास्त होतो. पुणे -मुंबई महामार्गावर दापोडी ते निगडी दरम्यान ग्रेडसेपरेटर, बाजूला बीआरटी व त्यानंतर सर्व्हिस रस्ता आहे. त्यामुळे रस्ता प्रशस्त दिसतो आहे; परंतु या रस्त्याच्या कडेला अनेक ठिकाणी दुचाकी आणि चारचाकी वाहने पार्क केलेली असतात.

### चिंचवडगाव ते स्टेशन

● चिंचवडगाव ते स्टेशन हा रस्ताही प्रशस्त आहे. हा रस्ता दुहेरी असून या रस्त्याच्या कडेला असेलल्या जागेवर मोठ्या प्रमाणात वाहने पार्क केली जातात. प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहासमोर असलेल्या चौपाटीवर रात्रीच्या वेळी वाहनांची मोठी गर्दी असते. पार्सल किंवा खाऊन होईपर्यंत वाहने रस्त्यावरच उभी असतात.



### पुरेशा पार्किंगचा अभाव

● शहरात अनेक ठिकाणी बेकायदा वाहने पार्क केली जात असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या कोंडीमुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. परिसरातील अनेक गृहसंकुले, हॉटेलांना पार्किंगची व्यवस्था (ठेवलीच) नसल्यामुळे अनेक दुचाकी, चारचाकी वाहने सर्व्हिस रस्त्यावर पार्क केली जातात. त्यात बेवारस वाहनांचीही भर पडत आहे.

# द्रुतगती मार्गाचे कठडे तोडण्याचे प्रकार पुन्हा सुरू

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**सोमटणे :** टोल न देता द्रुतगती मार्गाने प्रवास करता यावा, यासाठी अज्ञाताकडून संरक्षक कठडे तोडण्याचे प्रकार पुन्हा सुरू झाले आहेत. त्यामुळे, मोठी दुर्घटना होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर मार्गिकेशिवाय अन्य ठिकाणाहून वाहने आत घुसविली जाऊ नयेत, त्याचबरोबर पाळीव किंवा जंगली प्राण्यांनी प्रवेश करू नये, यासाठी रस्ते विकास महामंडळ आणि रस्त्याची व्यवस्था पाहणाऱ्या आयआरबी कंपनीमार्फत संपूर्ण ९४ किलोमीटरच्या रस्त्याला लोखंडी संरक्षक कठडे बसविण्यात आले होते.

या कठड्यांची दोन वर्षांपूर्वी नियमित दुरुस्तीही करण्यात आली होती. या कठड्यांमुळे मार्गिकेशिवाय अन्य ठिकाणांहून वाहने घुसविणाऱ्यांना व द्रुतगतीला प्रवेश करणाऱ्या प्राण्यांना आळा बसला होता.'

परंतु ही परिस्थिती फार काळ टिकली नाही. रस्त्यालगतच्या गावातील काही अज्ञातांनी द्रुतगती मार्गाला प्रवेश करण्यासाठी आपल्या सोयीनुसार उर्से, आढे, ओझर्डे, बऊर, पवना चौकी आदी गावच्या हद्दीत विविध ठिकाणी कठडे तोडून प्रवेशासाठी रस्ते तयार केले आहेत.

याच रस्त्यांवरून सध्या द्रुतगती मार्गावर अवजड वाहनांसह सर्व वाहने घुसविण्याचे प्रकार सुरू झाले आहे. यातून मोठी दुर्घटना घडण्याचा धोका आहे.

## अभियंत्यांना वाहतूक कोंडीचा मोठा त्रास

# हिंजवडी आयटीनगरीतील ३७ कंपन्यांचे स्थलांतर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हिंजवडी :** आयटीनगरी म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या हिंजवडीतील राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान नगरीतील ३७ कंपन्यांनी स्थलांतर केले आहे, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. रस्ते, वाहतूक, आयटी इंजिनियर्सला राहण्यायोग्य वातावरण उपलब्ध नसणे, आरोग्य आणि विविध नागरी सुविधांचा अभाव असल्याने कंपन्यांनी स्थलांतर केल्याचे हिंजवडी इंडस्ट्रियल असोसिएशनचे मत आहे.

पुण्यालगत असणाऱ्या हिंजवडी परिसरामध्ये सन १९९७ पासून आयटीनगरी उभारण्याचे काम सुरू झाले. तत्कालीन केंद्रीय माहिती आणि दूरसंचार मंत्री प्रमोद महाजन आणि राज्याचे उद्योगमंत्री पतंगराव कदम यांच्या हस्ते सन २००० मध्ये या नगरीचे उद्घाटन करण्यात आले होते. त्यानंतर हिंजवडी आयटीनगरी ही जागतिक नकाशावर ओळखली जात आहे. या ठिकाणी दीडशेहून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर कंपन्या आहेत. त्यामुळे देशभरातील लाखो आयटी इंजिनियर्सला रोजगार मिळालेला आहे. आयटीनगरी शेजारी असणाऱ्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे.

### काय आहेत कंपन्या स्थलांतराची कारणे?

● हिंजवडी आयटीपार्कचा परिसर हा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या अखत्यारित येतो. आयटीनगरीत जाण्यासाठी पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातून अभियंत्यांना वाहतूककोंडीचा मोठा त्रास करावा लागतो. त्याचबरोबर विविध समस्यांना आयटीयन्सला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे कंपन्यांच्या कामावर परिणाम होत आहे. आयटी इंजिनिअरचा वेळ आणि पैसा वाया जात आहे. त्यामुळे गेल्या चार वर्षांमध्ये परिसरातील ३७ कंपन्यांनी स्थलांतर केले आहे. त्यातील काही कंपन्या मगरपट्टा सिटी, चेन्नई, हैदराबाद अशा विविध भागांमध्ये स्थलांतरित झाल्या आहेत.



हिंजवडी आयटीपार्कमधून बाहेर आल्यानंतर आयटी अभियंत्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वाहतुकीचा सर्वात मोठा प्रश्न आहे. या कंपन्यामधे येणारे पाहुणे किंवा अधिकारी कर्मचारी या ठिकाणी त्यांना येण्यासाठी त्रास सहन करावा लागतो. तसेच जवळपासच्या परिसरात मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे गेल्या चार वर्षांमध्ये कंपन्यांनी स्थलांतर केले आहे. त्यावर उपयोजना होण्याची गरज आहे. अन्यथा आणखी कंपन्या बाहेर जातील. **- कर्नल योगेश जोशी,** सचिव, हिंजवडी इंडस्ट्रियल असोसिएशन.

## वाहतूक विभागाकडून पालकांना ६४ लाखांचा दंड

# अल्पवयीन चालकांचा उच्छाद!

**पिंपरी :** शहरात अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देणाऱ्यांवर, तसेच परवाना नसतानाही वाहन चालविणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. पिंपरी- चिंचवड वाहतूक पोलिसांनी १ जानेवारी ते २४ मे २०२४ या कालावधीत ९८३ जणांवर याप्रकरणी कारवाई केली. यात बेशिस्त वाहन चालकांना ६३ लाख ८० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. पिंपरी- चिंचवड वाहतूक शाखेंतर्गत १४ वाहतूक विभाग आहेत. या प्रत्येक विभागातर्फे बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई करण्यात येत आहे. यात वाहन परवाना नसलेल्यांवर वाहतूक विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. भोसरी, चाकण आणि सांगवी वाहतूक विभागात ही कारवाई मोठ्या प्रमाणात करण्यात आली. त्यासाठी गर्दीच्या वेळेत, तसेच मुख्य रस्ते आणि चौकात तपासणी करण्यात आली. यात संशयित वाहन चालकांकडे परवाना नसल्याचे समोर आले. त्यातील अल्पवयीन असलेल्या, तसेच १६ वर्षांखालील मुलांनी वाहन चालविल्याचे प्रकार समोर आले आहेत.

### पालकांना दंड

- अल्पवयीन मुलाने वाहन चालविल्यास पालकांना दंड आकारला जातो, तसेच संबंधित अल्पवयीन मुलासह त्याच्या पालकांचे समुपदेशन केले जाते. अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यासाठी न देण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

### पुण्यातील प्रकरणानंतर वाहतूक पोलीस 'अलर्ट

- पुण्यातील कल्याणीनगर येथील प्रकरणानंतर पिंपरी- चिंचवड वाहतूक पोलीस 'अलर्ट' झाले आहेत. अल्पवयीन मुले वाहन चालवीत असल्यास कारवाई केली जात आहे. तसेच विनापरवाना, मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांवरही कारवाई होत आहे. त्यासाठी दिवसा व रात्रीही कारवाई करणे सुरू आहे. रात्री स्थानिक पोलीस ठाण्यांच्या नाकाबंदीदरम्यान वाहतूक पोलिसांकडून ड्रंक अँण्ड ड्राइव्हची कारवाई केली जात आहे.



वाहन चालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे. पालकांनी अल्पवयीन पाल्यांना वाहन चालवण्यासाठी देऊ नये. अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देणाऱ्या पालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
**-विशाल गायकवाड,** पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड

## राज्यस्तरीय संस्कृत स्पर्धेचा निकाल!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** संस्कृत संस्कृती संवर्धन संघ या संस्थेने आयोजित केलेल्या पाचव्या संस्कृत श्लोक उच्चारण व अर्थ स्पष्टीकरण स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. या स्पर्धेमध्ये पाच गटामध्ये देश विदेशातील एकूण ५४१ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सातपुते यांनी दिली.

या स्पर्धेमध्ये प्रथम गटात प्रथम क्रमांक अन्विता कुंभार, तनिष्का जोशी, द्वितीय क्रमांक ईप्सिता धोकटे, अद्वैत पटवर्धन, तृतीय क्रमांक ऋता केळकर, विद्मयी चव्हाण, उत्तेजनार्थ अभिरथ क्षिरसागर, सानवी संगवई, द्वितीय गटातून प्रथम क्रमांक काव्या बोकील, आदिनाथ देशपांडे, द्वितीय क्रमांक रेवा पांडे, शर्विल जवळेकर, तृतीय क्रमांक रिया कुळकर्णी, ईशिता जोशी, उत्तेजनार्थ ईशा वठारकर, रिदान सुळे. तृतीय गटातून प्रथम क्रमांक आदिती गोसावी, द्वितीय क्रमांक श्रेया घुळघुळे, तृतीय क्रमांक श्रिया भिडे, स्वरा येवले, उत्तेजनार्थ ऋग्वेदी पवार होते.

## » Selected



## भाजपाकडून जितेंद्र आव्हाडांचा निषेध

**पिंपरी :** आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा भारतीय जनता पार्टीच्यावतीने गुरुवारी (दि. ३०) पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आंदोलन करण्यात आले. या घटनेच्या निषेधार्थ जितेंद्र आव्हाड यांच्या फोटोला जोडे मारो आंदोलन करण्यात आले. भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे हे आंदोलन करण्यात आले. यावेळी माजी खासदार अमर साबळे, दक्षिण आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, प्रदेश सदस्य माऊली थोरात, सरचिटणीस संजय मंगोडेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, शैला मोळक, अनुसुचित जाती मोर्चा अध्यक्ष भीमा बोबडे, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, माजी महापौर आर. एस. कुमार, माजी नगरसेवक बाबासाहेब त्रिभूवन, सागर आंघोळकर, माजी नगरसेविका अनुराधा गोरखे, अॅड.गोरक्षनाथ झोळ आदी सहभागी झाले होते.

## सांगवीत अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात

**जुनी सांगवी :** शहरात येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त शहरातील पुतळा परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. सांगवी परिसर अहिल्यादेवी सेवा संघ पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यावतीने सकाळपासूनच परिसरात अभिवादनासाठी मोठी गर्दी केली होती. विविध संघटना, महापालिका अधिकारी, राजकीय



पक्षांच्यावतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी महापालिका अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, ह क्षेत्रिय अधिकारी उमेश ढाकणे, शिवाजी टिळे, सहायक आरोग्य अधिकारी वैशाली रणपिसे, भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप, माजी महापौर उषा ढोरे, अहिल्यादेवी सेवा संघाचे अध्यक्ष अजय दुधभाते, माजी नगरसेवक संतोष कांबळे, प्रशांत शितोळे, अरुण पवार, सूर्यकांत गोफणे, अभिमन्यू गाडेकर, बिरू होनमाने, महेश भागवत, सचिन सरक, नारायण भुरे, सुधाकर सूर्यवंशी, नवनाथ भिडे, गिरीश देवकाते, अरविंद काळे, नामदेव माकर, संतोष मदने, संदीपान सामसे, दगडू घोडके, संपत बीटे, मनोज मारकड, सचिन सरक, राम तिघाडे, वैजनाथ सुरवसे, रमेश गाढवे, कृष्णराव गिरगुने, बाबासाहेब चितळकर, गणेश ढोरे, युवराज ढोरे, शशिकांत दुधारे, आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स

# खरीपात शेतमालाच्या उत्पादन वाढीचे प्रयत्न


**मावळ :** शहरातील तालुक्यात येत्या खरीप हंगामात शेतमालाचे उत्पादन वाढविण्यासाठी कृषी विभागामार्फत पिकाच्या बीज प्रक्रिया, शेती शाळा, जमीन सुपीकता निर्देशांकाच्या आधारे खतांचा वापर, घरगुती बियाणे उगवण क्षमता चाचणी यासारखी प्रात्यक्षिके घेण्यात येत आहे. अनेक शेतकरी बीज प्रक्रिया आणि घरगुती बियाणे उगवण क्षमता तपासून पेरणी करणार आहेत. तालुक्यात भात हेच खरिपाचे मुख्य पीक असून त्यात सुमारे ९० टक्के क्षेत्रावर इंद्रायणी या वाणालाच शेतकऱ्यांची पसंती असते. गेल्या काही वर्षांत तालुक्यात भुईमूग पिकाखालील क्षेत्र कमी होऊन त्याची जागा सोयाबीन पिकाने घेतली आहे. या पिकाखालील क्षेत्र दरवर्षी वाढत आहे. नाणे व पवन मावळात शेतकऱ्यांनी धूळवाफेवर भात पेरणी सुरू केली आहे.

### बीज प्रक्रियेद्वारे उत्पादन वाढीसाठी उपक्रम

- भात, सोयाबीन पिकाच्या बीज प्रक्रियेची ३८९ प्रात्यक्षिके चालू
- विविध गावांत १०० प्रात्यक्षिके पार, १ हजार ८०० शेतकऱ्यांचा सहभाग
- यंदाच्यावर्षी बीज प्रक्रिया प्रात्यक्षिकांच्या संख्येत ८० ने वाढ
- घरगुती बियाणे उगवण क्षमता चाचणीची २०४ प्रात्यक्षिके
- त्यापैकी, सुमारे १२० प्रात्यक्षिके पूर्ण.

### यंदा एकूण २५ शेती शाळांचे आयोजन

- यंदाच्या हंगामात विना अनुदानित २१ व अनुदानित चार अशा एकूण २५ शेती शाळा
- शेतकऱ्यांना खरीप पिकासाठी जमिनी तयार करण्यापासून पिके तयार झाल्यावर काढणी पश्चात तंत्रज्ञानाची माहिती.
- पिकांच्या तांत्रिक मार्गदर्शनासाठी बैठका



## सेवानिवृत्त...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा




**पिंपरी :** महानगरपालिकेच्या ११९ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा अतिरिक्त आयुक्त जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# महानगरपालिकेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी चिंचवड :** महानगरपालिकेच्या वतीने मे २०२४ अखेर सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी-कर्मचारी अशा एकूण ११९ कर्मचा-यांचा अतिरिक्त आयुक्त जगताप यांच्या हस्ते सत्कार समारंभ पार पडला. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्कार समारंभास सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप व सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नातेवाईक आदी उपस्थित होते.

वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या कर्मचाऱ्यांमध्ये सह शहर अभियंता राजेंद्र राणे, दंतशल्य चिकित्सक डॉ.यशवंत इंगळे, लेखाधिकारी मनोज भोसले, प्रशासन अधिकारी सविता आगरकर , मुख्याध्यापक संपत पानसरे, सुजाता पानसरे , सुनिता शिंदे, जैबुनिसा शेख , वंदना क्षीरसागर , कल्पना डुंबरे, शांता तापकीर, साहेबराव सुपे, दशरथ कोंडवळे, प्रीती पाटील , छाया शिंदे,करूणा डुंबरे, विजया भोंडवे, लक्ष्मण मोहरे, सुगंधा मेमाणे , नामदेव शेळकंदे, राजेंद्र आहेर , राजश्री सिद्धेश्वर , निशा भाटीया, उपशिक्षक सुलभा बनसोडे, आशा जगदाळे , नानाभाऊ कांडेकर, अंजना ब्राम्हणकर, शाहिन शेख, अंजली काकडे, प्रकाश गायकवाड, प्रमिला कापडणीस , सुभाष कांबळे, साधना माने , उपअभियंता अनिल काशिद, सहाय्यक आरोग्याधिकारी महादेव शिंदे, भांडार अधिकारी मुबारक पानसरे , कार्यालय अधीक्षक शशिकांत चरवड , तुकाराम जाधव, मुख्य लिपिक सुनील काळोखे, उत्तम कांबळे, सुभाष मळेकर, कैलास वाघेरे, सतीश लांडगे, लिपिक विजय भोसले, वाहन चालक शंकर गायकवाड, भानुदास गाढवे, अभिमन्यू सुक्रे, लेखापाल दारासिंग मन्हास, स्टाफ नर्स संगीता साबळे, वर्षाराणी भंडारी , लॅब टेक्निशियन ममता अहलुवालिया , ए.एन. एम आशा खुर्पे, कनिष्ट अभियंता दादासो सूर्यवंशी , सर्व्हेअर राजेंद्र शिंदे, सुतार ठकाराम गवारी, प्लंबर गोविंद मोरे, कनिष्ठ अभियंता जालिंदर काळभोर, वीज 'पर्यवेक्षक अंबादास फटांगरे, वायरमन राजेंद्र जाधव, उद्यान निरीक्षक दत्तात्रय आढळे , मुख्य आरोग्य निरीक्षक वसंत सरोदे, उप अग्निशमन अधिकारी उदय यांचा समावेश आहे.

## श्रीकृष्ण निलेगावकर यांचे अकस्मात निधन

**पिंपरी :** येथील शिव साई लेन परिसरातील ज्येष्ठ नागरिक



श्रीकृष्ण निलेगावकर ( वय ७१ ) यांचे हृदय विकाराने अकस्मात निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा ,सून ,लेक ,जावई असा परिवार आहे. मुळ छत्रपती संभाजीनगरचे रहिवासी असलेले निलेगावकर हे पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन संघटना आणि श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण सभेच्या कार्यात पदाधिकारी म्हणून नेहमीच अग्रेसर असायचे. महादेव मंदिराजवळील स्मशानभूमीत निलेगावकर यांच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उन्नती सोशल फाऊंडेशनचे संचालक संजय भिसे, सिनिअर सिटीझन संघटनेचे अध्यक्ष विलास जोशी तसेच रमेश वाणी, केशव नळगीरकर, विवेकानंद लिगाडे, प्रभाकर निलेगावकर, शिरीश शिवणगीकर , संजय निलेगावकर यांनी श्रद्धांजली वाहिली.

### लोकसभेच्या निकालानंतरच मिळणार मुहूर्त

# शहरातील १०५ संस्थांच्या निवडणुका लांबणीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क






**पिंपरी :** लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका स्थगित करण्यात आल्या आहेत. राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाने राज्य सरकारच्या सूचनेमुळे ३१ मेपर्यंत या निवडणुका स्थगितीचा आदेश देण्यात आला होता. त्यानुसार पिंपरी-चिंचवड शहरातील १०५ सहकारी संस्थांच्या निवडणुकीला 'ब्रेक' लागला आहे. उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय तीन आणि सहा अंतर्गत या संस्थांचा यामध्ये समावेश आहे.

या कार्यालयातील अनेक कर्मचारी निवडणुकीच्या कामावर गेल्याने निकालानंतरच या संस्थांच्या निवडणुकांचा मुहूर्त लागणार असल्याचे चित्र आहे. आचारसंहिता संपल्यानंतर या निवडणुका घेण्याची सूचना दिली जाईल. मात्र, त्याची तारीख जाहीर न झाल्याने या निवडणुका कधी होतील, याबाबत सध्या तरी अनिश्चितता आहे.

सहकारी संस्थांवर निवडणूक प्रक्रियेद्वारे संचालक मंडळाची नियुक्ती करून त्याद्वारे संस्थेचा कारभार चालविला जातो.

निवडणुकीचा कार्यक्रम उपनिबंधक सहकारी संस्थांच्या कार्यालयांतर्गत पार पाडला जातो. मात्र, सध्या राज्यासह शहरातील मुदत संपलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत.

राज्य सरकारने रिक्त होणाऱ्या पदावर लोकसभा निवडणूक आचारसंहिता कालावधीमध्ये पदाधिकारी किंवा संचालक यांची निवड किंवा नियुक्ती करणे योग्य होणार नसल्याचे कळविले आहे. याबाबत सरकारी आदेशाचे काटेकोर पालन व्हावे, असे राज्य सरकारने कळवले आहे. त्यानुसार राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी 'ड' आणि 'ई' वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक ३१ मेपर्यंत स्थगित केली होती.

पिंपरी-चिंचवड शहरातील उपनिबंधक सहकारी संस्था तीन आणि सहा कार्यालयांतर्गत १०५ सहकारी संस्थांच्या निवडणुकांना स्थगिती मिळाली आहे. नागरी पतसंस्था, सहकारी बँका, हाउसिंग सोसायटी आदींसह विविध सहकारी संस्थांचा यामध्ये समावेश होतो. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर तीन अंतर्गत १०१ संस्थांपैकी ५९ संस्थांच्या निवडणुका बाकी आहेत. तर उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर सहा अंतर्गत २०१ पैकी ४६ संस्थांच्या निवडणुका बाकी आहेत.

# ११ कोटींचा टाऊन हॉल धूळखात पडून

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**चिखली :** शहरात ११ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या टाऊन हॉलचे उद्‌घाटन होऊनही तो वापराविना धूळखात पडून आहे. महापालिकेच्या भूमी जिंदगी आणि 'फ' प्रभाग कार्यालय यांच्या सावळ्या गोंधळात नागरिकांना तो भाड्याने वापरासाठी दिला जात नाही, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्यावतीने चिखलीतील सोनवणे वस्ती रस्त्यावर अकरा कोटी रुपये खर्चून भव्य टाऊन हॉल बांधण्यात आला आहे. या टाऊन हॉलमध्ये महिलांसाठी व्यायाम शाळा, कार्यक्रमासाठी सभागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या टाऊन हॉलचे उद्‌घाटन करण्यात आले. मात्र, त्यानंतरही टाऊन हॉलचा वापर करण्यात आला नाही.. अनेक नागरिक, खासगी आणि सामाजिक संस्थांनी कार्यक्रम घेण्यासाठी हा हॉल मिळावा यासाठी महापालिकेकडे विचारणा केली. मात्र, महापालिकेचा स्थापत्य विभाग, भूमी जिंदगी, 'फ' प्रभाग नागरिकांना तो अद्याप वापरासाठी उपलब्ध होऊ शकलेला नाही.

## जीवरक्षकाला दूरध्वनीवरून धमकी, गुन्हा दाखल

**तळेगाव :** वन्य जीवरक्षक, मावळचे संस्थापक तथा आपदा मित्र नीलेश गराडे यांना फोनवरून धमकी देण्यात आली असून याप्रकरणी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी व्यक्तींवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे. वन्यजीवरक्षक मावळ संस्थेचे आपदा मित्र नीलेश गराडे यांना एका अनोळखी पुरुष आणि महिलेने दूरध्वनीवरून धमकी दिल्याची घटना घडली आहे.

### आता १०० रुपयात करा दिवसभर अमर्यादित प्रवास

# मेट्रोची प्रवाशांसाठी भन्नाट ऑफर



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड ते पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मेट्रोने प्रवास त्रासमुक्त करण्यासाठी मेट्रो प्रशासनाने त्यांच्यासाठी नवीन दैनंदिन पास सुविधा सुरू केली आहे. दोन्ही शहरांमधील वाढती प्रवासी संख्या लक्षात घेऊन पुणे मेट्रो प्राधिकरणाने हा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामुळे प्रवाशांना दोन्ही मेट्रो मार्गांवर अमर्यादित प्रवास करता येतो फक्त १०० रुपये प्रतिदिन.

गेल्या वर्षी उद्घाटन झाल्यापासून, मेट्रोचा या दोन गजबजलेल्या प्रदेशांदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लक्षणीय फायदा झाला आहे. पिंपरी ते दिवाणी न्यायालय आणि वनाज ते रामवाडी या दोन्ही मार्गांवर आता मेट्रोची सेवा पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याने प्रवाशांना मेट्रोने प्रवास करणे सोयीस्कर झाले आहे. सुरुवातीला, पिंपरी चिंचवड शहराला कासारवाडी आणि नंतर दिवाणी न्यायालयापर्यंत जोडणारी मेट्रो सेवा पहिल्या टप्प्यात रहिवाशांसाठी दैनंदिन प्रवास सुव्यवस्थित करत आहे. दैनंदिन पास सुरू केल्याने पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील मेट्रो वापरकर्त्यांसाठी सुलभता आणखी वाढेल अशी अपेक्षा आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातून प्रवाशांना आता पुणे स्टेशन, येरवडा, वनाझ येथे मेट्रोने सहज प्रवास करता येणार आहे. मेट्रो प्रणाली प्रभावीपणे वाहतूक कोंडी कमी करत असल्याने, मेट्रो प्रवास निवडणाऱ्या प्रवाशांची संख्या सातत्याने वाढत आहे.

### मार्चमध्ये २२ लाख प्रवाशांनी मेट्रोने प्रवास केला

- केवळ मार्चमध्ये, २२ लाखांहून अधिक प्रवाशांनी मेट्रो सेवेचा लाभ घेतला, ज्यामुळे रहिवाशांमध्ये तिची वाढती लोकप्रियता दिसून येते. वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी, मेट्रो प्रशासनाने प्रवाशांसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन तिकीट पर्यायांसह विविध सुविधा सुरू केल्या आहेत.
- प्रवाशांच्या सोयीसाठी मेट्रो प्रशासनाने अनेक नवीन सुविधा सुरू केल्या आहेत. स्थानकांवर अॅप आणि तिकीट मशीनद्वारे उपलब्ध असलेल्या पारंपारिक तिकीट पद्धतींसोबतच, प्रवासी आता अखंड प्रवासासाठी बहुउद्देशीय स्मार्ट कार्डची निवड करू शकतात. शिवाय, मेट्रो प्रशासनाने १०० रुपयांमध्ये उपलब्ध दैनिक पास सुविधा सुरू केली आहे, जी दोन्ही मेट्रो मार्गांवर एकाच दिवशी सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत अमर्यादित प्रवासाची सुविधा देते.

#रा

# विश्ववेध



## मिरर ऑफ द स्काय

बोलिव्हियाला दोन राजधानी शहरे आहेत. यातील पहिले म्हणजे सुक्रे आणि दुसरे म्हणजे ला पाझ हे त्या देशातील राजकीय-व्यवस्थापकीय केंद्र.

याच बोलिव्हियाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तेथील मिठागर सालार दे ऊ्युनी. या ठिकाणचे वेगळेपण म्हणजे तेथे पृथ्वी अगदी आरशाप्रमाणे भासते.

आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तेथे आकाशाचे प्रतिबिंब झळकते आणि पृथ्वीचा आकाशाशी मिलाफ व्हावा, असा नजारा येथे दिसून येतो. सोशल मीडियावर त्याची छायाचित्रे अनेकदा व्हायरल होत असतात. अशीच एक पोस्ट सध्या चर्चेत आहे. सालार दे ऊ्युनी आपल्या निसर्ग सौंदर्यासाठी ओळखले जाते आणि हे त्याचे एक छायाचित्र, असे यात नमूद केले गेले आहे. सालार दे ऊ्युनी हे जगभरातील सर्वात मोठे मिठागर म्हणूनही ओळखले जाते.

या ठिकाणी विस्तृत क्षेत्रात मिठाचे मोठमोठे ढीग आहेत. ज्यावेळी आसपासचे झरे ओव्हरफ्लो होतात, त्यावेळी येथे दूरपर्यंत पाणी भरते आणि त्यातून आकाशाचे प्रतिबिंब दिसते. हा नजारा बराच आश्चर्यकारक आणि अचंबित करणारा असतो.

अलीकडेच सोशल मीडियावर ८ सेकंदांचा एक व्हिडीओ यामुळे बराच व्हायरल झाला असून त्यात निळ्याशार आकाशाचे प्रतिबिंब कसे निसर्ग सौंदर्याची उधळण सहजपणे अधोरेखित होते. या ठिकाणाला 'मिरर ऑफ द स्काय' या नावानेही ओळखले जाते.

## धूम पारदर्शक एलईडीची

टेलीव्हिजनच्या दुनियेत मागील एक-दोन दशकात अगदी व्यापक फेरबदल झाले आहेत. या सर्व वाटचालीत टी.व्ही. चा जणू चेहरामोहराच बदलून गेला आहे. टी.व्ही. आता चांगलाच स्लीम झाला आहे. पण यापुढील जग कसे असेल, याची एका आरपार पाहता येईल, अशा एलईडीच्या माध्यमातून अनुभवास येत असून ही आणखी एक नवी उत्क्रांतीच असणार आहे.

हा नवा एलईडी ७७ इंचाचा असेल आणि ट्रान्स्परन्ट कॉन्ट्रॅक्ट लेयर ओएलईडी पॅनेलसह असेल. रिमोटचा वापर करत लेयर हटवला तर हा एलईडी पूर्णपणे पारदर्शक होतो, अशी त्याची रचना आहे. या पारदर्शक एलईडीमुळे युजर्सना अनोखा अनुभव मिळेल, असा संशोधकांचा दावा आहे. हा एलईडी ओएस प्रणालीवर चालतो आणि ११ ए १ प्रोसेसरने जोडलेला आहे. यामुळे

पिक्चर क्वॉलिटीत बराच प्रथमदर्शना महाकाय मगराप्रमाण भासते. आतापर्यंतचे शोध नजरेखालून घात



जगभरात असे अनेक सरडे आहेत, ज्यात काही वेगळेपण अधोरेखित होत आले अ आलेला सरडा मात्र बराच वेगळा आहे. मगरीसारखा असल्याचा संशोधकांनी दान आणि याचमुळे मेक्सिकोमध्ये सापडलेल सध्या चर्चेचा विषय बनला आहे. संशोध सिटीच्या दक्षिण-पूर्वेला सुमारे ७०० किन अंतरावर असलेल्या चियापासमधील के फरक पडतो. हा सिग्नेचर ओएलईडी आर्ट शोकेसमध्येही बदलता येईल, असा आहे. येत्या वर्षभरात या नव्या तंत्रज्ञानाचा आविष्कार उपलब्ध होऊ शकेल, असे सध्याचे संकेत आहेत. ऐंशीच्या दशकात मिस्टर इंडिया या चित्रपटाने धुमाकूळ घातला होता. त्याची आठवण करून देणाऱ्या या एलईडीची उत्सुकता आता लागून राहिली नाही तरच नवल!

## धूम लेसर बुजगावण्यांची

शेतातील पिकांचे रक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना बुजगावणे लावावेच लागते. पण फक्त बुजगावण्यावर अवलंबून राहूनही अजिबात चालत नाही. कारण यानंतरही निम्मे अधिक पीक फस्त होण्याचीच शक्यता अधिक असते. आता संशोधकांनी या समस्येवर मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न केला असून लेसर बुजगावण्याचा नवा पर्याय त्यांनी उपलब्ध करून देण्यावर विचार सुरू केला आहे.

उभ्या पिकाचे सर्वाधिक नुकसान पक्ष्यांकडून होते, हे सर्वश्रुत आहे. या पार्श्वभूमीवर, जवळपास २४ तास पिकांचे संरक्षण करणे भाग असते. पुरातन काळापासून यावर एकच मार्ग राहिला आहे, तो म्हणजे बुजगावण्यांचा. त्यावर मर्यादा होत्या आणि नुकसान थांबत नव्हते. यावर मार्ग काढत आता संशोधकांनी लेसर बुजगावण्याचा हायटेक उपाय शोधून काढला आहे.

पेस्ट मॅनेजमेंट सायन्समध्ये यावर एक शोधनिबंध प्रसिद्ध झाला आहे. संशोधकांनी लेसर बुजगावणे तैनात करत त्याची चाचणी घेतली आणि यात असे अधोरेखित झाले की हे लेसर बुजगावणे २० मीटर्सपर्यंत पिकांचे अतिशय उत्तम रक्षण करतात. यामुळे आता शेतकरी देखील असे स्वस्त व पोर्टेबल लेसर उपकरण उपलब्ध व्हावे, या प्रतीक्षेत आहेत.

संशोधकांचा असाही दावा आहे की, केवळ शेतकरी ३ आठवड्यांपर्यंत आपल्या पिकांचे उत्तम रक्षण करू शकतील. या लेसरचा फार काळ उपयोग करण्याची आवश्यकता नाही, असे आढळून




आले आहे. या लेसर बुजगावण्यांमुळे पर्यावरणाचा लाभ होईल आणि अन्य वन्य जीवांना देखील नुकसान होणार नाही, असा संशोधकांचा दावा आहे. एरव्ही शेतकरी यावर मार्ग काढण्यासाठी फटाके, धमाका करू शकेल अशी बंदूक वापरात आणतात. पण त्याचे तोटे अधिक असतात आणि प्रदूषणात वाढ हे त्यात ओघानेच येते. येत्या काही महिन्यांमध्ये लेसर बुजगावण्यांचा हा पर्याय मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊ शकेल, असे सध्याचे संकेत आहेत.

## प्राचीन पोशाखातील चिठ्ठी...

कधी कधी काही घटनांची वर्णने वाचत असताना आपल्याला शेरलॉक होम्सची कथा वाचत असल्यासारखे वाटत असते. असाच एक प्रकार शंभर वर्षे जुन्या पोशाखाबाबत घडलेला आहे. या जुन्या पोशाखातील छुप्या खिशात हाताने लिहिलेल्या काही नोट्स आढळल्या. त्यामध्ये काय लिहिले आहे याचा मात्र उलगडा होत नव्हता. ते शोधण्यासाठी दहा वर्षे लागली. आता त्याचे रहस्य लोकांसमोर आले आहे.

हा पोशाख सिल्कचा म्हणजेच रेशमी असून तो सन १८८० मधील आहे. हा पोशाख २०१३ मध्ये अमेरिकेच्या एका जुन्या मॉलमध्ये सारा रिव्हर कोफिल्ड यांना सापडला. त्या डिजिटल आर्कियोलॉजिकल रेकॉर्ड नावाची संस्था चालवतात. ड्रेसच्या सिक्रेट पॉकेटमध्ये त्यांना काही नोट्स सापडल्या. त्या हातानेच लिहिलेल्या



होत्या, पण त्यामधील मजकूर समजत नव्हता.

त्यामधील शब्द अनाकलनीय होते. रिव्हर कोफिल्ड यांनी या नोट्स ऑनलाईन पोस्ट केल्या जेणेकरून लोकांपैकी कुणीतरी त्याचा अर्थ सांगू शकेल. काही लोकांनी त्यांना सांगितले की यावरील मजकूर कदाचित टेलीग्रामसाठी लिहिला गेला असेल. त्यावेळी टेलिग्राम पाठवणे ही एक सामान्य बाब होती. मात्र मजकुराचा अर्थ समजून घेण्यासाठी दहा वर्षे लागली. मॅनिटोबा युनिव्हर्सिटीतील अभ्यासक वेन चेन यांनी या नोट्समधील अर्थ सांगितला. यामधील मेसेज तसाच आहे जसा वातावरणाची चर्चा करण्यासाठी अमेरिकन सेना सिग्नलद्वारे वापरल्या जाणाऱ्या कोडचे असतात. चेनी यांनी यासाठी १८९२ मधील वातावरणाशी संबंधित टेलिग्राम कोड बुकची मदत घेतली. हे पुस्तक मेरीलँडच्या एका ग्रंथालयात ठेवलेले आहे. यामधून त्यांना समजले की हा मेसेज सिग्नल सर्व्हिस हवामान केंद्राकडून आला होता. हे केंद्र अमेरिका आणि कॅनडात हवामानाबाबत कोडमध्ये टेलिग्राम पाठवत असे. मेसेजमधील प्रत्येक ओळींमध्ये हवामानाशी संबंधित कोड आहेत. सध्याच्या नॉर्थ डकोटा क्षेत्रातील हवामान कसे आहे. याबाबतची माहिती यामध्ये आहे.

## कमी पाणी पिताय ?


उन्हाळ्यात आपल्याला तहान अधिक लागते व साहजिकच आपण अधिक पाणी पित असतो; मात्र हिवाळ्यात बरेच लोक कमी पाणी पितात. अर्थातच असे करू नये कारण आपल्या शरीरासाठी 'हायड्रेट' राहणे खूप महत्त्वाचे आहे. उन्हाळा असो वा हिवाळा, पिण्याचे पाणी अतिशय महत्त्वाचे आहे. पाणी कमी प्यायल्याने अनेक आजार होऊ शकतात.

पाणी प्यायल्याने शरीर हायड्रेट होते आणि हानीकारक पदार्थ शरीरातून निघून जातात. त्यामुळे पाणी पिणे खूप गरजेचे आहे. कमी पाणी पिण्याने मेंदूचेही नुकसान होऊ शकते.

आपल्या शरीरात सुमारे ६० टक्के पाणी आहे आणि दररोज २.५ लिटर पाणी शरीरातून बाहेर पडते. जेव्हा शरीरात १० टक्के पाण्याची कमतरता असते तेव्हा तहान लागते.

निरोगी राहण्यासाठी सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत पाणी पिणे महत्त्वाचे आहे. पाणी कधी, किती आणि कसे प्यावे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. हिवाळ्यात कमी पाणी प्यायल्याने शरीरातील डिहायड्रेशनचा धोका वाढतो. ज्याचा थेट परिणाम मेंदूवर होतो.

अशा स्थितीत स्मरणशक्ती कमकुवत होण्याचा धोका असतो. डॉक्टरांच्या मते, हिवाळ्यात ब्रेन स्ट्रोकचा धोका वाढतो, ज्याची अनेक कारणे असू



शकतात. त्यातील एक म्हणजे कमी पाणी पिणे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, थंड वातावरणात लोकांना कमी तहान लागते. त्यामुळे शरीरात डिहायड्रेशन होऊ शकते.

बऱ्याच प्रकरणांमध्ये, डिहायड्रेट राहिल्यामुळे मेंदूमध्ये रक्ताच्या गुठळ्या होऊ शकतात. त्यामुळे पक्षाघाताचा धोका असतो. कमी पाणी पिल्याने किडनीवर गंभीर परिणाम होतो. याशिवाय किडनी स्टोन होण्याचा धोकाही वाढतो. किडनी व्यवस्थित काम करण्यासाठी पाणी खूप महत्त्वाचे आहे.

जेव्हा शरीरात पाण्याची कमतरता असते तेव्हात्किडनीला जास्त काम करावे लागते. त्यामुळे युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन किंवा ट्रॅकमध्ये जळजळ होण्याची तक्रार असते.

## पिरॅमिडसारखी रचना समुद्रात

इजिप्तमधील पिरॅमिड प्रसिद्ध आहेत. पिरॅमिडसारख्या रचना प्राचीन काळातील मेक्सिकोच्या भागातही बांधल्या होत्या.

आता जपानच्या योगागुनी बेटाजवळ समुद्रात पिरॅमिडसारखी रचना आढळली आहे. काहींच्या मते हजारो वर्षांपूर्वी इथे एक शहर होते व त्याचे अवशेष पाण्याखाली आहेत. काहींना ही रचना नैसर्गिक असल्यासारखे वाटते.



ती २५ मीटर उंच आहे. किमुरा हे पंधरा वर्षांपासून या रचनेचा अभ्यास, मॅपिंग करत आहेत. ही इमारत जोमोन लोकांनी बनवली असेल असे त्यांना व अन्य काही लोकांना वाटत होते. हे लोक शिकारी होते व ते हजारो वर्षांपूर्वीच्या काळात बेटावर राहत होते. हे ठिकाण चांगल्या प्रकारे बघणारे बोस्ट युनिव्हर्सिटीचे प्रा. रॉबर्ट स्कोच म्हणाले की योगागुनी स्मारक हे मानवनिर्मित नाही. ती एक नैसर्गिक रचनाच आहे. सन १९८६ मध्ये एका व्यक्तीला सर्वप्रथम ही रचना दिसली होती. त्यावेळेपासून त्याबाबतचे संशोधन सुरू असून उलटसुलट मते व्यक्त केली जात आहेत.



## विक्रमी थ्रीडी स्ट्रीट पेंटिंग


जगभरात अनेक कलाकार रस्त्यावर त्रिमितीय आभास निर्माण करणारी भव्य पेंटिंग बनवत असतात. मात्र याबाबत लंडनमधील एका पेंटिंगची प्रसिद्धी मोठीच आहे. ब्रिटिश कलाकार जो हिल यांनी जगातील सर्वात मोठे आणि सर्वाधिक लांबीचे थ्रीडी ॲनामॉर्फिक स्ट्रीट पेंटिंग बनवले होते. लंडनच्या कॅनरी व्हार्फ येथे नोव्हेंबर २०११ मध्ये त्यांनी हे पेंटिंग बनवले. ते तब्बल १२, ४९० चौरस फूट जागेतील आहे. हे पेंटिंग बनवण्यासाठी सात दिवस लागले.

या पेंटिंगने गिनिज बुकचे दोन रेकॉर्ड यावेळी मोडले. पहिला होता सर्वात मोठ्या थ्रीडी स्ट्रीट पेंटिंगचा व दुसरा होता सर्वात लांब थ्रीडी स्ट्रीट पेंटिंगचा. 'थ्रीडी जो अँड मॅक्स'कडून हे पेंटिंग बनवले गेले. या पेंटिंगमध्ये रस्त्यावर खोल दरीचा आभास निर्माण करण्यात आला. या दरीत एक धबधबा कोसळत आहे असेही दाखवण्यात आले. दरीच्या दोन्ही बाजूला असलेले सरळ उभे 'कडे' भीतीदायक वातावरण निर्माण करीत होते. या कड्यांवरील चिंचोळ्या पट्ट्यांवर उभे राहून अनेक लोक आपले 'धाडस' दाखवत होते.

## समुद्रतळाशी एलियन ?

एलियन्स म्हणजेच परग्रहवासीयांचे अस्तित्व आहे की नाही हे अद्याप विज्ञानाने ठामपणे सांगितलेले नाही. मात्र अंतराळाच्या या अनादी अनंत पसाऱ्यात केवळ पृथ्वी नामक ग्रहावरच जीवसृष्टी असेल असे मानणे हे 'कूपमंडुक' वृत्तीसारखेच आहे. विहिरीतील बेडकाला विहीर म्हणजेच सर्व जग आहे असे वाटत असते, तसाच हा प्रकार होईल. एलियन्सबाबत अनेक दावे केले म्हणण्यास वाव आहे.

२००१ ते २००५ या काळात 'नासा'च्या 'एमीस रिसर्च सेंटर' मध्ये काम केलेल्या या संशोधकाचे नाव ओ केविन नुथ. एलियन पाण्याखाली राहून माणसावर पाळत ठेवत असतील, असे मानण्याची अनेक कारणे आहेत. ते म्हणाले की, जर एलियनना लपूनच राहायचे असेल तर समुद्रतळ हा त्यासाठी चांगला पर्याय आहे. ते तिथे बेस बनवून राहत असतील. केविन यांनी 'थेअरिज ऑफ एव्हरीथिंग' पॉडकास्टला सांगितले की पृथ्वीचा ७५ टक्के भाग पाण्यात आहे आणि त्या पाण्यापर्यंत आपली पोहोच अतिशय कमी आहे. त्यामुळे



जात असतात. जगभरातून अनेकांनी 'युफो' म्हणजेच उडत्या तबकड्या पाहिल्याचे दावे केलेले आहेत. मेक्सिकोच्या संसदेत तर एलियन्सचे कथित मृतदेहही दाखवले गेले होते. आता अमेरिकेतील 'नासा'च्या एका माजी संशोधकाने दावा केला आहे की 'युफो'चे पायलट असलेले एलियन्स जमिनीवर राहण्याऐवजी महासागरांच्या पाण्याखाली राहून मानवावर नजर ठेवत असावेत, असे एलियन्ससाठी ही जागा सर्वात सुरक्षित आणि सोयीची आहे. एक युफो तर हवा आणि समुद्रातही सहजपणे चालू शकणारे होते. दोन ग्रहांवरील तापमानातही फार फरक असतो. त्यामुळे जमिनीवर राहण्याऐवजी परग्रहवासीयांना पाण्याखाली राहणे अधिक सुरक्षित ठरू शकते. जर असे एलियन्स पाणी असलेल्या ग्रहांवरूनच आले असतील तर त्यांच्यासाठी हे अधिक चांगले आहे.

## एकाच वेळी दीडशे रसगुल्ले फस्त

सोशल मीडियावर लग्नातील एक व्हिडीओ व्हायरल झाला असून त्यामध्ये एक माणूस तब्बल १५० रसगुल्ले फस्त करत असताना दिसतो! बिहारमधील या व्हिडीओमध्ये काहीजण लग्न समारंभातील भोजनाचा आनंद घेता दिसत आहेत. मात्र या व्हिडीओमध्ये दिसणारी एक व्यक्ती बराच वेळ बैठक मारून चक्क १५० रसगुल्ले खाऊन फस्त करत असताना दिसते. लग्नाला आलेले सर्व पाहुण्यांचे जेवण उरकल्यानंतरही ही व्यक्ती आपल्या मित्रांबरोबर बसून रसगुल्ले खात होता. सोशल मीडियावर केल्या जात असलेल्या दाव्यानुसार बिहारमधील दरभंगा येथील एका लग्न समारंभातील हा व्हिडीओ आहे. विक्रमी संख्येने रसगुल्ले फस्त करणारा हा तरुण तब्बल ४ तास जेवत होता. मुलीकडून पाहुणा म्हणून आलेल्या या तरुणाला मुलीच्या घरचे आग्रह करून जेवायला घालत होते. सोशल मीडियावरील दाव्यानुसार या तरुणाचे नाव त्रिलोक पाठक असे आहे. तो दरभंगामधील बिरोल येथील हरौली गावाचा रहिवाशी आहे. त्रिलोक प्रत्येक लग्नामध्ये अशाच पद्धतीने जेवतो, असे गावकऱ्यांनी सांगितले.



कधी १००-१५० रसगुल्ले खातो तर कधी १००-१५० आंबे खातो. पोटभर जेवल्यानंतर त्रिलोक २ ते ४ किलो नुसतं दही खाऊ शकतो, असा गावकऱ्यांचा दावा आहे. मिथिला हा प्रांत तेथील खाद्य संस्कृतीसाठी प्रसिद्ध आहे. येथील पाहुणचाराची चर्चा संपूर्ण बिहारमध्ये असते.

मिथिला संस्कृतीची ओळख असलेल्यांना मुलीकडील नातेवाईक कशापद्धतीने आग्रहाने आपल्या पाहुण्यांना खाऊ घालतात याची कल्पना आहे. आग्रह करून नातेवाईकांना खाऊ घालण्याची येथे परंपराच आहे. त्रिलोकलाही अशाच पद्धतीने तब्बल ४ तास जेवू घालण्यात आले.

## पांढऱ्या धुराचे रहस्य

आपल्या आजूबाजूला आपण अनेक गोष्टी रोज पाहत असतो. पण आपल्यापैकी खूप कमी जण त्याचा अतिशय बारकाईने विचार करतात. आता इंधनाचा विचार केला तर कोळसाही नजरेसमोरून तरळून जातो.

कोळसा काळा असतो. पण ज्वलनशील झाल्यानंतर त्यातून निर्माण होणारी आग मात्र लालबुंद, पिवळसर असते आणि त्यातून बाहेर पडणारा धूर वेगवेगळ्या रंगांचा असतो. यामुळे, कोळसा काळा, आग लालसर आणि धूर पांढऱ्या रंगाचा कसा, हा प्रश्न पडणे स्वाभाविक ठरतो. हे कसे होते, याचे कारणही अतिशय रंजक आहे.



सर्वात महत्त्वाचे म्हणजे, धूर कोणत्या घटकाच्या जळण्यातून बाहेर पडतो, यावर त्याचा रंग अवलंबून असतो. हिवाळ्यात आपण ऊब मिळण्यासाठी पेटलेल्या कोळशावर हात शेकतो. काही घरांमध्ये कोळशाच्या शेगडीवर अन्न शिजवले जाते. धुराचे विविध प्रकार असतात. धुराच्या रंगामुळे तो कशापासून निघालाय हे स्पष्ट होते. उदाहरणार्थ काळा, दाट धूर सूचित करतो, की जवळपास एखादी गोष्ट तीव्र आगीने लपेटलेली आहे.

याशिवाय मंद, पांढरा आणि पसरणारा धूर, जो प्रथम दाट आणि लवकरच विरळ होणारा असतो, तो वाफेचे संकेत देतो. तपकिरी धूर लाकूड ओले किंवा अर्धवट जळाल्याचे दर्शवतो. कोळसा, कचरा, कच्चे लाकूड यासारख्या वस्तू जाळल्याने निर्माण होणारा धूर पर्यावरणासाठी सर्वात धोकादायक असतो.

हा धूर हवेत मिसळल्यावर हवेच्या गुणवत्तेवर परिणाम करतो आणि त्यामुळे माणसाला, प्राण्यांना, सर्वच घटकांना त्रास होतो. जेव्हा कोळसा जाळला जातो आणि तो थोडासा ओला असेल, तर त्यातून पांढरा धूर येतो. वास्तविक कोळसा जाळल्यावर सल्फाइड तयार होतो. त्यामुळे कोळसा काळा, आग लाल असूनही पांढरा धूर बाहेर पडतो. हा धूर पर्यावरणासाठी अत्यंत हानिकारक असतो.



## आकाशावर तरंगते बेट!

रोराईमा पृथ्वीवरील सर्वात जुन्या पर्वतांपैकी एक आहे. दक्षिण अमेरिकेतील टेबलटॉप पर्वत अशी त्याची खास ओळख आहे. या पर्वताचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा अगदी उंचावरील भाग आश्चर्यकारकपणे अतिशय सपाट आहे. हा पर्वत ब्राझील, गयाना व व्हेनेझुएलाच्या जंक्शनवर आहे.

व्हेनेझुएलाचा मोठा हिस्सा असलेल्या ग्रेट सबानाच्या मैदानावर आकाशात तरंगणाऱ्या बेटासारखा हा पर्वत भासतो. याच पर्वताची काही छायाचित्रे व व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहेत. हा पर्वत पाकैरिमा माऊंटेन रेंजचा भाग अद्भुत संरचना, प्राणी व पृथ्वीवर आणखी कुठेही सापडणार नाहीत, अशा वृक्षसंपदेने वेढला गेला आहे, असे यातील एका पोस्टमध्ये म्हटले गेले आहे.

रोराईमाला रोराईमा या नावानेही ओळखले जाते. या पर्वताचे छायाचित्र अतिशय अद्भुत मानले जाते. जिओलॉजी सायन्स या वेबसाईटने दिलेल्या माहितीनुसार, हा पर्वत दक्षिणपूर्व व्हेनेझुएलाच्या कनैमा नॅशनल पार्कमध्ये स्थित असून त्याचा विस्तार ब्राझील व गयानातील क्षेत्रात देखील आहे. हा पर्वत २८१० मीटर (९२१९ फूट) उंच आहे आणि साहजिकच तो अभ्यासकांमध्ये विशेष आकर्षण केंद्र ठरत आला आहे.

### इनामगावात जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

# नऊ जणांसह पंच्याहत्तर हजारांचा ऐवज कारवाईत जप्त

**शिक्रापूर :** इनामगाव ता. शिरुर येथील सिद्धेश्वर मंदिराजवळ सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने कारवाई करत छापा टाकून जुगार खेळणाऱ्या नऊ जणांना ताब्यात घेत तब्बल पंच्याहत्तर हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणी नऊ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इनामगाव ता. शिरुर येथील सिद्धेश्वर मंदिराजवळ काही इसम पत्त्यांच्या सहाय्याने जुगार खेळत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाला मिळाली. त्यांनतर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस हवालदार संजू जाधव, जनार्दन शेळके, राजू मोमीन यांसह आदींनी सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली असता काही इसम गोल रिंग करुन बसून मध्यभागी पत्ते व पैसे टाकून जुगार खेळत असल्याचे दिसले. दरम्यान, पोलिसांनी त्यांना जागेवर पकडत त्यांच्या जवळील जुगाराचे साहित्य तसेच रोख रक्कम व आदी साहित्य जप्त केले. याबाबत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस हवालदार संजू ज्ञानदेव जाधव रा. शिरुर ता. शिरुर जि. पुणे यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी गणेश पोपट कोऱ्हाळे वय ४३ वर्षे, सखाराम दादा भालेराव वय ५४ वर्षे, भारत बाबुराव गवळी वय ५५ वर्षे, बाबा छबन भालेराव वय ४८ वर्षे, रामदास पाटील बुवा मचाले वय ४५ वर्षे, बाळासाहेब दिगंबर तनपुरे वय ५८ वर्षे, आजिनाथ एकनाथ विटेकर वय ५३ वर्षे सर्व रा. इनामगाव ता. शिरुर जि. पुणे, सतीश उत्तम फलके वय ४८ वर्षे रा. पिंपळसुटी ता. शिरुर जि. पुणे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक जोतीराम गुंजवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक राहुल भवर हे करत आहे.

### बिल मागितल्याचा धरला राग: बारच्या काचा फोडल्या, वाहनांचीही केली तोडफोड

# दारुच्या नशेत बिअर बारमध्ये राडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**उरुळी कांचन:** हवेली तालुक्यातील सोरतापवाडी येथील परमिट रुममध्ये पिलेल्या दारूचे बिल मागितल्याच्या कारणावरून सहा जणांनी दोघांना लोखंडी पाईपने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. तसेच शिवीगाळ व दमदाटी करुन बारच्या खिडकीची काच फोडून नुकसान केले आहे. याचबरोबर हॉटेलच्या बाहेर उभ्या असलेल्या टी २० व फॉर्च्युनर वाहनांचे नुकसान केले आहे. या प्रकरणी सहा जणांवर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार वरील सहाजण परमिट रूममध्ये आले व दारू प्याले. त्यानंतर गौड यांनी त्यांना दारूचे बिल मागितले. याचा राग आल्याने स्वप्नील चौधरी व हनुमंत चोरगे यांनी व्यवस्थापक गौड व महेश पोपट चौधरी यांना लोखंडी पाईपने बेधम मारहाण व दमदाटी करून शिवीगाळ केली. तसेच शटरवर दगडफेक केल्याने त्यातील दगड हॉटेलमधील कामगार बबलु अंन्सारी याला लागून तो जखमी झाला. हा संपूर्ण प्रकार बुधवार (दि. २९ मे) रोजी रात्री १० वाजून ४५ मिनिटांच्या सुमारास घडला. हॉटेल अभिराज (नायगाव फाटा, सोरतापवाडी ता. हवेली) येथे ही घडला आहे.

या प्रकरणी हॉटेल व्यवस्थापक मोहन वासु गौड (वय ४३, सध्या रा. हॉटेल अभिराज नायगाव फाटा, सोरतापवाडी ता. हवेली, मुळ गाव महाराज बिल्डींग ब्राम्हनगर, ता. माझगाव जि. बेळगाव, राज्य - कर्नाटक) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यावरून स्वप्निल चौधरी (रा. पेठ वडाची वाडी ता. हवेली), यश (पुर्ण नाव माहीत नाही), नंदु उर्फ हनुमंत चोरगे (रा. म्हातोबाची आळंदी ता. हवेली), यश संपत चौधरी (रा. वडाची वाडी पेठ ता. हवेली), शिवम शिवरकर (रा. म्हातोबाची आळंदी ता. हवेली), उत्कर्ष बाबर (रा. सोरतापवाडी, कडवस्ती ता. हवेली) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर त्यांनी बारच्या खिडकीची काचा फोडून नुकसान केले. तसेच हॉटेल बाहेर उभ्या असलेल्या आय २० व फॉर्च्युनर या दोन चारचाकीवर दगडाने हल्ला केला व यामा कंपनीची मोटारसायकलने धडक देऊन दोन्ही गाड्यांचे मोठे नुकसान केले. त्यानंतर शिवीगाळ करत तिथून ते निघून गेले.

» क्राईम

मोहन गौड यांनी दिलेल्या तक्रारीनुसार वरील सहाजणांवर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार जगताप करीत आहेत.

**आधीही किरकोळ कारणावरून मारहाण...**

● दहा दिवसांपूर्वी कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील लोणी स्टेशन चौकातील हॉटेल आशीर्वादच्या शेजारी यातील काही आरोपींनी किरकोळ कारणावरून लाथा बुक्क्यांनी तसेच दगड व विटाच्या सहाय्याने तिघांना बेदम मारहाण केली होती. या प्रकरणी याच आरोपींवर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# जितेंद्र आव्हाडांच्या कृतीचा निषेध



**जुन्नर :** महाड येथील चौदार तळे येथे मनुस्मृतीच्या विरोधात आंदोलन करीत असताना आमदार जितेंद्र आव्हाड यांनी राजकीय स्वार्थापोटी भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा फाडून अपमान केल्याचा निषेध म्हणून भारतीय जनता पार्टी जुन्नरच्यावतीने आव्हाड यांच्या प्रतिमेला चपला मारून जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येऊन अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे.

भाजप नेत्या आशा बुचके, तालुका अध्यक्ष संतोष खैरे, आशिष माळवदकर, निलेश गायकवाड, संजय चिखले, श्रीकांत मिरगुंडे, संजय परदेशी, अमोल भुजबळ, अनिल रोकडे, जयदास साळवे, बाळासाहेब सोनवणे, वैभव परदेशी, नानभाऊ कुऱ्हाडे, विनोद भगत, संतोष खंडागळे, गणेश सूर्यवंशी, दत्ता वाकचौरे आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते या निषेध आंदोलनात सहभागी झाले होते. जाती जातीत तेढ निर्माण करून भावना दुखावणारे व राजकीय पोळी भाजणारे एकाच व्यक्तीचे चेले आहेत. मनुस्मृती जळताना बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो फाडण्याचे जे काम जितेंद्र आव्हाड यांनी केले या घटनेचा यावेळी तीव्र शब्दात जाहीर निषेध व्यक्त करण्यात येऊन उपस्थितांनी आव्हाड यांच्या प्रतिमेला चपलांनी मार दिला. तहसीलदार रविंद्र सबनीस , पोलिस उपअधीक्षक रविंद्र चौधर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली.

पान १ वरून

## विठ्ठल मंदिराच्या तळघरात सापडला जुना ठेवा

तळघरात कोणत्या वस्तू असणार याबाबत उत्सुकता लागली होती अखेर प्राथमिक विभागाने पाहणे करून तळघरात कोणकोणत्या वस्तू आहेत याची माहिती दिली. मंदिराच्या जीर्णोध्दाराचं काम सुरू आहे. पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनानुसार मंदिराला मूळ स्वरुप देण्याचे काम सुरू असताना विठ्ठल मंदिरात हनुमान दरवाज्याखाली तळघर सापडले आहे. वंश परंपरागत पुजारी, वारकरी संप्रदाय, पुरातत्व तज्ञ यांच्या समोर शुक्रवारी संध्याकाळच्या सुमारास हे तळघर उघडण्यात आले. यावेळी दोन मूर्ती भग्न अवस्थेत आढळली तर १ मुर्ती चांगल्या स्थितीतील आहे. मूर्तीवर धूळ बसल्याने मूर्ती कोणत्या देवाची आहे हे समजू शकले नाही. मुर्तीची स्वच्छता केल्यानंतर या मुर्ती कोणत्या देवाच्या आहेत किंवा अन्य कसल्या आहेत हे कळणार आहे. ही मूर्ती विष्णूशी मिळतीजुळती असल्याचे सांगितले जात आहे. मूर्तीसोबतच अन्य काही वस्तूही आढळल्या आहेत. तळघरातील या वस्तू पाहिल्या तर साधारण १५०० वर्षांपूर्वीच्या असू शकतात, असा अंदाज लावला जात आहे. पुरातत्व विभागाच्या संशोधनात हे समोर याची माहिती समोर येऊ शकते. विठ्ठल मंदिराजवळील हनुमान गेटजवळ तळघराचा दरवाजा सापडला. त्यात प्रवेश केला असता काही बांगड्याचे तुकडे, तसेच काही नाणी सापडल्याचे पुरातत्व विभागाने सांगितले आहे.

## आठ राज्यांतील ५७ जागांवर आज मतदान

याशिवाय ममतांचे पुतणे अभिषेक बॅनर्जी, अफजल अन्सारी, विक्रमादित्य सिंग हेही नशीब आजमावत आहेत. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, सातव्या टप्प्यात 904 उमेदवार निवडणूक लढवत आहेत. त्यापैकी 809 पुरुष आणि 95 महिला उमेदवार आहेत.या टप्प्यातील सर्वात श्रीमंत उमेदवार हरसिमरत कौर बादल या पंजाबमधील भटिंडा येथील उमेदवार आहेत. त्यांच्याकडे 198 कोटी रुपयांची संपत्ती आहे.लोकसभेच्या 542 जागांपैकी सहाव्या टप्प्यापर्यंत 485 जागांवर मतदान झाले आहे. शेवटच्या 57 जागांसाठी 1 जून रोजी मतदान होणार आहे. गुजरातमधील सुरतमधून भाजपचे उमेदवार मुकेश दलाल यांनी बिनविरोध निवडणूक जिंकली आहे, त्यामुळे केवळ ५४२ जागांवर मतदान होत आहे.

## प्रज्वल रेवण्णाला ६ जूनपर्यंत पोलिस कोठडी

यानंतर कोर्टाने रेवण्णाला आता न्यायालयाने पोलिस कोठडी शिक्षा ठोठावली आहे.प्रज्वल रेवण्णाविरोधात तीन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले आहेत. त्यात 3 बलात्काराचे आणि लैंगिक शोषणाच्या गुन्ह्याचा समावेश आहे. यासह रेवण्णाचे महिलांसोबत 2500 अश्लील व्हिडीओ असल्याचा दावाही केला जात आहे.

## जरांगेंना दिलासा

मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील हे पुणे न्यायालयामध्ये दुपारी 12 वाजता पोहचले. न्यायालयाने त्यांना 2013 साली कोथरूड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका फसवणुकीचा गुन्ह्यामध्ये वॉरंट बजावले होते. त्यानंतर ते न्यायालयासमोर न्यायालयात हजर झाले. त्यावेळी जरांगे पाटील यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की, न्यायालयाच्या समोर सर्व समान आहेत. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यासाठी मी न्यायालयात हजर झालो आहे. याविषयी अधिक बोलणे योग्य होणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

काय आहे प्रकरण?

जरांगे पाटील यांच्या शिवबा संघटनेने 2013 साली एका नाटकाचे आयोजन केले होते. या नाटकाचा प्रयोग झाल्यानंतर त्याचे पैसे देण्यात आलेले नव्हते असा आरोप आहे. याप्रकरणी न्यायालयामध्ये तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुसार कलम 156 (3) प्रमाणे न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यामध्ये जरांगे पाटील यांना अटकपूर्व जामीन देखील मिळालेला होता. याच प्रकरणात त्यांना आता न्यायालयाने वॉरंट बजावले होते. त्याच प्रकरणात आज सुनावणी झाली आहे.

## बारावीची पुरवणी परीक्षा १६ जुलैपासून होणार सुरू

दहावीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षा १६ ते ३० जुलै दरम्यान होणार आहे. तर बारावीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षा १६ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत होणार आहे. तसेच बारावीच्या माहिती तंत्रज्ञान, सामान्यज्ञान विषयाची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने सात आणि आठ ऑगस्ट रोजी घेण्यात येणार आहे.

पुरवणी परीक्षेचे विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या 'www.mahahsscboard.in' या अधिकृत संकेतस्थळावर सोमवारपासून (ता.३) उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय यांच्याकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सअॅप किंवा अन्य माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये, असे आवाहन राज्य शिक्षण मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी केले आहे.

### उपविभागीय अधिकारी जोगेंद्र कट्यारे यांचे गंभीर आरोप

# आरोपांचे खंडन, चौकशीची मागणी!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**राजगुरूनगर :** पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे व खेड-आळंदी विधानसभेचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्यावर खेडचे उपविभागीय अधिकारी जोगेद्र कट्यारे यांनी गंभीर आरोप केले आहेत. त्याचबरोबर कट्यारे यांनी दिवसे यांची लोकसभेच्या निकाला अगोदर बदलीही करण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

निवडणूक आयोग व प्रधान सचिव यांना लिहिलेल्या पत्रात सुहास दिवसे हे राजकीय प्रभावातून काम करत असल्याचा आरोप कट्यारे यांनी केला आहे. तसेच लोकसभा निवडणुकांच्या मतमोजणी आधीच त्यांची बदली करण्याची मागणी खेडचे प्रांताधिकारी आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी जोगेंद्र कट्यारे यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून केली आहे. पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे हे खेड-आळंदी विधानसभेचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या प्रभावाखाली काम करत असल्याचा गंभीर आरोपदेखील प्रांताधिकारी जोगेद्र कट्यारेनी यांनी लिहिलेल्या पत्रातून केला आहे. सध्या खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघातून अजित पवार गटाचे दिलीप मोहिते पाटील आमदार आहेत. त्यामुळे कट्यारे यांनी केलेल्या आरोपातून कुणाला लक्ष केले जाणार याचीही चर्चा रंगू लागली आहे.

**प्रकरणाची सीबाआय चौकशी करावी: आ. दिलीप मोहितेंची मागणी**

● या संदर्भात आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी माध्यमांच्या समोर येऊन आपली बाजू मांडली आहे. मोहिते यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, या प्रकरणाच्या चौकशीसाठी विधानसभेच्या समोर उपोषणाला बसण्याचा इशारा मोहिते पाटील यांनी दिला आहे. मी त्यांना कोणतेही काम असे करा, तसे करा म्हणून सांगितले नाही. किंवा तसे कोणासाठी पत्रही दिले नाही. आर्थिकचा तर काही प्रश्नच नाही, माझी तर विनंती आहे की, या प्रकरणाची थेट सीबीआय चौकशी लावा अशी मागणी खेडचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी दिला आहे

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना प्रशासनाकडून अभिवादन



**बारामती :** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त तहसीलदार गणेश शिंदे यांनी तहसिल कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी महेश हरिश्चंद्रे तसेच तहसील कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

# जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत व बहुजन समाजाचा लोकदेव असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या गडावर राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती श्री मार्तंड देवसंस्थान, पुजारी सेवक वर्ग, ग्रामस्थ यांच्यावतीने साजरी करण्यात आली.

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त विश्वस्त मंडळ, समस्त ग्रामस्थ, खांदेकरी, मानकरी, पूजारी सेवेकरी वर्ग, भाविक भक्त यांचेवतीने राजमाता अहिल्यादेवींना अभिवादन करून पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी भंडाऱ्याची उधळण करून, येळकोट येळकोट जय मल्हार, सदानंदाचा येळकोट तसेच अहिल्यादेवींच्या विजयाच्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी श्री मार्तंड देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अनिल सौंदडे, विश्वस्त अभिजीत देवकाते पाटील, ॲड. पांडुरंग थोरवे, ॲड. विश्वास पानसे, मंगेश घोणे, डॉ. राजेंद्र खेडेकर, पोपट खोमणे, स्थानिक ग्रामस्थ, मानकरी, पुजारी सेवेकरी, देवसंस्थानचे अधिकारी व सेवेकरी वर्ग उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

तमाम सर्व लोकांना विशेषतः गांव मौजे भिलारवाडी ता. बारामती, जि.पुणे, बारामती तालुक्यातील व पुणे जिल्हयातील सर्व लोकांना कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक नानासो उर्फ नानासाहेब माधवराव जगताप, संदीप बाळासो सूर्यवंशी, संतोष मारूती जगताप, सर्व रा. पणदरे ता. बारामती जि.पुणे यांचे मालकी हक्काची व ताबे वहीवाटीची आहे. वरील विद्यमान मालकांनी सदर मिळकत त्यांच्या नावे मालकी हक्काने असल्याची खात्री व भरवसा आमचे अशिलांना देवून सदर मिळकत आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून तशी बोलणी करून सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी आहे व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

तरी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षीस, करार, साठेखत, कुलमुखत्यारपत्र, विसार पावती, ताबा, खरेदी, लीज, लीन, पोटगी किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधीतांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येवून खात्री करून द्यावी व लेखी हरकत घ्यावी. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे, असे समजून तसेच असे कोणाचेही हक्क वा अधिकार असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीहीं तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :** तुकडी पुणे, पोट तुकडी व तालुका बारामती यांचे हददीतील तसेच मे. दुय्यम निबंधक सो, बारामती यांचे अधिकार कक्षेतील तसेच जिल्हा परिषद, पुणे व तालुका पंचायत समिती, बारामती यांचे अधिकार कक्षेतील गांव मौजे पळशिवाडी, ता. बारामती, जि. पुणे येथील गट नं. ९५ वहीती क्षेत्र ३ हे. १४.०० आर चौ.मी. + पो.ख. ००हे. २०.०० आर चौ.मी असे एकुण ३ हे. ३४.०० आर चौ.मी. शेतजमीन मिळकत, व सदरील गटातील एक नवीन विहीर, त्यावरील इले. मोटार, पाईपलाईनने पाणी घेण्याचे हक्कासह, यास रस्ता वापर वहीवाट करण्याच्या हक्कासह यांसी चतुः सिमा- पुर्वेस गट नं. ९२ व सर्व्हे नंबर रस्ता,, दक्षिणेस- गट नं.९५ पैकी लिहुन देणार यांचे शिल्लक क्षेत्र, पश्चिमेस - सर्व्हे नं. रस्ता व गट नं. ११७, उत्तरेस -गट नं. ९६, येणेप्रमाणे चतुः सिमापूर्वक वर्णन केलेली शेतजमीन मिळकत. येणेप्रमाणे जाहिर नोटीस दिली असे

दि.३१/०५/२०२४

शिक्का

**ॲड. सतिश दादा महानवर**
**प्रट नं. ०४, बिल्डींग सी कृष्णयोग**
**टाऊनशिप सुर्यनगरी बारामती जि. पुणे**
**मो. नं. ९४२३८५८८१४**

**जाहीर नोटीस (कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत नोटीस)**

तमाम लोकांस या नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील मुकुंद रघुनाथ कुलकर्णी तर्फे कु मु अनिरुद्ध मुकुंद कुलकर्णी हे खाली नमूद केलेल्या मौजे डोणजे येथील गावठाणातील बखळ मिळकतींचे विद्यमान मालक आहेत.
ग्राम पंचायत मिळकत नंबर ४१० (जुना २७२) यांसी अंदाजे क्षेत्र १३८६ चौ. फूट.;
ग्राम पंचायत मिळकत नंबर ४११ (जुना २७३) यांसी अंदाजे क्षेत्र २२०४ चौ. फूट.
सदर मिळकतींचे सविस्तर माहिती येणेंप्रमाणे

| क्र. | दिनांक | दस्त क्र. | हवेली क्र. | लिहून देणार | लिहून घेणार |
|---|---|---|---|---|---|
| १ | १७/०३/१९९२ | ११७८/१९९२ | ९ | दिलीप रामचंद्र जोशी | जयश्री बालाजी देशपांडे |
| २ | २८/०६/२०११ | ५७११/२०११ | ११ | जयश्री बालाजी देशपांडे | मुकुंद रघुनाथ कुलकर्णी तर्फे कु मु अनिरुद्ध मुकुंद कुलकर्णी |

दिनांक १७/०३/१९९२ रोजी सह दुय्यम निबंधक हवेली क्र. ९ येथे नोंदविलेल्या दस्त क्र ११७८/१९९२ सदर मूळ दस्त सूची क्र. २ व मूळ पावती हे गहाळ झालेले आहेत.

ग्राम पंचायत मिळकत नंबर ५९१/१ यांसी अंदाजे क्षेत्र ५००० चौ. फूट. व त्यावरील बांधकाम ग्राम पंचायत मिळकत नंबर ५९१/२ यांसी अंदाजे क्षेत्र ९६२७ चौ. फूट. व त्यावरील बांधकाम

| क्र. | दिनांक | दस्त क्र. | हवेली क्र. | लिहून देणार | लिहून घेणार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०/०९/२००० | ८०८४/२००० | ९ | नीलिमा विनायक जाईल व सरलाबाई रामचंद्र जाईल | साहिल महेश जैन व करिष्मा साहील जैन |
| २ | २२/१०/२००७ | ७८२२/२००७ | १६ | साहिल महेश जैन व करिष्मा साहील जैन | विनायक जाईल व रोहन जाईल |
| ३ | २९/१२/२००७ | ४३८/२००८ (ग्राम पंचायत मिळकत नंबर ५९१/१-क्षेत्र ५००० चौ फूट) | १६ | विनायक जाईल व रोहन जाईल | लक्ष्मण भीमराव गवंडी |
| ४ | ०१/०३/२००८ | २०६९/२००८ (ग्राम पंचायत मिळकत नंबर ५९१/२-क्षेत्र ९६२७ चौ.फूट.) | १६ | विनायक जाईल व रोहन जाईल, लक्ष्मण भीमराव गवंडी | भास्कर दत्तात्रय स्वामी व कल्पना भास्कर स्वामी |
| ५ | २२/०७/२००८ | ७४७५/२००८ (ग्राम पंचायत मिळकत नंबर ५९१/२ - क्षेत्र ९६२७ चौ.फूट.) | ११ | भास्कर दत्तात्रय स्वामी व कल्पना भास्कर स्वामी | मुकुंद रघुनाथ कुलकर्णी तर्फे कु मु अनिरुद्ध मुकुंद कुलकर्णी |
| ६ | ०३/०४/२०१२ | २८६४/२०१२ (ग्राम पंचायत मिळकत नंबर ५९१/१ - क्षेत्र ५००० चौ फूट) | १६ | लक्ष्मण भीमराव गवंडी | मुकुंद रघुनाथ कुलकर्णी तर्फे कु मु अनिरुद्ध मुकुंद कुलकर्णी |

दिनांक २०/०९/२००० रोजी सह दुय्यम निबंधक हवेली क्र. ९ येथे नोंदविलेल्या दस्त क्र ८०८४/२००० तसेच दिनांक २२/१०/२००७ रोजी सह दुय्यम निबंधक हवेली क्र. १६ येथे नोंदविलेल्या दस्त क्र ७८२२/२००७ सदर मूळ दस्त, सूची क्र. २ व मूळ पावती हे गहाळ झालेले आहेत.

आमचे अशिलांनी सदर मिळकत क्रमांक ४१०,४११,५९१/१, ५९१/२ व इतर मिळकतींचे एकत्रीकरण केलेले असून सदर एकत्रीकरण करून त्यास मिळकत क्र. ४०८ असा पडलेला आहे.

सदर मिळकतींबाबत टायटल व्हेरिफिकेशन करण्याकरिता सर्व कागदपत्रे शोधले असता वर नमूद केलेल्या मूळ करारनाम्यांचे सेल डीड त्यांचे सूची २ व पावत्या असे सर्व मूळ दस्तऐवज आमच्या अशिलांकडून गहाळ झाले आहेत आमचे अशिलांनी सदरचे कागदपत्रे सर्वत्र शोधले असता आढळून येत नाहीत.

आमचे अशिलांनी सदरचे कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत दिनांक ३०/०५/२०२४ रोजी कोथरूड पोलीस स्टेशन पुणे येथे ऑनलाईन प्रॉपर्टी मिसींग तक्रार प्रॉपर्टी मिसींग नं ७४१६७/२०२४ व ७४१७३/२०२४ अन्वये नोंदविलेली आहे; तसेच त्याबाबत प्रतिज्ञालेख केला आहे व सदरचे कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. तरी सदरचे मूळ कागदपत्रे कुणासही आढळून आल्यास त्यांनी खालील दिलेल्या पत्यावर आणून द्यावेत. येणेप्रमाणे सदरची जाहीर नोटीस असे.

**ठिकाण - पुणे**
**दिनांकः १/०६/२०२४**

**MSG LEGAL AND ASSOCIATES**
**ADV. SHREYAS. R. GANDHI**
**3 FIRST FLOOR, SHRI SADGURU AUDUMBER, CTS 606, RASTA PETH, PUNE-411011; Mob. No.: 08605539721. Email Id : msglegal252@gmail.com**

**शिक्रापूर :** अल्पवयीन युवती शाळेत व शिकवणीला जात असताना गावातील सागर बांदल हा वारंवार युवतीचा पाठलाग करुन युवतीशी बोलण्याचा आणि असभ्य वर्तन करत होता, सागर याने युवतीला थांबवून मनास लज्जा निर्माण होईल असे वर्तन केले. याबाबत पिडीत युवतीने शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. पोलिसांनी सागर संजय बांदल याच्या विरुद्ध विनयभंग बाललैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## तक्रारीची दखल नाही: वाईन शॉपचा गाळा रिकामा करण्यास टाळटाळ

# राज्य उत्पादन शुल्क, पोलिसांशी सलगी?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वाघोली :** येथील आव्हाळवाडी रस्त्यावर असलेल्या वाईन शॉपचा करार संपून काही महिने उलटले. परंतु, राज्य उत्पादन शुल्क व पोलीस अधिकाऱ्यांशी असलेल्या सलगीमुळे वाईन शॉप व्यावसायिक गाळा रिकामा करण्यासाठी टाळाटाळ करत आहे. वाईन शॉप स्थलांतरित करण्याबाबत राज्य उत्पादन शुल्क विभाग व पोलिसांकडे वारंवार तक्रार करूनही अद्यापही दुकान स्थलांतरित करण्यात आलेले नाही. त्यामुळे अखेर गाळा मालकाने सामाजिक कार्यकर्ते संदीप थोरात यांचेकडे मदतीची मागणी केली आहे. संबधित अधिकारी वाईन शॉप व्यावसायिकाला सातत्याने पाठीशी घालत असल्याने थोरात यांनी हे प्रकरण थेट आमदार रवींद्र धंगेकर यांच्या दालनात नेल्याने आता राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

वाघोली-आव्हाळवाडी रस्त्यावर उर्मिला अग्रवाल यांचा गाळा आहे. या गाळ्यामध्ये २०१७ मध्ये वाईन शॉप व्यावसायिकाने पाच वर्षांचा करार करून हे दुकान सुरु केले. करार संपल्याने थकीत भाडे देऊन दुकान अन्य ठिकाणी स्थांतरित करावे, असे संबधित वाईन व्यवसायिकाला गाळा मालकाने सांगितले. वारंवार सांगूनदेखील वाईन व्यावसायिक गाळा खाली करत नसल्याने गाळा मालकाने राज्य उत्पादन शुल्क व पोलिसांकडे तोंडी व लेखी तक्रारी केल्या.

वाईन व्यावसायिकाची संबधित अधिकाऱ्यांशी असलेल्या सलगीमुळे दुकान स्थलांतरित करण्याऐवजी गाळा मालकास उलट अरेरावी करून टाळाटाळ करत राहिला. तक्रारी देवून सुद्धा राज्य उत्पादन शुल्क व पोलीस अधिकारी वाईन व्यवसायिकाला पाठीशी घालत असल्याने अखेर गाळा मालक श्रीमंत गणेश तरुण मंडळाचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडे मदतीची मागणी केली. त्यानुसार थोरात यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी व पोलिसांशी संपर्क करून गाळा मालकाला न्याय मिळावा यासाठी प्रयत्न केले. परंतु, वाईन शॉप व्यावसायिक गाळा खाली करत नसल्याने थोरात यांनी राज्य उत्पादन शुल्क अधीक्षकांसह मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली. मात्र, तरीदेखील अधिकाऱ्यांनी वाईन शॉप व्यावसायिकाला पाठीशी घालत कारवाईबाबत उदासीनता दाखवली.

अखेर थोरात यांनी हे प्रकरण आमदार रवींद्र धंगेकर यांच्या दालनात नेले. आमदार धंगेकर यांनी तात्काळ या प्रकरणाची दखल घेऊन गाळा मालकाला न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे. वाघोली येथील बेकायदेशीर वाईन शॉपवर कारवाई करावी, अशी मागणी संदीप थोरात यांनी आमदार रवींद्र धंगेकर यांचेसह अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

> राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक संजय कोल्हे वाघोली येथील वाईन शॉप स्थलांतर करणेबाबतचा अहवाल बनवून वरिष्ठांकडे सादर करणार आहेत.
>
> **- अभय आवटे,** उपनिरीक्षक-राज्य उत्पादन शुल्क

> संबधित विभागाकडे गाळा मालक अनेक महिन्यांपासून वारंवार लेखी तक्रारी करून सुद्धा कारवाई होत नसेल, तर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयामध्ये आमदार रवींद्र धंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ठिय्या आंदोलन करण्यात येईल.
>
> **- सीमा गुट्टे,** सदस्या-महाराष्ट्र राज्य कमिटी

# किल्ले सर करीत अहिल्यादेवी होळकरांना गिर्यारोहकांची मानवंदना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर:** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीदिनाचे औचित्य साधत दोन दिवसांत पालघर जिल्ह्यातील कोहोज, मनोर, अडसुळगड, असावागड आणि काळदुर्ग हे पाच गिरीदुर्ग ३५ किलोमीटरची पदभ्रमंती करीत टीम पॉइंट ब्रेक ॲडव्हेंचर्सच्या गिर्यारोहकांनी सर करून राजमाता अहिल्यादेवींना अनोख्या पद्धतीने वंदन केले.

या मोहिमेची सुरूवात शेलटे (ता. वाडा, जि. पालघर) येथुन सकाळी सहा करण्यात आली. पहिल्या दिवशी सर्वप्रथम दुर्ग कोहोज सर करण्यात आला. त्यानंतर दुर्ग मनोर भटकंती झाली. सर्वात शेवटी कठीण श्रेणीत गणला जाणारा अडसुळगड पादक्रांत करण्यात आला. दुर्ग उतार होऊन खाली पायथ्याशी असणाऱ्या खोडकोना येथे मुक्कामासाठी येण्यासाठी रात्रीचे सुमारे आठ वाजले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता मामाचे गाव येथून पायपीट सुरू करण्यात आली. असावागड सर करून सर्व ऐतिहासिक वास्तूंना भेट दिल्यावर गडउतार होऊन वाघोबा खिंड येथे असणारा आणि टेहाळणीसाठी वापरला जाणारा काळदुर्ग सर करण्यात आला. येथे गिर्यारोहकांनी राजमाता अहिल्यादेवींचा जयजयकार करीत त्यांना वंदन केले. या मोहिमेची उल्लेखनीय बाब म्हणजे माधवी पवार आणि सीमा बुधवंत यांनी आपला वाढदिवस दुर्ग भटकंती करून साजरा केला.

उष्णतेच्या लाटेत गिरीदुर्गांवरील ३५ किलोमीटरची पायपीट, अडसुळ गडावरील सर्वात शेवटी असणारा ३५ फुटी कातळटप्पा अशा सर्व आव्हानांना सामोरे जात टीम पॉइंट ब्रेक ॲडव्हेंचर्सच्या जॉकी साळुंके, लव थोरे, अमृत भावसार, गायत्री फडके, प्रिती फडके, रोहित गायकवाड, रामचंद्र कर्णे, धर्मराज उपासे, गणेश भंडारी, संदीप कदम, बाबासाहेब तावरे, राजेंद्र साळुंके, भरत पिंगळे, सिद्धार्थ देसाई, मंदार मोहिले, सुरेश सावंत आणि डॉ. समीर भिसे यांनी ही मोहिम सुरक्षितपणे फत्ते केली.

## नतमस्तक!

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**राजगुरूनगर :** खेडच्या गिर्यारोहकांनी किल्ले काळदुर्ग सर करून पुण्यश्लोक अहिल्यादेवींना जयंतीदिनी वंदन केले.

POSITIVE NEWS!

## यवत
## ७९९ देशी वृक्षांचे वाटप



यवत, माणकोबावाडी ता. दौंड येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त ७९९ वृक्षांचे महावृक्षदान करताना मान्यवर

# महावृक्षदान कार्यक्रम संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**यवत :** दौंड तालुक्यातील यवत गावच्या हद्दीतील माणकोबावाडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती व नाथदेवराई फाउंडेशन वर्धापन दिनाचे औचित्य साधत नाथदेवराई फाउंडेशन व माणकोबावाडी ग्रामस्थांनी पिंपळ वृक्षाला फाउंडेशनचा अध्यक्ष घोषित करून ७९९ देशी वृक्षांचे वाटप करत महावृक्षदान सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला.

यावेळी आत्माचे तंत्रज्ञान व्यवस्थापक महेश रुपनवर यांच्या हस्ते अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. तसेच नाथदेवराई फाउंडेशन यांनी पिंपळ वृक्षाला अध्यक्ष म्हणून स्थान दिल्याने द इकोफॅक्टरी फाउंडेशनचे प्रतिनिधी शुभम ठोंबरे व यवत ग्रामपंचायत सरपंच समिर दोरगे यांच्या हस्ते वृक्षपूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक फाउंडेशनचे सदस्य राहुल बिचकुले यांनी केले. त्यांनी फाउंडेशनच्या कार्याचा आढावा मांडत भविष्यातील फाउंडेशन वाटचालीविषयी माहिती दिली.

तसेच प्रमुख पाहुणे महेश रूपनवर यांनी उपस्थित ग्रामस्थांना अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याविषयी तसेच झाडांचे महत्व, परसबाग काळाची गरज, वाढते तापमान अशा अनेक विषयांवर मार्गदर्शन केले. कृषी सहाय्यक विनायक जगताप यांनी शेतकऱ्यांना व उपस्थित ग्रामस्थांना शेती योजनांविषयी मार्गदर्शन केले. संस्कृती अभ्यासक श्रीकांत हंडाळ यांनी या कार्यक्रमात अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याविषयी मार्गदर्शन केले. नाथदेवराई फाउंडेशन गेली सहा वर्षे महावृक्षदान सोहळा आयोजित करत आहे. आजवर अनेक वृक्षांचे वृक्षारोपण या फाउंडेशनने केले आहे. या माध्यमातून अनेक झाडे आज डौलाने डोलत आहेत आणि लोकांमध्ये वृक्षप्रेम जागृत होत आहे. यासाठीच या फाउंडेशनने ७९९ देशी वृक्षांचे वाटप केले. यापुढे पिंपळ या वृक्षाला अध्यक्ष घोषित करून सर्व माणकोबावाडी ग्रामस्थ फाउंडेशन सदस्य म्हणुन काम करणार आहेत.

माणकोबावाडीतील ग्रामस्थांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा वृक्ष व गुलाब पुष्प भेट देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ७९९ देशी वृक्षांचे वृक्षवाटप करण्यात आले. यामध्ये वड, पिंपळ, चिंच, आवळा, करंज, भेंडी, कांचन, गुलमोहर, बेहडा, पळस, उंबर, जांभुळ, सिसम, इलायती चिंच, अशा वेगवेगळ्या वृक्षांचा समावेश होता. हे महावृक्ष दान सौजन्य द इकोफॅक्टरी फाउंडेशन पुणे आणि सीमा गुट्टे काँग्रेस महाराष्ट्र यांनी केले. या महावृक्ष दान सोहळ्याचे आयोजन नाथदेवराई फाउंडेशन यांनी केले होते. यावेळी यवत ग्रामपंचायत सरपंच समीर दोरगे, आत्माचे तंत्रज्ञान व्यवस्थापक महेश रूपनवर, कृषी पर्यवेक्षक मनोज मिसाळ, कृषी सहाय्यक विनायक जगताप, कृषी सहाय्यक पंढरीनाथ कुतवळ, यवत ग्रामपंचायत मा. उपसरपंच सदानंद दोरगे, सीमा गुट्टे महाराष्ट्र कॉंग्रेस, संस्कृती अभ्यासक श्रीकांत हंडाळ, सिद्धनाथ तरुण मंडळ अध्यक्ष मारुती बिचकुले, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते धुळा भिसे, ग्रामपंचायत सदस्य मल्हारी बिचकुले, रासप दौंड अध्यक्ष दादासाहेब भिसे, सामाजिक कार्यकर्ते मनोहर खताळ, राजु लकडे, पत्रकार संतोष जगताप, फाउंडेशन सदस्य राहुल बिचकुले, दत्तात्रय पिंगळे, पोपट लकडे, बापू लकडे, विशाल खताळ, अविनाश लकडे यांसह इतर सदस्य माणकोबावाडी ग्रामस्थ उपस्थित होते.

## जमिनीच्या वादातून महिलांकडून एकास जबरी मारहाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर:** टाकळी भीमा येथे शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्याला शिवीगाळ, दमदाटी करत ट्रॅक्टर चालकाला हातपाय तोडण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे काही महिलांसह सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरेश ढमढेरे यांचे शेती असून सदर शेतात सुरेश ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेत नांगरत असताना शेजारील महिला शेतात आल्या. दरम्यान त्या महिलांनी सुरेश ढमढेरे यांसह ट्रॅक्टर चालकाला अडवून शिवीगाळ, दमदाटी करत हातपाय तोडून टाकण्याची धमकी दिली, दाखवला तर तुला बघून घेतो अशी धमकी दिली.

## ड्रोन कॅमेरामुळे तणावाचे वातावरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पारगांव:** दौंड तालुक्यातील पारगांव येथे दि. ३० मध्यरात्री तीन ते चार हेरगिरी करणारे संशयास्पद ड्रोन कॅमेरे नागरिकांना आढळून आल्याने पारगांव परिसरात रात्रभर घबराटीचे वातावरण होते. तसेच पारगांव येथील जागृत युवकाकडुन रात्री फोनद्वारे, व्हाट्सअपद्वारे एकमेकांशी संवाद साधल्याने या ड्रोनविषयी कोणत्या भागात ड्रोन हेरगिरी करत आहे, याची माहिती मिळाली.

पारगाव परिसरात प्रथम रेणुका नगर हर्बल येथे ड्रोन कॅमेरा हेरगिरी करताना आढळून आले. या परिसरात तीन ड्रोन कॅमेरे पाहण्यात आले, तर रात्री रानातील वाड्या वस्तीमध्ये हेरगिरी करणारे ड्रोन अचानक आढळून आल्याने या परिसरातील नागरिकांच्यात घबराट पसरली आहे. सार्थक ताकवणे, यांच्या घराच्या परिसरात चौधरी वस्ती या ठिकाणी ड्रोन कॅमेरे दोन वेळा हेरगिरी करताना आढळून आल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली.

तसेच पारगाव वि. का. सोसायटी, ग्रामपंचायत पारगाव, पारगांव मुख्य चौक, तळवडी, शिंदेवाडी रोडच्या आजूबाजूने हे ड्रोन कॅमेरे जाताना आढळून आले. पारगाव येथील तरुणांनी या ड्रोनचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, परंतु नागरिक सावध झाल्याने ड्रोन कॅमेरे कुठे गायब झाले हे गुढ कायम आहे. हे संशयास्पद भ्रमंती करणारे ड्रोन कॅमेऱ्याची तातडीने चौकशी करावी, अशी नागरिकांनी मागणी केली आहे.

## » Selected



### आनंदग्राम सोसायटीला स्वतंत्र वीजपुरवठा; पदाधिकाऱ्यांची माहिती

**यवत :** दौंड तालुक्यातील यवत येथे सर्वात मोठी असलेल्या आनंदग्राम सहकारी गृहनिर्माण सोसायटीत महावितरणचा वीजपुरवठा सतत खंडीत होत असल्याने येथील रहिवाशांना दिलासा देण्यासाठी स्वतंत्र सोलर प्लॅन्ट बसवून सर्वांना वीजेची सुविधा देणार असल्याची माहिती गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष बशीरभाई शेख आणि सचिव मोहन जाधव यांनी दिली. यवत येथील आनंदग्राम सहकारी गृहनिर्माण सोसायटी जिल्ह्यात मोठी सोसायटी असून येथे ६३० प्लॅट असून यामध्ये ६३० कुटुंबे राहत आहेत. ग्रामीण भागात महावितरण विभागाकडून सतत वीजपुरवठा खंडित होत असल्याने या सोसायटीतील रहिवाशी हैराण झाले आहे. टप्प्याटप्प्याने येथे स्वतंत्र सोलर प्लॅंट बसवून सर्वांना वीजेची सुविधा देण्याचा मानस असल्याचे अध्यक्ष बशीरभाई शेख आणि सचिव मोहन जाधव यांनी सांगितले. तसेच सध्या सोसायटीतील कुटुंबांना बोअरवेलद्वारे पाणीपुरवठा केला जातो. मात्र, या बोअरवेलचे उन्हाळ्याच्या दिवसात पाणी कमी पडत असून कालव्या शेजारी स्वतंत्र विहीर खोदून सोसायटीतील रहिवाशांना मुबलक पाणी उपलब्ध करून देणार असल्याचेदेखील त्यांनी सांगितले. सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण सोसायटीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. जेष्ठ नागरिकांसाठी नाना-नानी पार्कचे सुशोभिकरण करणे, गार्डन उभारणे तसेच सोसायटीला कंपाऊंड करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे भविष्यात या संस्थेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम व गरीब कुटुंबातील तरुण-तरुणींचा मोफत सामुदायिक विवाह सोहळा राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.



### कासारीतील जुन्या तलावाला मिळणार पुनर्जीवन; जैन संघटनेचा पुढाकार

**शिक्रापूर :** भारतीय जैन संघटनेच्यावतीने महाराष्ट्रातील विविध ठिकाणी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार उपक्रम सुरु करण्यात आलेला असून त्या माध्यमातून कासारी येथील जुना तलाव गाळमुक्त होणार असल्याने या तलावाला पुनर्जीवन मिळणार आहे. कासारी येथील तलाव अनेक दिवसांपासून पाण्याने भरत असल्याने त्या तलावात मोठ्या प्रमाणात गाळ निर्माण झाला आहे. या तलावाचे खोलीकरण करणे गरजेचे असल्याने भारतीय जैन संघटनेच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार उपक्रमांतर्गत विद्याधाम प्रशाला शिक्रापूरचे चेअरमन प्रकाश झुंबरलाल यांच्या देणगीतून या तलावाच्या खोलीकरणाच्या कामाला सुरूवात करण्यात आली. या प्रसंगी उद्योजक प्रकाश चोपडा, सामाजिक कार्यकर्त्या सोनिया कुवाड, मयुरी सिंगवी, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष मनोहर परदेशी, ग्रामविकास अधिकारी आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

### बेकायदा दारूची विक्री करणाऱ्या हॉटेलवर पोलिसांचा छापा

**जुन्नर :** गणेश खिंड मार्गावरील एका हॉटेलमध्ये देशी विदेशी दारू बेकायदा बिगर परवाना चोरून विक्री करीत असताना पोलिसांच्या पथकाने या ठिकाणी छापा मारून मोठ्या प्रमाणात देशी-विदेशी दारू ताब्यात घेऊन हॉटेल मालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. नितीन वसंत खंडागळे निसर्ग हॉटेल भुंडेवाडी जुन्नर याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हॉटेल मागील पत्रा शेडमध्ये बेकायदेशीरपणे विना परवाना देशी-विदेशी दारूजवळ बाळगून त्याची चोरून विक्री करीत असताना पोलीस निरीक्षक किरण अवचर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने छापा मारून या ठिकानाहून विविध कंपन्यांची महागडी विदेशी दारू तसेच देशी दारू बाटल्या ताब्यात घेतल्या. पोलीस अंमलदार दिपक वनवे यांनी फिर्याद नोंद केली असून अंमलदार संतोष पवार पुढील तपास करीत आहेत.

## मूळ रचनेचीच पूर्वआवृती केली जाणार: पुरातत्व विभागाचे स्पष्टीकरण

# पूरातन लवथळेश्वर मंदिराचा जीर्णोध्दार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



छाया - विजयुमार हरिश्चंद्रे

**जेजुरी :** अनेक महान साधू संत यांच्या स्पर्शाने पावन झालेल्या जयाद्रीच्या प्राचीन पौराणिक खंडोबा देवाच्या अस्तित्वाची साक्षी असलेल्या लवथळेश्वर मंदीराचा तब्बल पाचशे वर्षानंतर पुन्हा जीर्णोद्धार होत आहे.

पुणे-पंढरपूर महामार्गालगत जेजुरी येथील भूगर्भातील देखण्या पाषाण स्थापत्य कला रचनेतील हे जागृत मंदिर असून खंडोबा अवतार पूर्वीचे प्रयोजन असलेली हे स्थळ असल्याचा पुरातन इतिहास सांगितला जातो. सध्याच्या घडीला या मंदिराची पडझड झाल्यामुळे या मंदिराचा पुन्हा जिर्णोद्धार पुरातत्व विभागद्वारे केला जात आहे. या मंदिराच्या काही पायऱ्या उतरून जमिनीच्या भुगर्भात प्रवेश केल्यानंतर दगडी नंदीसह छोट्या प्रवेशद्वारात प्राचीन शिवलिंग आढळते. पुरातन ग्रंथ आणि इतिहासानुसार याच शिवलिंगासमोर बसून श्री समर्थ रामदास महाराजांनी **"लव लवथी विक्राळा ब्रम्हांडी माळा"** ही शिवमल्हारी मार्तंडाची लोकप्रिय आरती रचली.

पौराणिक कथेनुसार मणी आणि मल्य या महाभयानक दैत्यांनी येथे सप्त ऋषीमुनींना त्रास देऊन त्यांचे जीवन असह्य केले होते, त्यावेळी लवऋषी मुनींच्या संरक्षणाकरिता साक्षात प्रभू शिवशंकराने मार्तंड भैरवाचा अवतार धारूण करून या दैत्यांचा संहार केला होता. त्यानंतर तीर्थक्षेत्र जेजुरी म्हणून ओळखले जाऊ लागले. काही वर्षापूर्वी पावसाचे पाणी तटबंदित शिरून दगडी सभामंडप याची हानी होऊ लागली होती. मात्र, मंदिर लगतची पूर्व पुष्करणी जलकुंड पूर्ण उद्वस्त झाले असून, त्याच्या मूळदगडी रचनेत त्यांची पुनर्रचना केली जावी अशी मागणी स्थानिक खंडोबा भक्त करीत आहेत. रचनेला आणि बांधकामाला मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नसल्याचे मंदिर उपासक संदीप झगडे, संतोष बायास आणि खंडोबा देवाच्या गुरव पुजाऱ्याने चिंता व्यक्त करीत संगितले आहे.

### जीर्णोध्दारामुळे भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण

- पावसाळ्यापर्यंत मंदिराचे काम पूर्ण केले गेले नाही, तर आजबाजूच्या परिसरातील पाणी मंदिरात जाऊन तसेच लगतच्या महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांच्या सततच्या हादऱ्याने संपूर्ण मंदिराला धोका निर्माण होऊ शकतो, या संदर्भात पुरातत्व विभागाचे सहाय्यक अधिकार विलास वहाने यांना निवेदन देण्यात आले आहे. लवथळेश्वर मंदिराच्या होत असलेल्या पुन्हा जीर्णोद्धारमुळे भाविकांनी आनंद व्यक्त केला आहे.

#रा

एका बाजुला उष्णतेची लाट, दुसऱ्या बाजूला जलसंकट

# पाणीटंचाईचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** सध्या देशासह राज्यात उष्णतेचा पारा चांगलाच वाढला आहे. अनेक ठिकाणी तापमानाचा पारा हा ४५ अंशावर गेलाय. तर देशाची राजधानी दिल्लीत परवा ५२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झालीय. त्यामुळं या काळात नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी असं आवाहन करण्यात आलंय. दरम्यान, दिल्लीत एका बाजुला उष्णतेची लाट आहे तर दुसऱ्या बाजूला जलसंकट आहे. त्यामुळं आता दिल्लीतील पाणीटंचाईचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात गेला आहे.

दिल्लीत सध्या भीषण पाणीटंचाई जाणवत आहे. पाणी टंचाईचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात गेला आहे. दिल्ली सरकारच्या वतीने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. हरियाणा, उत्तर प्रदेश आणि हिमाचल प्रदेश या राज्यांनी एक महिना अतिरिक्त पाणी द्यावं या मागणीची याचिका दाखल केली आहे. उष्णतेची लाट असतानाच दिल्लीत पाणीटंचाई आहे. दिल्लीची गरज पूर्ण करणे ही सर्वंकष जबाबदारी असल्याचा उल्लेख याचिकेत दिल्ली सरकारकडून करण्यात आला आहे.

यावर्षी देशातील बहुतांश ठिकाणी पाणीटंचाई झाली आहे. महाराष्ट्रातही सध्या पाणीटंचाई भासत असल्याचं चित्र दिसत आहे. राज्याला पाणीपुरवठा करणाऱ्या मोठ्या प्रकल्पांतील पाणीसाठा झपाट्याने खालावत आहे. आजमितीला या मोठ्या प्रकल्पांमध्ये केवळ १९.९८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मागील वर्षी याच दिवशी हा पाणीसाठा २९.०७ टक्क्यांवर होता. लघु प्रकल्पांत २६.११ टक्के पाणीसाठा शिल्लक असून गेल्यावर्षी हा पाणीसाठा ३३.५५ टक्के इतका होता. छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक विभागात पाण्याची मोठ्या प्रमाणावर कमतरता आहे. ज्या गावांमध्ये पाणीपुरवठा केला जात आहे तो केवळ पिण्यासाठी आहे, त्यामुळे जनावरांचे मोठे हाल होत आहेत.

वाढत्या उष्णतेच्या लाटेमुळं अनेक ठिकाणी पाण्याचा प्रश्न निर्माण झालाय. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिक पायपीट करताना दिसत आहे. तसेच नागरिकांबरोबर जनावरांच्या पाण्याच्या प्रश्न देखील निर्माण झाला आहे. ठिकठिकाणी टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफी रा

## मी कुठेही असो, आत किंवा बाहेर असो, काम थांबणार नाही !

**मुंबई :** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल २ जून रोजी आत्मसमर्पण करणार आहेत. त्यापूर्वी त्यांनी एक व्हिडीओ जारी करून जनतेशी संवाद साधला आहे. "मी कुठे असीन, आत किंवा बाहेर, दिल्लीचं काम थांबणार नाही.", असं व्हिडीओमध्ये बोलताना अरविंद केजरीवाल म्हणाले आहेत. तसेच, हुकूमशाहीपासून देशाला वाचवण्यासाठी जेलमध्ये जातोय, असंही केजरीवाल यावेळी म्हणाले आहेत. दिल्लीचे मुख्यमंत्र अरविंद केजरीवाल पुढे बोलताना म्हणाले की, "मला सर्वोच्च न्यायालयात प्रचारासाठी २१ दिवसांची परवानगी देण्यात आली होती. उद्या २१ दिवस पूर्ण होत आहेत. मला परवा आत्मसमर्पण करावं लागेल. मी परवा तुरुंगात जाईन. या वेळी हे लोक मला किती दिवस तुरुंगात ठेवतील माहीत नाही, पण माझी एक गोष्ट ऐका की, देशाला हुकूमशाहीपासून वाचवण्यासाठी मी तुरुंगात जाणार आहे. "त्यांनी मला अनेकदा तोडण्याचा प्रयत्न केला, मला झुकवण्याचा प्रयत्न केला. पण मी झुकलो झालो नाही. मी तुरुंगात असतानाही त्यांनी माझा अनेक प्रकारे छळ केला. त्यांनी माझी औषधं बंद केली. मी ३० वर्षांपासून गंभीर मधुमेहाचा रुग्ण आहे. मी दिवसातून चार वेळा इन्सुलिन इंजेक्शन घेतो. त्यांनी माझं इंजेक्शन बरेच दिवस बंद केलं. त्यामुळे शुगरमुळे गंभीर आजार होण्याचा धोका बळावला आहे, पण तरिसुद्धा मी लढणार आहे.", असं अरविंद केजरीवाल म्हणाले आहेत. दिल्लीचे मुख्यमंत्री बोलताना म्हणाले की, "मी ५० दिवस तुरुंगात राहिलो आणि या ५० दिवसांमध्ये माझं वजन ६ किलोनं कमी झालं. मी तुरुंगात गेलो, तेव्हा माझं वजन ७० किलो होतं. आज ६४ किलो आहे. तुरुंगातून सुटल्यानंतरही माझं वजन वाढत नाही. शरीरात काही मोठा आजार होऊ शकतो, अनेक तपासण्या कराव्या लागतील, असं डॉक्टर सांगत आहेत. माझ्या लघवीत केटोनची पातळीही खूप वाढली आहे. शरण येण्यासाठी मी दुपारी ३ वाजता माझ्या घरातून बाहेर पडेन. कदाचित यावेळी ते माझ्यावर आणखी अत्याचार करतील. पण मी झुकणार नाही."स्वत:ची काळजी घ्या. तुरुंगात मला तुमची खूप काळजी लागून राहाते. तुम्ही खुश असाल तर तुमचे केजरीवालही खुश राहतील. अर्थात मी तुमच्यामध्ये नसेन, पण काळजी करू नका. तुमची सर्व कामं चालू ठेवतील. मी कुठेही असो, आत असो की बाहेर, दिल्लीचं काम थांबणार नाही. तुमची मोफत वीज, मोहल्ला क्लिनिक, हॉस्पिटल, मोफत औषधे , उपचार, महिलांसाठी मोफत बस, प्रवास, २४ तास वीज आणि इतर सर्व कामं सुरूच राहतील.", असे अरविंद केजरीवाल म्हणाले आहेत.

» Selected

## तलावात बुडून तिघांचा मृत्यू

**नागपूर** : राज्यात गेल्या काही दिवसांपासून विविध भागात बुडून मृत्यू झाल्याच्या घटना वारंवार उघडकीस येत आहे. काही दिवसांपूर्वीच अहमदनगरमध्ये बुडलेल्या तरुणांचा शोध घेण्यासाठी निघालेली एसडीआरएफच्या जवानांची बोट उलटून मोठी दुर्घटना घडली होती. यामध्ये सहा जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर वेंगुर्ले बंदरातही बोल उलटून चार जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले होते. अशा घटना ज्वलंत असतानाच नागपुरमध्येही अशीच धक्कादायक घटना घडल्याचे समोर आले आहे. नागपुरमधील उमरेड तालुक्यतील कुही पोलीस स्टेशन अंतर्गत मटकाझरी तलावात बुडून तिघांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यामध्ये एक लहान मुलगा आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. या दुर्दैवी घटनेने मृतांच्या कुटुंबियांना धक्का बसला असून परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## तीन अल्पवयीनांनी काढला मित्राचा काटा

**नाशिक** : नाशिक शहरात दिवसेंदिवस गुन्हेगारीत वाढ होत चालली आहे. आता शहरातील पंचवटी परिसरात किरकोळ कारणावरून एका १७ वर्षीय युवकाची हत्या करण्यात आली आहे. एका मित्राच्या वाढदिवसाच्या दिवशी केक भरवण्याच्या कारणावरून वाद झाला होता. याच वादातून युवकाची हत्या झाल्याची माहिती पोलिसांकडून मिळत आहे. याप्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तीन संशयितांना ताब्यात घेतले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, पंचवटीतील पेठरोड कर्नल नगर येथील १७ वर्षीय युवकाची हत्या करण्यात आली आहे. दोन दिवसांपूर्वीच मित्राच्या वाढदिवशी एकमेकांना केक भरवण्याच्या किरकोळ कारणावरून मित्रांमध्ये वाद झाला होता. हाच राग मनात ठेवून तीन अल्पवयीन मित्रांनी धारदार हत्याराने युवकाची हत्या केली.

## 'काळी जादू'; उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांचा आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बंगळरू :** कर्नाटकमधील काँग्रेस सरकार उलथवून लावण्यासाठी राजकीय विरोधकांनी मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि माझ्याविरोधात काळ्या जादूचा प्रयोग करत शत्रू भैरवी यज्ञ केला असल्याचा आरोप उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी केला. माध्यमांशी बोलत असताना शिवकुमार म्हणाले की, मी माझ्या मनगटावर पवित्र धागा बांधला आहे, वाईट नजरांपासून वाचण्यासाठीच हे कवच मी बांधले आहे.

तसेच केरळच्या तांत्रिकांच्या मदतीने राजा राजेश्वरी मंदिराच्या नजीक एका निर्जन स्थळी काळ्या जादूचे विधी पार पाडले जात आहेत. या विधीमध्ये पशूंचाही बळी दिला गेला, असा दावा त्यांनी केला.

# अमेरिकेत मिळणाऱ्या सुविधांवर टीम इंडिया नाखूश; ICC कडे केली तक्रार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाने २०२४ मध्ये अमेरिकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकाची तयारी सुरू केली आहे. २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम फेरीत ऑस्ट्रेलियाकडून पराभूत झाल्यानंतर रोहित शर्मा आणि त्याच्या संघाला विजेतेपद मिळवण्याची मोठी संधी आहे. टीम इंडियाने अखेरचा टी-२० विश्वचषक २००७ मध्ये जिंकला होता. २०१३ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यानंतर भारतीय क्रिकेट संघाला एकही आयसीसी स्पर्धा जिंकता आलेली नाही. त्यामुळे आता भारतीय संघाला टी-२० वर्ल्ड कपमध्ये ११ वर्षांचा दुष्काळ संपवून पुन्हा आयसीसी ट्रॉफी जिंकण्याची संधी आहे.




**अमेरिकेत मिळणाऱ्या सुविधांवर टीम इंडिया नाखूश?**

भारतीय संघ टी-२० विश्वचषकासाठी अमेरिकेला पोहोचला असून खेळाडूंनी सरावला सुरूवात केली आहे. इतकेच नव्हे तर आणि संघाने खेळाडूंनीही याचे फोटो व्हीडिओही शेअर केले. पण एका रिपोर्टनुसार आता यजमान देश अमेरिकेत सरावासाठी ज्या सुविधा दिल्या जात आहेत यावर भारतीय क्रिकेट संघ खूश नसल्याचे समोर आले आहे. रिपोर्टनुसार, टीम इंडियाला सरावासाठी ज्या प्रकारची खेळपट्टी आणि इतर सुविधा दिल्या जात आहेत, त्या नीट नसल्याचे म्हटले जात आहे. टीम इंडियाने याबाबत चिंता व्यक्त केली आहे.

टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड हे टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या तयारीसाठी कॅन्टियाग पार्कमध्ये देण्यात आलेल्या सुविधांबाबत इतके नाराज आहेत की त्यांनी याबाबत आयसीसीकडेही धाव घेतली आहे. मात्र, 'कँटियाग पार्कमधील सराव सुविधांबाबत कोणत्याही संघाकडून कोणतीही तक्रार किंवा चिंता व्यक्त करण्यात आलेली नाही,' असे आयसीसीचे म्हणणे आहे. दोन महिने सतत रात्रीच्या वेळेत क्रिकेट खेळल्यानंतर भारतीय क्रिकेट संघाने सकाळच्या सराव सत्रांसह टी-२० विश्वचषकाची तयारी सुरू केली.

# गर्लफ्रेंडचे चोचले पूर्ण करण्यासाठी तब्बल ६२ घरफोड्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वर्धा :** वर्ध्यात शहर आणि सावंगी हद्दीतील गेल्या काही दिवसात चार घरफोडी घटना समोर आल्या होत्या. तपासादरम्यान प्रशांत काशीनाथ करोशी याला ताब्यात घेण्यात आले असून चौकशीदरम्यान अनेक धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. देशभरातल्या विविध राज्यात त्याने आत्तापर्यंत ६२ घरफोडी केल्याचं पुढे आलं आहे. आरोपीवर चोरी, फसवणूक, घरफोडीचा प्रयत्न आदी ९३ गुन्हे वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आले आहेत. आरोपीकडून ७ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल वर्धा पोलिसांनी जप्त केला आहे.

**देशातल्या १० ते १२ राज्यात केली घरफोडी :** आरोपी प्रशांत काशीनाथ करोशी याने देशातल्या बेंगलोर,कर्नाटका,चैन्नई, तामिळनाडु, हैदराबाद, तेलंगणा व इतर राज्यात घरफोड्या केल्याचं तपासात पुढे आलं आहे. आरोपीने या प्रकरणात प्रेमिकेची हौस पूर्ण करण्याकरिता घरफोडी करायचो असा दावा पोलिसांसमोर केला आहे.

**प्रेमिकेची हौस पुर्ण करण्यासाठी घरफोडी :** प्रेमिकेची हौस पूर्ण व्हावी यासाठी त्याने घरफोडी करण्यास सुरुवात केली. ६२ घरफोड्या करून येणाऱ्या पैशातून गोवा तसेच इतर पिकनिक पॉईन्टला जावून मौजमस्ती केल्याचं पोलीस तपासात उघड झाले आहे.

**युट्यूबवर घेतले चोरीचे प्रशिक्षण :** वर्ध्यात पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीने घरफोडी करण्याचे प्रशिक्षण युट्युबवरच्या माध्यमातून घेतले असून त्याचे पुढचे टार्गेट बँकेचे लॉकर असल्याचे तपासात पुढे आले आहे. हैद्राबाद येथे जावून चोरीचा त्याचा प्लॅन होता. मात्र वर्धा पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

**घरफोडी करण्याकरिता चोरायचा मोटर सायकल :** आरोपीला ज्या शहरात घरफोडी करायची आहे. त्या शहरात जाऊन सर्वात आधी मोटर सायकल चोरी करून शहरात रात्रीच्या दरम्यान रेकी करायचा. आरोपीने वेगवेगळ्या शहरातून एकुण १३ मोटर सायकल चोरी केल्याचं उघड झाले आहे.

ब्रिटनहून परत आणलं तब्बल ६,२७,९०,४५,००,००० किंमतीचे सोने

# आरबीआय ला मोठे यश! महाराष्ट्रात ठेवणार हा राष्ट्रीय खजिना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** रिझर्व बँक ऑफ इंडिया (RBI) ने ब्रिटनमधून १०० टनाहून अधिक सोनं परत आणलं आहे आणि ते आपल्या राखीव निधीमध्ये हस्तांतरित केलं आहे. बिझनेस टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, आगामी महिन्यात पुन्हा एकदा इतक्याच प्रमाणातील सोनं देशात आणलं जाऊ शकतं. १९९१ मध्ये गहाण ठेवण्यात आलेलं हे सोनं पहिल्यांदाच आरबीआयच्या निधीत सामील करण्यात आलं आहे.

रिझर्व बँक ऑफ इंडियाने अर्ध्यापेक्षा अधिक सोनं बँक ऑफ इंग्लंड आणि बँक ऑफ इंटरनॅशनल सेटलमेंटकडे सुरक्षित ठेवलं आहे.



यापैकी सुमारे एक तृतीयांश साठा देशांतर्गत ठेवण्यात आला आहे. ब्रिटनमधून सोनं भारतात आणल्याने भारतीय रिझर्व बँकेला स्टोरेज कॉस्ट वाचविण्यात मदत होईल, जी बँक ऑफ इंडियाला दिली जाते.

**१९९१ मध्ये गहाण ठेवण्यात आलं होतं सोनं :** RBI कडून जारी करण्यात आलेल्या वार्षिक आकडेवारीनुसार, ३१ मार्च २०२४ पर्यंत केंद्र सरकारकडे विदेशी चलन राखीव निधीच्या रुपात ८२२.१० टन सोने होतं, जे मागील वर्षी याच काळात ७९४.६३ टनपेक्षा अधिक होते. १९९१ मध्ये, चंद्रशेखर सरकारने पेमेंट बॅलन्सच्या संकटाचा सामना करण्यासाठी सोनं गहाण ठेवलं होते. ४ ते १८ जुलै १९९१ दरम्यान, RBI ने ४०० मिलियन डॉलर्स उभारण्यासाठी बँक ऑफ इंग्लंड आणि बँक ऑफ जपान यांच्याकडे ४६.९१ टन सोनं गहाण ठेवलं होतं.

**RBI कडून मोठ्या प्रमाणात सोन्याची खरेदी :** आरबीआयने जवळपास १५ वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीक़डून (IMF) २०० टन सोनं खरेदी केलं होते. २००९ मध्ये युपीए सरकारच्या कार्यकाळात जेव्हा मनमोहन सिंग पंतप्रधान होते तेव्हा भारताने आपल्या मालमत्तेत विविधता आणण्यासाठी ६.७ अब्ज डॉलर्स किमतीचं २०० टन सोनं खरेदी केलं होतं. गेल्या काही वर्षांपासून आरबीआयकडून खरेदी करण्यात आलेल्या स्टॉकमध्ये वाढ झाली आहे.

महागाई दर आणि परकीय चलन जोखमींविरूद्ध बचाव म्हणून परकीय चलन मालमत्तेचा आधार वैविध्यपूर्ण करणं हा सोनं खरेदी करण्याचा आरबीयचा मुख्य उद्देश आहे. आरबीआयने डिसेंबर २०१७ पासून बाजारातून नियमितपणे सोनं गोळा करण्यास सुरुवात केली आहे.

## नुकसान

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



उत्तर गाझा पट्टीत इस्त्रायली सैन्याने जबलिया निर्वासित छावणीच्या एका भागातून माघार घेतल्यावर झालेल्या नुकसानीची पाहणी करताना पॅलेस्टिनींनी आपला मार्ग काढला.

# जितेंद्र आव्हाडांनी 'मनुस्मृती' जाळली, पण 'ठिणग्या' पडल्या दादा गटात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शरद पवार राष्ट्रवादी गटाचे नेते विरोधी पक्षनेते जितेंद्र आव्हाड यांनी मनुस्मृती दहन करण्याच्या आंदोलनामध्ये अनावधानाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा असलेले पोस्टर फाडल्यानंतर वाद निर्माण झाला आहे. हा मुद्दा भाजपने राज्यपातळीवर नेल्यानंतर आता त्यांच्यावर टीका होत आहे. असे असतानाच आता अजित पवार गटामध्ये सुद्धा वादाच्या ठिणग्या पडल्या आहेत. अजित पवार गटातील ज्येष्ठ नेते आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ छगन भुजबळ यांनी आव्हाडांची पाठराखण केल्याने भडकले आहेत. त्यांनी पाठिंबा देण्याचा निर्णय दुर्दैवी असल्याचे



मुश्रीफ यांनी म्हटले आहे.

**पाठिंबा देण्याचे वक्तव्य केले, ते अतिशय दुर्दैवी**

जितेंद्र आव्हाड पोस्टर वादावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, आव्हाड यांनी म्हणून मनुस्मृती पोस्टरवर आंबेडकरांची प्रतिमा असलेल्या पोस्टर फाडणं हे निंदनीय तर आहेच. मात्र, आमचे नेते छगन भुजबळ यांनी मनुस्मृतीचा मुद्दा बाजूला पडेल म्हणून पाठिंबा देण्याचे वक्तव्य केले, ते अतिशय दुर्दैवी आहे. त्यांना या संदर्भात खडे बोल सुनावले पाहिजे होते. ती कृती अत्यंत चुकीची आहे, याबाबत आपण बोललं पाहिजे होतं, असं मुश्रीफ यांनी म्हटले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ हे गेल्या काही दिवसांपासून नाराज असल्याची चर्चा होत असतानाच मनुस्मृतीवरून अजित पवार गटामध्ये वादाच्या ठिणग्या पडल्या आहेत.दरम्यान, भुजबळ यांच्या राज्यसभेची चर्चा सुरू झाली आहे. या संदर्भात बोलताना मुश्रीफ म्हणाले की, छगन भुजबळ यांना राज्यसभेत पाठवण्यासंदर्भात मला कोणतीही माहिती नाही. या संदर्भात आमचे नेते अजितदादा पवार सांगू शकतील, असे म्हणाले.

कारवाईचा बडगा - राज्य उत्पादन शुल्क विभागाची दंडात्मक कारवाई

# राज्यात ९६ बार आणि रेस्टॉरंटवर कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे पॉर्शे प्रकरणानंतर राज्यभरात राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी कारवाई केली आहे. पुणे, मुंबई आणि ठाण्यात कारवाईंचे प्रमाण सर्वाधिक आहे. राज्यात ९६ बार अँण्ड रेस्टॅरंट, परमिट रूमवर निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे. तर किरकोळ नियमांचे उल्लघंन करणाऱ्या ५६ बारवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने दंडात्मक कारवाई केली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पुण्यात १० दिवसात २४३ व्यवस्थापनाची तपासणी करण्यात आली असून ६० बार अँण्ड रेस्टोरंट, परमिट रूम बंद करण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. तर मुंबई व ठाण्यात एकूण ३४ बार व इतर व्यवस्थापनवर कारवाई केल्याची सूत्रांची माहिती दिली आहे.

### अल्पवयीन मुलं व्यसनाच्या आहारी जातायेत का?

● पोर्शे कार अपघातानंतर पिंपरी चिंचवड पोलीस खडबडून जागी झालीये, ती ॲक्टिव्ह मोड मध्ये आलीये. त्यांच्याकडून रात्री कारवाई सुरु आहे. पोर्शे कार अपघातानंतर



अल्पवयीन मुलं व्यसनाच्या आहारी जातायेत का? हा मुद्दा ऐरणीवर आला. त्यासोबतच पोलीस हे रोखण्यासाठी काही पावलं उचलत आहेत का? असा प्रश्न ही विचारला जाऊ लागला. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड पोलिसांनी रात्री अशी गस्त सुरू केलीये. या गस्ती दरम्यान पोलीस पब, हुक्का पार्लरमध्ये धाडी टाकतायेत. तिथं अल्पवयीन मुलांना प्रवेश दिला जातोय का? याची छाननी करतीये. त्यासोबतच जिथं लहान-लहान मुलांचे अड्डे असतात, यावर ही करडी नजर ठेवत आहे.

● कारवाईत सातत्य राहणार का?पिंपरी चिंचवड पोलिसांच्या या मोहिमेने व्यसनाच्या आहारी जाणाऱ्या अल्पवयीन मुलांना नक्कीच आळा बसेल. मात्र या कारवाईत सातत्य राहणार का? हा खरा प्रश्न आहे.

नियमांचं उल्लघंन करणाऱ्या पब आणि बार रेस्टॉरंट भोवतीचा फास राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून आवळला जाणार आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मंत्री शंभूराज देसाईंनी घेतलेल्या उच्चस्तरीय बैठकीत पुण्यासारखा प्रकार रोखण्यासाठी महत्वपूर्ण निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांनी दिलीय. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि CCTV च्या मदतीने राज्य उत्पादन विभागांचे अधिकारी कार्यालयातून परिसरातील बार व रेस्टॉरंटमध्ये होणारे अवैध धंदे, नियमांचे होणारे उल्लंघन यावर नजर ठेवणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

पोर्शे कार अपघातानंतर अल्पवयीन मुलं व्यसनाच्या आहारी जातायेत का? हा प्रश्न ऐरणीवर आल्यानंतर पिंपरी चिंचवड पोलिसांनी ॲक्टिव्ह मोड मध्ये आली आहे. शहरातील रस्ते अन् गल्ली-बोळातून ते दुचाकीवर रात्र गस्त घालतायेत. या दरम्यान येणारे पब, हुक्का पार्लर आणि बारमध्ये अल्पवयीन मुलांना प्रवेश दिला जातोय का? अल्पवयीन मुलं कुठं गैरकृत्य करतायेत का? यावर आता पोलीस करडी नजर ठेवत आहेत.

#रा



'एखाद्या कोचचं खेळाडूच्या आयुष्यात खूप मोठं महत्व असतं. त्याचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव करून घेण्यानं एखाद्याचं मैदानावरील अन् मैदानाबाहेरील आयुष्य आणि भविष्य घडतं. त्यामुळं कोच आणि संस्थेची योग्य निवड करणं खूप गरजेचं असतं.'
— सौरव गांगुली

'हे खूपच सुंदर दिसत आहे. काहीसे खुल्या मैदानासारखे आहे. जेव्हा आम्ही इथे येऊ आणि पहिला सामना खेळू, तेव्हा असणाऱ्या वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी मी उत्सुक आहे.'
— रोहित शर्मा , कर्णधार



### शारदा स्पोर्ट्स सेंटर आयोजित पहिली जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धा

# सई कुलकर्णी व पलक जेसवानी उपांत्य फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क






**पुणे :** शारदा स्पोर्ट्स सेंटरतर्फे आयोजित केलेल्या शारदा ग्रुप व डेक्कन डाईज अँड केमिकल्स पुरस्कृत पहिल्या जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धेतील मुलांच्या पंधरा वर्षाखालील गटात अग्रमानांकित शौरेन सोमण याच्याबरोबरच निषाद लेले, नील नवरे व श्रेयस माणकेश्वर यांनी उपांत्य फेरीत स्थान मिळविले. मुलींच्या पंधरा वर्षाखालील गटात अग्रमानांकित सई कुलकर्णी व तृतीय मानांकित पलक जेसवानी यांनी उपांत्य फेरीकडे आगेकूच केली

ही स्पर्धा शारदा स्पोर्ट्स सेंटर येथे पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने सुरू आहे. सोमण याने एकतर्फी लढतीत अनंत कर्मपुरी याचे आव्हान ११-५,११-५, ११-६ असे संपुष्टात आणले त्यावेळी त्याने टॉप स्पिन फटक्यांचा सुरेख खेळ केला. सहाव्या मानांकित लेले याने तृतीय मानांकित आदित्य सामंत याच्यावर ११-४,११-६,११-७ असा अनपेक्षित विजय नोंदविला. त्याने काउंटर अटॅक पद्धतीचा बहारदार खेळ केला. चौथ्या मानांकित नील नवरे याने स्वरूप भडाळकर याला ११-५,११-३,११-८ असे पराभूत करताना अष्टपैलू खेळाचा प्रत्यय घडविला. या सामन्यांच्या तुलनेत माणकेश्वर या द्वितीय मानांकित खेळाडूला दहाव्या मानांकित मोहील ठाकूर याच्याकडून चिवट लढत मिळाली. हा सामना माणकेश्वर याने ११-३,७-११,१०-१२,११-२,११-९ असा जिंकताना आक्रमक खेळाचा कल्पकतेने उपयोग केला. मोहील याने या स्पर्धेतील तेरा वर्षाखालील गटात विजेतेपद मिळविले होते.

दुहेरीमध्ये शौरेन सोमण याने श्रेयस माणकेश्वर याच्या साथीत विजेतेपद पटकाविले. या जोडीने अंतिम सामन्यात आयुष पाटील व अद्वय हुद्दार यांचा ११-६,११-६,११-९ असा पराभव केला.

मुलींच्या पंधरा वर्षाखालील गटात सई कुलकर्णी हिने दिया शिंदे हिच्याविरुद्ध ११-५,११-९,११-६ असा विजय मिळवताना अष्टपैलू खेळ केला. दिया हिने याआधी या स्पर्धेतील तेरा वर्षाखालील गटाचे विजेतेपद मिळविले होते. तृतीय मानांकित खेळाडू पलक जेसवानी हिने श्रेया कोठारी हिचा ११-४,११-५,११-५ असा दणदणीत पराभव केला त्यावेळी तिने काउंटर अटॅक पद्धतीचा सुरेख खेळ केला. आद्या गवात्रे या चौथ्या मानांकित खेळाडूने सुरुवातीपासूनच सामन्यावर वर्चस्व गाजवीत शरण्या प्रधान हिचा ११-२,११-२,११-४ असा धुव्वा उडविला आणि उपांत्य फेरी गाठली. उपांत्यपूर्व फेरीच्या अन्य लढतीत द्वितीय मानांकित तनया अभ्यंकर हिने श्रेया गायकवाड हिला ११-८,११-७,११-७ असे हरवित आव्हान राखले. तिने चॉप्सचा सुरेख खेळ केला.




## फ्रेंड्स क्रिकेट, वेदिक फिट क्रिकेट अकादमी संघ विजयी

**पुणे :** बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी करंडक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत फ्रेंड्स क्रिकेट अकादमी, वेदिक फिट क्रिकेट अकादमी या संघांनी आपली विजयी मालिका कायम ठेवत दुसरा विजय मिळवला. चिखली येथील सिल्व्हर स्पोर्टस क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्या सामन्यात समीर मानके (३८ धावा व २-२६) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर फ्रेंड्स क्रिकेट अकादमी संघाने बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी ड संघाचा १५ धावांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात नील परदेशी (२-२६) याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर वेदिक फिट क्रिकेट अकादमी संघाने .बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी ब संघाचा ६० धावांनी पराभव करून आपली विजयी घोडदौड कायम राखली.

**निकाल: साखळी फेरी:**

- फ्रेंड्स क्रिकेट अकादमी: ३० षटकात ६ बाद २०० धावा(संस्कार शेलार ४४ (३४,४×४), समीर मानके ३८ (४७,४×४), आर्यन भोर ३७(४६,५×४), राज बेदारी १५, सक्षम मेड २-१५, विवान शर्मा २-३४) वि.वि. बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी ड: ३० षटकात ९ बाद १८५ धावा(श्लोक पांडे ४२ (५५,४×४), विवान शर्मा नाबाद ४२ (४६,६×४), आदिश ढोरे १६, आर्यन मांजरे ३-२१, समीर मानके २-२६, आर्यन भोर १-२४); सामनावीर - समीर मानके; फ्रेंड्स क्रिकेट अकादमी संघ 15 धावांनी विजयी;
- वेदिक फिट क्रिकेट अकादमी: ३० षटकात ७ बाद २०६ धावा(आयुश पटवारी ४६ (४५,८×४), व्योम गुप्ता ३८ (५७,४×४), विराज मोळे नाबाद ३७ (२५,६×४,१×६), अभिमन्यू सिंग २-१७, यश हाजे १-१९) वि.वि.बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी ब: २८.१ षटकात सर्वबाद १४६ धावा(नील बढे २५, आध्रीत परब १७, राजवीर जुनावणे १४, सर्वेश हडगे २-१५, नील परदेशी २-२६); सामनावीर - नील परदेशी; वेदिक फिट क्रिकेट अकादमी संघ ६० धावांनी विजयी.

## ट्रीसा-गायत्रीचा दिग्गजांना धक्का; सिंधू, प्रणोयचा पराभव

**सिंगापूर :** ट्रीसा- गायत्री या भारताच्या महिला जोडीने गुरुवारी सिंगापूर ओपन बॅडमिंटन स्पर्धेत सनसनाटी विजयाची नोंद केली. ट्रीसा-गायत्री जोडीने महिला दुहेरी विभागातील लढतीत बेक हा ना- ली सो ही या जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या दक्षिण कोरियन जोडीला पराभवाचा धक्का देत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. दुहेरीत भारताला यश मिळाले असले तरी एकेरीत निराशेला सामोरे जावे लागले आहे. पी. व्ही. सिंधू हिचे महिला एकेरीतील, तर एच. एस. प्रणोय याचे पुरुष एकेरीतील आव्हान संपुष्टात आले. ट्रीसा जॉली - गायत्री गोपीचंद ही भारतीय जोडी जागतिक क्रमवारीत ३०व्या स्थानावर आहे. याआधी दक्षिण कोरियन जोडीकडून दोन वेळा भारतीय जोडीला पराभवाचा सामना करावा लागला होता. ट्रीसा - गायत्री जोडीला त्यांच्याविरुद्ध हा पहिलाच विजय ठरला. बेक हा ना - ली सो ही या जोडीकडून पहिल्या गेममध्ये चुका झाल्या. याचा फायदा भारतीय जोडीने घेतला. १८-९ अशी आघाडी घेत पहिला गेम २१-९ असे जिंकण्यात त्यांना यश मिळाले.

# चॅम्प्स करंडक १३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत महेश बाल भवन संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत अनय वाघ(नाबाद ५३ धावा व २-१३) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर महेश बाल भवन संघाने मोरया क्रिकेट अकादमी संघाचा ६९ धावांनी पराभव करत विजेतेपद संपादन केले.

धायरी येथील सहारा क्रिकेट मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत प्रथम फलंदाजी करताना महेश बाल भवन संघाने २५ षटकात ७ बाद १७५ धावा केल्या. यात अनय वाघ नाबाद ५३, वेदांत कुदळे २५, मिरव शहा १९, निहाद फाटक १३ यांनी धावा केल्या.

याच्या उत्तरात मोरया क्रिकेट अकादमी संघाला २५ षटकात ६ बाद १०६ धावाच करता आल्या. यात सुजल खोत ५६ अर्णव नेमाडे ११ यांनी दिलेली लढत अपुरी ठरली. महेश बाल भवन संघाकडून अनय वाघ (२-१३), मिरव शहा(१-६)यांनी सुरेख गोलंदाजी करत संघाला ६९ धावांनी विजय मिळवून दिला. स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण एमबीबी संघाचे प्रशिक्षक योगेश कदम, मोरया क्रिकेट संघाचे प्रशिक्षक प्रशांत खराडे, अमरसिंह निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पंच दत्ता गिरी, अनिकेत सरोज आणि स्पर्धा संचालक गोविंद पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

**निकाल: अंतिम फेरी:**

- महेश बाल भवन: २५ षटकात ७ बाद १७५ धावा(अनय वाघ नाबाद ५३ (३९,६×४), वेदांत कुदळे २५, मिरव शहा १९, निहाद फाटक १३, समर्थ खोत ३-२४, सुजल खोत १-३२) वि.वि.मोरया क्रिकेट अकादमी: २५ षटकात ६ बाद १०६ धावा(सुजल खोत ५६ (६०,८×४), अर्णव नेमाडे 11, अनय वाघ २-१३, मिरव शहा १-६ ); सामनावीर - अनय वाघ; महेश बाल भवन संघ ६९ धावांनी विजयी.

## रैनाने शाहिद आफ्रिदीच्या सांगण्यावरून ट्वीट केलं डिलीट?

**नवी दिल्ली :** पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदीने भारताच्या सुरेश रैनाने त्याच्याबाबत केलेल्या ट्वीटबाबत अखेर भाष्य केले आहे. काही दिवसांपूर्वी रैनाने पाकिस्तानी पत्रकाराला उत्तर देताना एक ट्वीट केले होते, जे नंतर त्याने डिलीट केले होते. झाले असे की जूनमध्ये होणाऱ्या टी20 वर्ल्ड कप स्पर्धेसाठी आयसीसीने युवराज सिंग, ख्रिस गेल, उसेन बोल्ट यांच्यासह शाहिद आफ्रिदीला ब्रँड अँबेसिडर म्हणून घोषित केले आहे. याबाबत काही दिवसांपूर्वी पाकिस्तानी पत्रकाराने सुरेश रैनाला ट्रोल करण्याचा प्रयत्न केला होता. पाकिस्तानी पत्रकाराने ट्वीट केले होते की 'आयसीसीने शाहिद आफ्रिदीला आयसीसी टी20 वर्ल्ड कपसाठी ब्रँड अँबेसिडर म्हणून निवडले आहे, हॅलो सुरेश रैना?' त्यावर रैनाने उत्तर दिले होते की 'मी आयसीसीचा अँबेसिडर नाही, पण माझ्या घरी 2011 वनडे वर्ल्ड कप आहे. मोहालीचा सामना लक्षात आहे ना? आशा आहे की तुम्हाला काही अविस्मरणीय क्षण आठवले असतील.' दरम्यान, रैनाच्या या ट्वीटची क्रिकेट वर्तुळात मोठी चर्चा झाली होती. आता आफ्रिदीने असा दावा केला आहे की त्याने रैनाशी चर्चा केली, यानंतर रैनाने ते ट्वीट डिलिट केले. 'मी त्याची सोशल मीडियावरील पोस्ट पाहिल्यानंतर त्याच्याशी बोललो. त्याने लहान भावाप्रमाणे परिस्थिती समजून घेतली. तो ट्वीट डिलिट करण्यासाठी तयार झाला. सर्व चांगले आहे, अशा गोष्टी होत राहतात.'



### 'कै. कॅप्टन शिवरामपंत व्हि. दामले करंडक' १९ वर्षाखालील टी-२० क्रिकेट स्पर्धा

# अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमी उपांत्य फेरीत!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी तर्फे आयोजित 'कै. कॅप्टन शिवरामपंत व्हि. दामले करंडक' १९ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेत अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमीने टेंभेकर फार्म ॲकॅडमीचा पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

सिंहगड रस्ता येथील कोद्रे फार्म्स मैदानावर झालेल्या सामन्यात ओम पचोरे याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमीने टेंभेकर फार्म ॲकॅडमीचा ३ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना टेंभेकर फार्म ॲकॅडमीने २० षटकामध्ये १३४ धावांचे आव्हान उभे केले. आयुष शर्मा याने ४२ धावा आणि साहील दाबके याने २६ धावा करून संघाच्या डावाला आकार दिला. ओम पचोरे याने ९ धावात ५ गडी बाद करताना टेंभेकर संघाच्या धावसंख्येला वेसण घातले.

हे लक्ष्य अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमीने १९.२ षटकात व ७ गडी गमावून पूर्ण केले. अमन सिंग याने ३० चेंडूत ९ चौकार आणि ३ षटकारांच्या मदींने ६२ धावांची खेळी केली. ओम पचोरे याने २२ धावांचे योगदान देत संघाचा विजय साकार केला.

**उपांत्यपुर्व फेरीः**

- टेंभेकर फार्म ॲकॅडमीः २० षटकात १० गडी बाद १३४ धावा (आयुष शर्मा ४२, साहील दाबके २६, ओम पचोरे ५-९, प्रतिक साळुंखे २-३४) वि.वि. अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमीः १९.२ षटकात ७ गडी बाद १३७ धावा (अमन सिंग ६२ (३०, ९ चौकार, ३ षटकार), ओम पचोरे २२, साहील दाबके ३-२०, अर्णव पाटील ३-२४); सामनावीरः ओम पचोरे;

### एचरइ पॉवर सिस्टीम महाराष्ट्र राज्य महिला निवड फिडे रेटेड बुद्धीबळ स्पर्धेत

# पाचव्या फेरीअखेर भाग्यश्री, दिव्या, दिशा संयुक्तरित्या आघाडीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बुद्धिबळ क्रीडा ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित व पुणे जिल्हा बुद्धीबळ सर्कल (पीडीसीसी), एआयसीएफ, एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एचरइ पॉवर सिस्टीम महाराष्ट्र राज्य महिला निवड फिडे रेटेड बुद्धीबळ स्पर्धेत पाचव्या फेरीअखेर जळगावच्या भाग्यश्री पाटील, कोल्हापूरच्या दिव्या पाटील, दिशा पाटील या खेळाडूंनी पाच गुणांसह संयुक्तरित्या आघाडी प्राप्त केली आहे.

कर्वे रोड येथील अश्वमेध हॉल या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत पाचव्या फेरीत पहिल्या पटावरील जळगावच्या भाग्यश्री पाटीलने पुण्याच्या आदिती कयाळचा पराभव करून ५ गुण प्राप्त केले. कोल्हापूरच्या दिव्या पाटील हीने पुण्याच्या राजराजेश्वरी देशमुख ला पराभुत करून ५ गुणांची कमाई केली. कोल्हापूरच्या दिशा पाटीलने रायगडच्या पल्लवी यादववर विजय मिळवत ५ गुणांसह आघाडी मिळवली.

पुण्याच्या अनुष्का कुतवळने साताऱ्याच्या तन्मई घाटेला पराभुत केले. पुण्याच्या निहिरा कौलने अकोल्याच्या देवांशी गावंडेचा पराभव केला.



